१६ ते ३१ जानेवारी २०२५ । किंमत ५० रु.
एकूण पृष्ठे ६८
पाक्षिक

# परिवर्तनाचा वाटसरु





मुखपृष्ठावरील छायाचित्र, वरील छायाचित्र तसेच मलपृष्ठावरील दुसरे छायाचित्र आणि अनुक्रमणिका व संपादकीयातील दोन्ही छायाचित्रे विद्या कुलकर्णी यांची आहेत.



प्रकाशन दिनांक १६-१-२०२५

UPI ID: abhaykanta3@okicici

पाक्षिक परिवर्तनाचा

# वाटसरू

वर्ष २४वे / अंक १६वा / किं. ५० रु. / १६ ते ३१ जानेवारी २०२५

**संस्थापक संपादक**
अभय कांता*

**संपादक**
प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**
प्रज्वला तट्टे । वीरा राठोड । कलीम अजीम । राही श्रु. ग. । वृषाली मगदूम

**व्यवस्थापक**
सोनाली काजळे

**संपर्क पत्ता**
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ८०० रु., त्रैवार्षिक : २,१०० रु., दशवार्षिक : ६,५०० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक ३०० रु., सॉफ्ट + छापील १००० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
आय.डी.बी.आय. बँक, ठाणे जांभळी नाका शाखा, पुणे । खात्याचे नाव : Pariwartanacha Vatsaru
चालू खाते क्र. : 0495102000023296 । आयएफएससी क्र. : IBLK0000495
Google Pay PhonePe साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

'परिवर्तनाचा वाटसरू' हे पाक्षिक मालक-प्रकाशक आणि मुद्रक अभय कांता यांनी नर्मदा ऑफसेट, नारायण पेठ, पुणे ३० येथे छापून ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ए, कसबा पेठ, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.



# अनुक्रम


**‘मकाम’ची दहा वर्षे**

**अतिथी संपादकीय** ५
सीमा कुलकर्णी, स्वाती देहाडराय

**महिला शेतकऱ्यांचा हक्काचा मंच** ७
गार्गी मांगुळकर, प्रकाश रणसिंग, स्नेहा भट

**शेतीतील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवरील हिंसाचार** ११
स्नेहा भट, सीमा कुलकर्णी

**संशोधन पद्धती आणि संशोधकांचे अनुभव** २१
वनिता तुमसरे

**कलामाध्यमातून अभ्यास निष्कर्षांचा वेध** २६
संकलन : विद्या कुलकर्णी

**महिला ऊसतोड कामगारांना वाली नाही!** ३१
पल्लवी हर्षे, स्वाती सातपुते, स्नेहा भट

**भविष्य पेरणाऱ्या** ३६
स्वाती सातपुते, सीमा कुलकर्णी

**स्त्री-अभ्यास शिकण्या-शिकवण्याच्या प्रक्रियेत शेतकरी स्त्रिया** ४३
स्वाती देहाडराय

**ओरिसामधील विस्थापनविरोधी जनआंदोलनाची गाथा** ४६
ललित भवरे

**झारखंडमधील लिंगभाव, जमीन आणि विकासाची गुंतागुंत** ४९
स्नेहा गोळे

**कविता**
माया पंडित ५३

**निमित्ताने**
**जातीय अस्मिता आणि राजकारण** ५५
आनंद तेलतुंबडे अनुवाद - शरद नावरे

**पुस्तक परिचय**
**माणूसमयतेची वाट सुकर करणारी ‘आंबेडकरी आई’** ६३
अजित मगदूम


परिवर्तनाचा वाटसरू

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

## अ ति थी सं पा द की य

### ‘मकाम’ची दहा वर्षे

विविध सामाजिक गटांतून येणाऱ्या शेतकरी कष्टकरी स्त्रियांना त्यांचे हक्क मिळवून देण्यामध्ये वर्ग, जात, पितृसत्ता आणि इतर सर्व सामाजिक विषमता या प्रमुख अडचणी ठरतात. स्त्रिया या खूप मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रात काम करत असूनही त्यांना शेतकरी म्हणून दर्जा मिळत नाही, शेतकी क्षेत्रातील निर्णयप्रक्रियेतून त्या वगळल्या जातात आणि त्यांना जमीन, पाणी आणि इतर संसाधनांपासून वंचित ठेवले जाते.

आर्थिक विषमता आणि शोषण करणाऱ्या सामाजिक संरचनामुळे स्त्रियांच्या विरुद्ध घरात आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसेच्या शक्यता आणि प्रमाण वाढते. स्थलांतर करून आलेले शेतकरी, खंडाने शेती करणारे, जंगलात काम करणारे, मासेमारी करणारे, एकल स्त्रिया आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील स्त्रिया ह्यांना त्यांची कामगार म्हणून भूमिका पार पाडत असताना हिंसा आणि छळवादाला सामोरे जावे लागते. शिवाय सामाजिक-राजकीय आणि वैवाहिक दर्जामुळे स्त्रियांच्या वाट्याला दैनंदिन व्यवहारात येणारी हिंसा आणि छळवाद ह्याच्या शक्यता आणि प्रमाण वाढते. शेती क्षेत्रातील स्त्रियांच्या पुढे असलेली आव्हाने शेतीचे व्यापारीकरण, खाजगी बहुराष्ट्रीय कंपन्यांची ज्ञान, बियाणे आणि शेतकी मालावरील मक्तेदारी, शेतीचे यांत्रिकीकरण, रसायनकेंद्री शेती, वारंवार एकच पीक घेणे ह्यामुळे अधिकच गुंतागुंतीची बनतात.

राज्यसंस्थाही सामाजिक आर्थिक संरक्षण देण्यात अपयशी ठरत असल्याने भूमिहीन, अल्प-भूधारक कुटुंबातून येणाऱ्या या स्त्रियांसमोरील आव्हानांची तीव्रता अधिकच वाढते.

वरील सर्व गुंतागुंतीच्या मुद्द्यांकडे लक्ष द्यायचे असेल तर स्त्रियांना येणाऱ्या संरचनात्मक अडचणींवर लक्ष केंद्रित करून एक बहुआयामी असा दृष्टिकोन विकसित केला पाहिजे. त्याचबरोबर छोट्या / अल्पभूधारक आणि खंडाने शेती करणाऱ्या शेतकरी स्त्रियांना परिघाबाहेर ढकलणाऱ्या शेतीच्या भांडवलकेंद्री प्रारूपाला (corporatized model) पर्याय देणारे प्ररूप उभे करण्याची गरज आहे.

‘महिला किसान अधिकार मंचा’च्या स्थापनेला (‘मकाम’) दहा वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने काढलेल्या ‘परिवर्तनाचा वाटसरू’च्या या अंकातील



लेख हे शेतकी क्षेत्रातील अरिष्ट आणि लिंगभाव संदर्भातील विषमता / विसंगती ह्यातील आंतरसंबध आणि आंतरछेदिततता ठळक करतात. या बाबी एरवी विश्लेषण आणि व्यवहार या दोन्ही पातळ्यांवर बहुतेकवेळा सुट्या सुट्या करून पाहिल्या जातात. सदर अंकातील लेख हे नियंत्रण आणि शोषण ह्याच्या प्रमुखप्रवाही संकल्पनात्मक चौकटीला आव्हान देणारे प्रतिवादी-कथानक लिहिण्यातील स्त्रियांचे कर्तेपण ठळक करण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणूनच अंकाची सुरुवातही 'मकाम'ची स्थापना, त्यांची भूमिका व शेती आणि स्त्रिया ह्यावर भाष्य करणाऱ्या लेखाने केली आहे. त्यानंतर अंकात समाविष्ट करण्यात आलेल्या लेखांमधून 'सोपेकॉम'(www.soppecom.org) आणि 'मकाम' (www.makaam.in)ने महाराष्ट्र, तेलंगणा आणि पंजाब या तीन राज्यांमध्ये शेतकरी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक दर्जाविषयक जे अभ्यास करण्यात आले आहेत त्यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. त्याचबरोबर त्यासाठी वापरलेल्या संशोधन पद्धतींवर मांडणी करणाऱ्या, ज्यामध्ये त्यांनी संशोधनाची तंत्र, ते वापरताना आलेले अनुभव आणि त्यांना पडलेले प्रश्न ह्याचा त्यांनी आढावा घेतला आहे. त्यानंतरच्या दोन लेखांमधून स्त्रियांनी शेती संदर्भात केलेले प्रयोग, त्याचे एकूण पर्यावरणात झालेले बदल आणि त्याचा शेतीवर होणारा परिणाम ह्याचा आढावा घेणारा लेख शेती आणि स्त्रिया ह्याची एक सकारात्मक बाजू दाखवतो. तर ऊस तोड कामगारांच्या वास्तवाचा आधार घेणारा लेख महाराष्ट्राची कामगार / गरीब विरोधी धोरणे आणि विचार ह्यावर प्रकाश टाकतो. या अभ्यासाच्या दरम्यान या स्त्रियांचे दैनंदिन वास्तव टिपणारी छायाचित्रे काढली गेली होती, ज्यातून या स्त्रियांचे श्रम किंवा मेहनत ज्याप्रमाणे दृग्गोचर होते, त्याचप्रमाणे ती छायाचित्रे त्यांच्या चेहऱ्यावरील भाव आणि त्यांचे भौतिक जग हेही अत्यंत प्रभावीपणे आपल्यापर्यंत पोहचवात. त्या मागील विचार आणि काढलेल्या छायाचित्रांविषयी मांडणी करणारा लेखही या अंकामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. या संशोधनात पोस्टर, फोटो, शेतकरी स्त्रियांचे अनुभव चित्ररूपात कथन अशा विविध माध्यमांचा उपयोग केला गेला, ज्यामुळे या संशोधनातून पुढे येणारे मुद्दे लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी मदत झाली. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या शेतकरी स्त्रियांचे भावविश्व आणि त्याचे काही खट्याळ क्षण टिपणेही शक्य झाले. सदर संशोधनाच्या वैचारिक पायाभरणीत महत्त्वाची भूमिका पर पाडणाऱ्या अभ्यासकांपैकी दोन महत्त्वपूर्ण अभ्यासकांच्या स्त्रिया आणि शेतीचा प्रश्नावर आलेल्या दोन पुस्तकांची ओळखही या अंकात समाविष्ट केली आहे. थोडक्यात 'मकाम'च्या दहा वर्षाच्या निमित्ताने शेतकरी स्त्रिया, त्यांचे सामाजिक आर्थिक वास्तव, पितृसत्ताकता आणि कृषी क्षेत्रातील बदलांमुळे जटील होत जाणारे त्यांचे प्रश्न आणि सर्व विपरीत परिस्थितीशी संघर्ष करून उभ्या राहणाऱ्या शेतकरी स्त्रियांचे वास्तव मांडणे हे या अंकाचे उद्दिष्ट तर आहेच पण त्याचबरोबर कृषी क्षेत्रातील अरिष्ट आणि भारताच्या विकासाच्या कथानकाला या शेतकरी स्त्रिया लिंगभावाचे जे झणझणीत अंजन घालून या क्षेत्राच्या प्रस्थापित आकलन आणि विश्लेषणावर टिप्पणी करत आहेत त्याची उजळणी केली आहे.

'सोपेकॉम' आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'स्त्री व लिंगभाव अभ्यास विभाग' यांनी एकत्र येऊन वेगवेगळ्या क्षेत्रांतून निर्माण होणाऱ्या स्त्री-प्रश्नविषयक ज्ञाननिर्मितीमध्ये संवाद घडवून आणण्यासाठी त्याच प्रमाणे कृषीक्षेत्र, त्यातील अरिष्ट ह्याचा लिंगभाव परिप्रेक्ष्यातून अभ्यास आणि त्यानुसार धोरणात्मक विचार करण्याची गरज या अंकातून अधोरेखित केली आहे.

●

**सीमा कुलकर्णी**
'मकाम'च्या राष्ट्रीय
समिती सदस्य, पुणे
seemakulkarni2@gmail.com

**स्वाती देहाडराय**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे
swatidroy@gmail.com

दशकपूर्ती

# महिला शेतकऱ्यांचा हक्काचा मंच

गार्गी मांगुळकर, प्रकाश रणसिंग, स्नेहा भट

‘महिला किसान अधिकार मंच’ (‘मकाम’)[१] राष्ट्रीय मंचाची स्थापना २०१४मध्ये नागपूर येथे झाली. डिसेंबर २०१३मध्ये UN Womenने आयोजित केलेल्या महिलांच्या आर्थिक सबलीकरणासंबंधीच्या चर्चासत्रामध्ये महिला शेतकऱ्यांचा एक देशव्यापी मंच असावा ह्याबद्दल चर्चा झाली होती. महिला शेतकऱ्यांचे हक्क आणि अधिकारांवर चर्चा करण्यासाठी आणि कृतिकार्यक्रम ठरविण्यासाठी एक सर्वसमावेशक मंच असावा यावर एकमत तयार झाले होते. त्यानुसार २०१४मध्ये नागपूर येथे देशभरातील महिला शेतकऱ्यांच्या संघटना, संस्था आणि संशोधकांच्या उपस्थितीत मंचाची ध्येय, धोरणे, कार्याची व्याप्ती या सोबतच मंचाची रचना काय असावी यावर सविस्तर चर्चा होऊन मंचाची स्थापना करण्यात आली. आज दहा वर्षांनंतर देशभरातील २० राज्यात ‘मकाम’ सक्रीयपणे काम करत आहे.

भारतीय शेती आणि संलग्न क्षेत्रात महिलांचे श्रम आणि ज्ञानाचा वाटा पुरुषांच्या तुलनेत अधिक आहे. भारतातील ग्रामीण भागातील बहुतांश महिला शेतीमध्ये गुंतलेल्या आहेत. PLFS (२०२२-२३)नुसार ग्रामीण भागात कृषी क्षेत्रात पुरुष कामगारांचे प्रमाण ४९.१% असून त्या तुलनेत महिलांचे प्रमाण ७६.२% इतके जास्त आहे. असे असूनही शेतकरी म्हणून महिलांना बघितले जात नाही. शेतकरी म्हणले, की पुरुष शेतकऱ्यांची छबी डोळ्यांसमोर उभी राहते. अन्नदाता म्हणून केवळ पुरुष शेतकऱ्याकडे बघितले जाते. शेती क्षेत्रात ६०-७५ टक्के स्त्रियांचे योगदान असूनही जमिनीची मालकी मात्र बहुतांश घरातील पुरुषांच्या नावे असते. ज्याच्या नावाने शेती तो शेतकरी अशा धारणेमुळे महिलांना शेतकरी म्हणून कागदोपत्री मान्यता मिळत नाही. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीवर शेतकऱ्यांसाठीच्या राष्ट्रीय धोरणानुसार (२००७) नुसार, शेतकरी म्हणजे पिकांची लागवड, शेतमजुरी, गौणवनउपज संकलन, मासेमारी आणि इतर संबंधित कामांमध्ये सक्रियपणे गुंतलेली व्यक्ती होय. महिला या सर्वच कामात गुंतलेल्या आहेत, परंतु सामाजिक परंपरा आणि पितृसत्तेची बंधने यामुळे महिलांना शेतकरी म्हणून ओळख मिळत तर नाही आणि त्यांचे अधिकारही डावलले जातात.

शेतीमधील पर्यावरणीय अरिष्ट, दीर्घकालीन दुष्काळ, अनियमित पाऊस, हवामान बदल ह्यामुळे सर्रास घटत असलेले उत्पन्न एका बाजूला तसेच दुसऱ्या बाजूला जात, वर्ग आणि पुरुषसत्तेचे सामाजिक नियम. अशा अनेकांगी आव्हानाना शेतकरी महिला सामोऱ्या जातात.

मांगुळकर या ‘राष्ट्रीय मकाम’च्या समन्वयक आहेत. रणसिंग आणि भट हे ‘मकाम महाराष्ट्र’चे सदस्य आणि सोपेकॉममध्ये संशोधक म्हणून कार्यरत आहेत.

gargiepm@gmail.com

प्रतिकूल परिस्थितीतही महिला शेतकरी आपल्या पारंपारिक शास्रोक्त ज्ञानाच्या आधारे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करत प्रतिकूलतेवर मात करतात.

महिला शेतकऱ्यांना, विशेषतः अल्पभूधारक वंचित महिला शेतकऱ्यांना ओळख मिळवून देणे आणि सामाजिक न्याय, ज्ञानांमधील विविधता, आणि पर्यावरणवादी दृष्टिकोन ह्यावर आधारित विकास हे 'मकाम'चे स्थापनेपासून उद्दिष्ट्य राहिले आहे. जमीन, त्याचबरोबर पेन्शन, मातृत्व योजनांचा लाभ, अन्नसुरक्षा ह्यासारखे सामाजिक आणि आर्थिक अधिकार महिलांना मिळवून देण्याचा 'मकाम'चा प्रयत्न आहे. बाजारू आणि भांडवली शेतीचे संकटाचे अवडंबर डोक्यावर असताना शाश्वत, कमी खर्चाच्या, हवामान बदलामध्ये टिकाव धरू शकेल अशा पर्यावरणस्नेही शेती पद्धतीकडे वळणे गरजेचे आहे अशी 'मकाम'ची भूमिका आहे. अशा परिवरर्तनामध्ये शेतकरी महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण असणार आहे.

### 'मकाम'ची रचना

ज्याठिकाणी 'मकाम'चे सक्रीय काम चालते त्या प्रत्येक राज्यामध्ये राज्यातील अनेक महिला शेतकरी, संशोधक, गावपातळीवर काम करणाऱ्या संस्था, आदी अनेक घटक 'मकाम'शी जोडलेले आहेत. राज्यातील असे सर्व घटक तसेच राष्ट्रीय पातळीवरील समन्वय गट ह्यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करण्याची जबाबदारी त्या राज्यातील काही व्यक्ती/संस्था घेतात. तसेच 'मकाम'चे ज्या विषयांवर प्रामुख्याने काम चालू आहे अशा विषयांवर आधारित (उदा. शेतकरी आत्महत्या, जमीन व जंगलाचे अधिकार, पर्यावरणपूरक शेती, पाण्याचे नियोजन आणि शेतकरी उत्पादक संस्था) त्या विषयांवर आधारित गटदेखील सक्रीय आहेत. प्रत्येक गटामध्ये विविध राज्यांमधील त्या विषयावर काम करणारे लोक एकत्र येतात. या गटांमार्फत त्या विषयाबाबत भूमिका तयार करणे, कॅम्पेन राबवणे आणि जनजागृती करणे अशा प्रकारचे उपक्रम हाती घेतले जातात. त्याचबरोबर राष्ट्रीय पातळीवर एक समन्वय गट कार्यरत आहे. या गटामध्ये राज्यपातळीवरील गट बांधणी करणारे प्रतिनिधी, विशिष्ट विषयाचे संयोजक, संशोधक, प्रमुख कार्यकर्ते यांचा समावेश असतो आणि ते प्रामुख्याने निर्णयांच्या अंमलबजावणीचे काम करतात. नियोजनासाठी, चर्चा करण्यासाठी, समन्वयासाठी नियमितपणे द्वैमासिक ऑनलाईन बैठका आणि वार्षिक संमेलन आयोजित केले जाते.

मागील दहा वर्षांपासून, 'मकाम' महिला शेतकऱ्यांना येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, त्यांच्या अधिकारांसाठी आणि देशभरात त्यांचा आवाज सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक महत्त्वाचा मंच म्हणून पुढे येत आहे. महिला शेतकऱ्यांच्या अशा संघटित प्रयत्नाचा प्रभाव शेतकरी व कामगार संघटना आणि चर्चाविश्वातील मुख्य संस्थावर झालेला दिसतो. त्यामुळे कृषी आणि संलग्न क्षेत्रामध्ये लैंगिक समानता वाढविणारे बदल घडून आले आहेत.

'मकाम'ने स्थापनेपासून महिला शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आहे. शेतकरी म्हणून मान्यतेपासून रोजगार, उपजीविका, जमिनीचा मालकी हक्क, वनहक्क, आत्महत्या ग्रस्त शेतकरी महिलांचे प्रश्न, महिला ऊसतोड कामगारांचे प्रश्न अशा अनेक विषयावर काम केले. या कामाला अभ्यास, संशोधन आणि कृतिशील हस्तक्षेप आणि संघटनेची जोड दिली आहे. त्यामुळे विविध राज्यात आज अनेक कामांना यश मिळताना दिसत आहे. 'मकाम'च्या या दशकातील कामाचा आढावा पुढील भागात घेतला आहे.

### 'मकाम'ची मुळे रुजताना (२०१६-१८)

ह्या काळात 'मकाम'ने वनहक्क, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला आणि ऊसतोड कामगार महिला या विषयांच्या अनुषंगाने काम करायला सुरुवात केली.

वनहक्क कायद्याप्रमाणे (२००६) महिलांना अधिकार

मिळाला असला तरी प्रत्यक्षात त्यांचा हक्क डावलला जाण्याच्या, त्यांच्यावर होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना समोर येत होत्या. याच अनुषंगाने 'मकाम'ने आदिवासी समुदायातील महिला नेत्यांच्या क्षमता बांधणीवर भर दिला. जेणेकरून कायद्यांतर्गत वैयक्तिक आणि सामूहिक दावे त्या स्वतः करू शकतील. त्याचबरोबर महिलांना सहन करावा लागणारा हिंसाचार आणि त्यांचे पर्यावरणासंबंधी ज्ञान ह्यासंबंधी माहितीचे संकलन करण्यात आले.

आत्महत्याग्रस्त महिलांचे काय प्रश्न आहेत हे समजून घेण्यासाठी 'मकाम'ने काही अभ्यास केले.[२] या अभ्यासांमधून आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांचे संपत्तीमधून बेदखल केले जाणे, योजनांचा लाभ न मिळणे, समाजाकडून अवहेलना सहन करावी लागणे असे अनेक प्रश्न समोर आले. अशा समस्यांमध्ये त्यांना मदत व वकिली करण्याचे काम 'मकाम'ने मोठ्या प्रमाणात केले. वेळप्रसंगी लोकशाही मार्गाने आंदोलनाचा मार्गही अवलंबला. तसेच जनसुनवाईच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न समोर येतील ह्यासाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये प्रयत्न करण्यात आले. सरकारबरोबर सतत केलेल्या संवादामुळे अनेक कुटुंबांना हक्काची मदत मिळाली, उपजीविकेसाठी सहाय्य मिळाले. विशेषतः महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यामध्ये धोरणांच्या पातळीवर त्यामुळे बदल घडून आले.

मराठवाड्यातील आणि विशेषतः बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भाशयाची पिशवी काढून टाकण्याच्या अनावश्यक शस्त्रक्रियांचा प्रश्न २०१८मध्ये नव्याने समोर आला. त्यांनतर 'मकाम'ने त्यावर लक्ष केंद्रित करून विविध प्रकारे त्या विषयावर काम सुरू केले. शस्त्रक्रियांच्या बरोबरीने ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्य, रोजगार आणि उपजीविकेशी संबंधितदेखील अनेक समस्या आहेत हे 'मकाम'च्या अभ्यासातून समोर आले आणि पुढे इतर संघटनांच्या बरोबर मिळून केलेल्या प्रयत्नांमुळे ऊसतोड कामगारांसंदर्भातले अनेक शासन निर्णय/ परिपत्रक/ शिफारशी २०१९पासून शासनाने काढल्याचे दिसून येते. ऊसतोड कामगारांना त्यांचे हक्क मिळण्याच्या दृष्टीने गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाची स्थापना हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

मार्च २०१६मध्ये आंध्र प्रदेश येथील बापटलामध्ये महिला किसान संमेलन हे 'मकाम'ने आयोजित केलेले महिला शेतकऱ्यांचे पहिले राष्ट्रीय अधिवेशन होते. यामध्ये २० राज्यातील ५००हून अधिक महिलांनी सहभाग घेतला. संमेलनामध्ये महिला शेतकरी, कार्यकर्ते आणि धोरणकर्ते असे सर्व एकत्र आले होते. या संमेलनात स्त्रियांची स्थिती आणि आव्हाने दर्शविण्यासाठी प्रदर्शने, विषयाधारित सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच नीती आयोग, कृषी मंत्रालय आणि इतर सरकारी संस्थाबरोबर संवाद वाढविण्यास मदत झाली.

त्याचबरोबर या टप्प्यात 'मकाम'ने तळागाळातील शेतकरी स्त्रिया आणि धोरणकर्ते यांच्यात समन्वय साधण्यासाठी युएन वुमेनच्या सहकार्याने प्रादेशिक बैठका आयोजित केल्या. या महत्त्वपूर्ण बैठकांमुळे २०१७मध्ये कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री राधा मोहन सिंग यांनी महिला शेतकऱ्यांना अधिकार देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे अशी घोषणा केली. राणीखेत (मे २०१६), गुवाहाटी (जुलै २०१६) यासारख्या प्रादेशिक बैठकांमुळे नवीन राज्यांपर्यंत आणि विषयांपर्यंत पोहोचता आले.

२०१६मध्ये 'मकाम'ने घेतलेल्या कष्टाचे फळ म्हणून १५ ऑक्टोबर या दिवसाला राष्ट्रिय महिला किसान दिवस (National Women Farmers' Day) म्हणून अधिकृत मान्यता मिळाली. महिला शेतकऱ्यांच्या सहभागाचा आणि ओळखीचा एक महत्त्वाचा मैलाचा टप्पा म्हणून याकडे आपण पाहू शकतो.

### कार्यक्षेत्राचा विस्तार (२०१९ – २०२१)

ह्या काळात हवामान बदल आणि एकंदरीत कृषी

संकटामध्ये पर्याय देण्याच्या दृष्टीने पर्यावरणस्नेही शेती (agro-ecology based farming) सारख्या प्रयोगांची सुरवात केली. त्याच अनुषंगाने मार्च २०२०मध्ये वर्धा येथे झालेल्या प्रशिक्षण चर्चासत्रात कार्यशाळेच्या माध्यमातून शाश्वत शेती करण्याबाबत स्त्रियांना 'पर्यावरणीय दूत' (Eco-champions) म्हणून प्रशिक्षण दिले गेले.

महिला शेतकऱ्यांचे प्रश्न राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर मांडणी करण्याचे प्रयत्न या काळात करण्यात आले. सामाजिक सुरक्षा यावर सरकारने सादर केलेलेल्या श्रम संहिता मसुद्यावर (Draft labour code on social security) 'मकाम'ने दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये असंघटित क्षेत्रातील ग्रामीण महिलांचे योगदान कसे अदृश्य राहते ह्यावर भर देण्यात आला. ऑगस्ट २०२०मध्ये केंद्र सरकारने पर्यावरणीय परिणाम मूल्यांकनाबाबतचा एक मसुदा सादर केला. या मसुद्यावर 'मकाम'ने विरोध निदर्शित केला. या नोटिफिकेशनमध्ये सार्वजनिक सुनावणी नसणे, प्रकल्पांची पूर्तता झाल्यावर पर्यावरणीय मंजुरी देणे इत्यादी बाबींचा विरोध दर्शविला. याशिवाय वैज्ञानिक दृष्टिकोन आणि महिला आणि इतर वंचितांना केंद्रस्थानी ठेवून मसुदा तयार केला जावा असा आग्रह धरला.

ह्या काळात चर्चासत्र, कॅम्पेन, आणि कार्यशाळांच्या माध्यमातून महिलांचा जमीन आणि वनावरील अधिकारासंबंधी प्रसार-प्रचार करण्याचे काम केले. नोव्हेंबर २०१९मध्ये दिल्लीमधील पत्रकार परिषदेत आणि Beijing+25 CSO Forum workshop सारख्या माध्यमांतून महिलांचे संघर्ष अधोरेखित केले. यासहीत युएन वुमेनच्या सहकार्याने 'मकाम'ने नवी दिल्ली (जानेवारी २०२०) येथे आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलांच्या प्रश्नांवर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. यात आत्महत्याग्रस्त कुटुंबातील ७०हून अधिक स्त्रियांनी सहभाग घेतला. यामध्ये जमीन अधिकार आणि सामाजिक सुरक्षितता यावर लक्ष केंद्रित धोरणांची मागणी करण्यात आली. २०२०मध्ये सरकारने लागू केलेले कृषी कायदे महिलांच्या हिताचे नसल्याने 'मकाम'ने त्यांना विरोध दर्शविला. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, छत्तीसगड, गुजरात, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये स्त्रियांनी सक्रियपणे कायदा रद्द करण्यासाठी निदर्शने केली.

कोव्हिड-१९ मदत कार्य : कोव्हिड-१९ काळात 'मकाम'ने सर्वेक्षणाच्या माध्यमातून कोव्हिड-१९ आणि त्यानंतर झालेल्या टाळेबंदीचा महिला शेतकऱ्यांवर कसा परिणाम झाला ह्याबद्दल मांडणी केली. त्याचबरोबर विविध राज्यांमध्ये शेतकरी महिलांसाठी मदतकार्य केले.

### क्षितिज विस्तारताना (२०२२-२०२४)

ऑक्टोबर २०२२मध्ये 'मकाम'ने महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात घेतलेल्या ऐतिहासिक परिषदेनंतर ऊसतोड महिला कामगारांची संघटना स्थापन केली. त्यानंतर सप्टेंबर २०२४मध्ये पुण्यात १०५ शेतकरी महिलांच्या बैठकीत शेतकरी स्त्रिया, ऊसतोड स्त्री कामगार आणि इतर सर्व स्त्रियांसाठी एक मंच तयार करण्यात आला. ही बाब महिला शेतकरी व अन्य असंघटित महिला कामगारांच्या संघटना वाढीसाठी महात्त्वाची ठरली.

'मकाम'च्या प्रयत्नांमुळे कर्नाटकात शेतकरी नोंदणी आणि लाभधारक माहिती यंत्रणेमध्ये (Farmer Registration Unified Beneficiary Information System FRUITS Portal) सुधारणा करण्यात आल्या. ज्यामुळे स्त्रियांना शेतकरी म्हणून स्वतंत्रपणे नोंदणी करता येणे शक्य झाले.

ह्या काळात ग्रामीण स्त्रियांवर जो व्यवस्थात्मक हिंसाचार होतो त्यावर 'मकाम'ने लक्ष केंद्रित केले आहे. ज्यात जमिनीवरील अधिकाराचा, जातीय भेदभावाचा, कामाच्या जागी होणारा हिंसाचार यांचा समावेश आहे. त्यासाठी संशोधन, वेबिनार, मोहिमांच्या

**(पृष्ठ क्र. २०वर)**

दशकपूर्ती

# शेतीतील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवरील हिंसाचार


स्नेहा भट,
सीमा कुलकर्णी


भारतातील शेती क्षेत्रातील अरिष्टाबाबत जी मांडणी केली जाते त्यामध्ये बहुतेक वेळेला शेतकऱ्यांचा एक समुदाय म्हणून विचार केला जातो. जात, वर्ग, आणि लिंगभाव आधारित व्यवस्थांमुळे निर्माण होणाऱ्या असमानता आणि त्याचा अरिष्टाशी असणारा संबंध ह्याकडे चिकित्सकपणे पाहिले जात नाही. शेतीमधील अरिष्टाचा या व्यवस्थांमुळे वंचित असणाऱ्या समूहांवर, आणि विशेषतः महिला शेतकऱ्यांवर वेगळा परिणाम होत असतो ह्याबद्दल मांडणी होताना दिसत नाही.

महिला शेतकऱ्यांचा शेतीमधील सहभाग, जमीन आणि इतर संसाधनांवरील अधिकार, संस्थात्मक पातळीवरील महिलांचा सहभाग इत्यादी संबंधीची आकडेवारी बघितली तर शेती क्षेत्रामधील महिलांना मिळणारे दुय्यम स्थान दिसून येते. शेतीच्या कामातील सहभाग मोठा असूनही जमीन आणि इतर संसाधनांवर अधिकार नाही, मजुरीमधील तफावत, मजुरी देणाऱ्या कामाचे कमी झालेले प्रमाण, घरातील कामाचे ओझे ह्यामुळे महिलांच्या शेतीमधील सहभागावर परिणाम होतो. स्वतःच्या शेतीमध्ये आवश्यक ती गुंतवणूक करून तिची उत्पादकता वाढविणे त्यांना शक्य होत नाही. आर्थिक असुरक्षितता, आणि शोषण करणाऱ्या सामाजिक व्यवस्था ह्यामुळे कुटुंबात आणि कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराची शक्यता वाढते. स्थलांतरित मजूर, शेतमजूर, मक्त्याने शेती करणाऱ्या, एकट्या महिला, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला ह्यांना कामाच्या ठिकाणी हिंसाचाराला तोंड द्यावे लागते. या सर्व परिस्थितीमुळे शेतीमधल्या बदलांचे त्यांच्यावर होणारे परिणाम अधिक गंभीर असतात. शेतीमधील अरिष्ट आणि स्त्री-पुरुष असमानता ह्यांचा विचार, विश्लेषण आणि कृतीकार्यक्रम दोन्हीमध्ये बहुतेक वेळा स्वतंत्रपणे केला जातो.

'सोपेकॉम' आणि 'महिला किसान अधिकार मंच' ('मकाम')ने केलेल्या 'शेतीमधील अरिष्ट आणि ग्रामीण महिलांवर होणारा हिंसाचार' या अभ्यासामधून या दोन्हीमधील परस्परसंबंध अधोरेखित होतो आहे. महाराष्ट्र, तेलंगणा आणि पंजाब अशा तीन राज्यांत २०२२-२४ या काळात हा अभ्यास करण्यात आला होता. महाराष्ट्रातील अकोला, यवतमाळ आणि परभणी, तेलंगणामधील नलगोंडा आणि मेडक, तर पंजाबमधील भटींडा, मानसा आणि संगरूर या जिल्ह्यांची निवड अभ्यासासाठी करण्यात आली होती. अभ्यासामध्ये महाराष्ट्रातील १,३६२, तेलंगणामधील १,०६२ आणि पंजाबमधील ७११ महिलांचा


दोन्ही लेखिका 'मकाम'च्या प्रमुख कार्यकर्त्या असून 'सोपेकॉम'मध्ये कार्यरत आहेत.

bhatsneha@gmail.com

seemakulkarni2@gmail.com

सर्व्हे करण्यात आला. त्याचबरोबर गटचर्चा, केस स्टोरीज, विविध पातळीवरच्या जाणकारांच्या मुलाखती, गावाची प्रोफाईल आणि दुय्यम माहितीचे संकलन अशा पद्धती अभ्यासात वापरण्यात आल्या होत्या.

ह्या अभ्यासातून आज महिला शेतकऱ्यांच्या समोर असणारे विविध प्रश्न, त्यांना येणारे हिंसाचाराचे अनुभव ह्याचे जे चित्र समोर आले, त्याबद्दल थोडक्यात मांडणी करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. लेखाच्या मर्यादेमुळे महाराष्ट्राच्या अभ्यासातून जे चित्र समोर आले, त्याबद्दल ह्याठिकाणी प्रामुख्याने मांडणी केली आहे. लेखात मांडलेले बहुतेक प्रश्न हे तीनही राज्यांमध्ये दिसून आले. ज्याठिकाणी इतर दोन राज्यांमध्ये काही वेगळे चित्र दिसले, त्याचा विशेष उल्लेख केला आहे. अभ्यासातून आलेल्या निष्कर्षांकडे वळण्याआधी शेतीक्षेत्रातील बदलती परिस्थिती आणि महिलांचे समाजातील स्थान ह्याबद्दल राज्यातील चित्र काय दिसते आहे ते थोडक्यात पाहू.

महाराष्ट्रात शेती क्षेत्रात विरोधाभासाची परिस्थिती आहे. राज्याच्या उत्पन्नापैकी शेतीमधून येणारे उत्पन्न केवळ १२% असले तरी एकूण लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे (आर्थिक सर्वेक्षण २०२२-२३)[१]. देशातील सर्वाधिक मोठी धरणे महाराष्ट्रात असूनही २० टक्क्यांपेक्षाही कमी क्षेत्र सिंचित आहे. कोरडवाहू प्रदेशात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे आणि सक्तीचे स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ हे त्याचेच परिणाम आहेत. National Crimes Record Bureau of India (NCRB)मधून संग्रहित केलेल्या माहितीनुसार १९९५ ते २०२२ या काळात जवळपास ९६,००० शेतकरी आत्महत्या झाल्या असून, त्यामधील ९.७ टक्के आत्महत्या महिलांच्या होत्या.[२]

शेती आणि सिंचनामधील सुधारणा प्रकल्पांमुळे ऊसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांवरील भर अधिक वाढला आहे. राज्यातील ऊसाच्या पिकाखालील क्षेत्र हे एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ४-६ टक्के असले तरी सिंचनाच्या एकूण पाण्यापैकी ६० टक्क्यांहून अधिक पाणी त्यासाठी वापरले जाते. कोरडवाहू प्रदेशामध्ये सोयाबीनसारख्या पीकाला प्रोत्साहन दिल्यामुळे शेतीच्या पद्धतींमध्ये बदल होत गेले आहेत. १९६०-६१मध्ये सोयाबीनचे पीक राज्यात अस्तित्त्वात नव्हते आणि २०१५-१६च्या कृषी गणनेप्रमाणे एकूण तेलबियांखालील क्षेत्रापैकी ९१% क्षेत्र सोयाबीनखाली आहे. कोरडवाहू प्रदेशात कापसाच्या पारंपारिक स्थानिक वाणाची जागा बीटी कॉटनने घेतली आहे. त्याचबरोबर शेतीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात बिगर शेतीकडे वळवले जात आहे. शेतीखालील क्षेत्रामध्ये घट मोठ्या प्रमाणात झाली असली तरी शेतीवर अवलंबून असणाऱ्या कामगारांची संख्या मात्र त्या तुलनेत कमी झालेली नाही. राज्याच्या अर्थव्यवस्थेमधील शेतीचे घटते योगदान आणि शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या ह्यांचे प्रमाण विषम असल्याने पिकाखालील क्षेत्रापैकी प्रति हेक्टरवरील भार वाढलेला आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भामध्ये. १९९०च्या दशकात महाराष्ट्रात अवलंबलेल्या आर्थिक आणि विकासाच्या धोरणांचे महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रावर आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांवर गंभीर परिणाम झाले आहेत. शेतकरी आत्महत्या, सक्तीचे स्थलांतर, महिलांवरील कामाचे वाढते ओझे आणि मराठा आरक्षणासारखी आंदोलने अशा विविध प्रकारे हे परिणाम स्पष्ट होत आहेत.

राष्ट्रीय कुटुंब आणि आरोग्य पाहणी अहवालातील ग्रामीण महिलांसंबंधीची माहिती बघितली तर सध्या २० ते २४ वयोगटात असणाऱ्या महिलांपैकी २७.६% महिलांचा बालविवाह झाला होता. १५ ते ४९ वयोगटातील केवळ ७९.५% महिला साक्षर आहेत आणि ४०.७% महिलांनी १०वीच्या पुढे शिक्षण घेतलेले आहे. १८ ते ४९ वयोगटातील महिलांमध्ये नवऱ्याकडून होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण २८.६%

आहे.[३] २०१५–१६च्या कृषी गणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण भूधारकांपैकी महिला भूधारकांचे प्रमाण केवळ १५% आहे.[४]

तेलंगणा आणि पंजाब या राज्यांमधली परिस्थिती काहीशी वेगळी असली तरी शेतीसंदर्भातील या अनेक अडचणी त्याठिकाणीही दिसून येतात.

शेतीमधील अनेक वर्षांपासून सुरू असणारे अरिष्ट आणि त्याचा ग्रामीण लोकसंख्येवर होणारा परिणाम हा स्वतंत्र तेलंगणा राज्याच्या मागणीमागील महत्त्वाचा घटक होता. नवीन राज्याची स्थापना करताना सर्व सामाजिक घटकांच्या समावेशासह विकास हे उद्दिष्ट समोर ठेवले गेले होते. परंतु मागील दहा वर्षांमधील धोरणे आणि त्यांचे परिणाम पाहता परिस्थिती वेगळी आहे हे लक्षात येते.

मागील दहा वर्षांत भात आणि कापसाच्या पीकाला प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या धोरणामुळे पीक पद्धतीमध्ये मोठा बदल झालेला दिसून येतो. या दोन पिकांखालील क्षेत्र हे एकूण पिकांखालील क्षेत्राच्या ७४% झाले आहे. राज्याच्या स्थापनेपासून सरकारने अनेक प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन सुरू केले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी जमीन गमावली असून त्यांचे विस्थापन झाले आहे. जमिनीच्या सततच्या वाढत्या किंमतींमुळे त्यांना नवीन जमीन विकत घेणेही शक्य होत नाही. त्याचबरोबर त्या जमिनीवर अवलंबून असणारे खंडाने शेती करणारे शेतकरी आणि शेतमजूर ह्यांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तेलंगणामध्ये खंडाने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. अशा प्रकारच्या शेतीचे व्यवहार हे गेल्या काही वर्षांमध्ये बदलले असून, आता प्रामुख्याने रोख पैसे देऊन जमीन खंडाने घेतली जाते. त्यामुळे शेतीमध्ये नुकसान झाल्यास त्याचा सर्व बोजा हा जमीन खंडाने घेणाऱ्या शेतकऱ्यांवर येतो. त्याचबरोबर त्यांना रयतु बंधू, रयतु बिमा सारख्या योजनांचा लाभ मिळत नाही. ह्यामुळे मागील काही वर्षांमध्ये खंडाने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. NCRBमधून संग्रहित केलेल्या आकडेवारीप्रमाणे २०१४ ते २०२२ या काळात तेलंगणामध्ये ६,६५८ शेतकरी आत्महत्या झाल्या असून त्यापैकी १४.४% आत्महत्या या महिलांच्या होत्या.

राष्ट्रीय कुटुंब आणि आरोग्य पाहणी अहवालातील ग्रामीण महिलांसंबंधीची माहिती बघितली तर सध्या २० ते २४ वयोगटात असणाऱ्या महिलांपैकी २८% महिलांचा बालविवाह झाला होता. १५ ते ४९ वयोगटातील केवळ ५८% महिला साक्षर आहेत आणि केवळ ३६.३% महिलांनी १०वीच्या पुढे शिक्षण घेतलेले आहे. १८ ते ४९ वयोगटातील महिलांमध्ये नवऱ्याकडून होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण ४२.३% आहे.[५]

१९६०च्या दशकात झालेल्या हरितक्रांतीनंतर पंजाबमध्ये शेतीक्षेत्रात झपाट्याने विकास झाला, परंतु फार काळ तो टिकू शकला नाही. हळूहळू उत्पादकता कमी होणे, उत्पादन खर्चात वाढ होणे आणि त्यामुळे कर्जाचा बोजा वाढणे ह्यासारखे प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावायला लागले. ह्यामुळे मोठे भूधारक शेतकरी आणि सीमांत शेतकरी/शेतमजूर ह्यांच्यामधली दरी वाढत गेली. अनेक सीमांत शेतकऱ्यांना उपजीविकेसाठी गावात किंवा शहरांच्या जवळ मजुरी करण्याकडे वळावे लागले. शेतकऱ्यांचे औपचारिक आणि अनौपचारिक मार्गांनी कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले आणि त्यामधून पर्यानाने शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ झाली. सध्या राज्यामध्ये रासायनिक खते आणि कीटकनाशके ह्यांच्या अतिरिक्त वापरामुळे भूजलाचा दर्जा खालावणे, मातीची सुपीकता नष्ट होणे, आरोग्यावर होणारे परिणाम, कॅन्सरच्या रोगाचे वाढते प्रमाण, वाढती व्यसनाधीनता असे अनेक परिणाम दिसून येत आहेत. २०२०मध्ये सरकारने लागू केलेल्या कायद्यांच्या विरोधात एक वर्षाहून अधिक काळ चाललेल्या आंदोलनादेखील शेतीमधील या विदारक परिस्थितीचा संदर्भ आहे.

शेतीमधील या बदलांच्या बरोबरीने शेतीमधील महिलांच्या सहभागावरदेखील परिणाम होत गेला. महिलांचा शेतीमधील सहभाग हा पशुपालन आणि शेतमजूर म्हणून असला तरी शेती कसण्यामध्ये त्यांचा फारसा सहभाग राहिला नाही. नियतकालिक श्रम बल सर्वेक्षणानुसार (२०२२-२३) शेती कसण्यामध्ये महिलांचा सहभाग केवळ १७% असून तोच पशुपालनामध्ये ६४.७६% आहे.[६] पंजाबमध्ये दलित कुटुंबांचे प्रमाण ३२% असून, ही कुटुंबे प्रामुख्याने शेतमजुरीवर अवलंबून आहेत. या कुटुंबांमधील महिला या शेतमजूर म्हणून काम करतात.

राष्ट्रीय कुटुंब आणि आरोग्य पाहणी अहवालातील ग्रामीण महिलांसंबंधीची माहिती बघितली तर सध्या २० ते २४ वयोगटात असणाऱ्या महिलांपैकी ८.७% महिलांचा बालविवाह झाला होता. ग्रामीण भागातील १५ ते ४९ वयोगटातील ७८% महिला साक्षर आहेत आणि केवळ ५२.२% महिलांनी १० वीच्या पुढे शिक्षण घेतलेले आहे. १८ ते ४९ वयोगटातील महिलांमध्ये नवऱ्याकडून होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण १२.६% आहे.[७]

एकसुरी पीकपद्धती, उत्पादनाचा वाढता खर्च, घटती भूधारणा, बाजारावरचे अवलंबित्व, संसाधनांचा ऱ्हास, कर्जबाजारीपणा या सर्व घटकांचे ग्रामीण, उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्या समुदायांवर परिणाम होत असतात. त्यामध्येही संसाधनविरहीत वंचित समूहांवर होणारे परिणाम अधिक गंभीर असतात. त्यांचा जगण्यासाठीचा संघर्ष त्यामुळे वाढतो.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर ग्रामीण महिलांवर होणारा दैनंदिन हिंसाचार, त्याचे स्वरूप आणि प्रकार आणि त्यामुळे होणारे परिणाम समजून घेणे हा या अभ्यासाचा उद्देश होता. ह्याठिकाणी हिंसाचाराची व्यापक व्याख्या केली असून त्यामध्ये पुढील गोष्टींचाही अंतर्भाव होतो – शेतकरी म्हणून ओळख नसणे, संसाधनांवरील अधिकार नाकारला जाणे, मजुरीवरील नियंत्रण आणि जगण्यासाठी महिलांना करावे लागणारे बिनमोलाचे कष्ट. त्याचबरोबर घरगुती हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार या दोन्ही गोष्टी सातत्याने होणाऱ्या हिंसाचाराचा भाग आहेत ज्यामुळे त्यांची सुरक्षितता, स्वास्थ्य आणि आत्मसन्मान ह्यावर परिणाम होतो, स्त्री-पुरुष असमानता वाढते आणि त्यांना शेती क्षेत्रामध्ये पूर्णपणे सहभागी होता येत नाही.

इथून पुढच्या भागांमध्ये महिलांबरोबर केलेल्या अभ्यासातून प्रामुख्याने महाराष्ट्रात काय चित्र दिसले या संदर्भात मांडणी केली आहे.

## जात, वर्ग, लिंगभाव आणि भौगोलिक स्थानामुळे निर्माण होणाऱ्या असमानता

शेतीमधील बदलती परिस्थिती आणि त्याचे ग्रामीण महिलांवर होणारे परिणाम समजून घेत असताना त्या महिलांचा प्रतिकुलतेचा संदर्भ लक्षात घेणे महत्त्वाचे आहे आणि तो या अभ्यासातून प्रकर्षाने समोर आला. सर्व्हेमध्ये नमुना निवड करत असताना गावातील कुटुंबांची जातीनिहाय माहिती मिळवून प्रत्येक जातीमधील १०% कुटुंबांची निवड करण्यात आली होती. एकूण नमुन्यामध्ये महिलांची विभागणी पुढीलप्रमाणे होती – इतर मागास वर्गीय (३५%), अनुसूचित जाती (२२%), सर्वसाधारण जाती (१४%), अनुसूचित जमाती (९%) भटक्या जमाती (९%), विमुक्त जमाती (५%) आणि विशेष मागास वर्ग (५%).

सर्व्हेमधील २१% महिलांनी शालेय शिक्षण घेतलेले नव्हते आणि शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये दहावीच्या पुढे शिक्षण घेतलेल्या महिला कमी होत्या. शिक्षणाचे प्रमाण विशेष करून भूमिहीन मजुरी करणाऱ्या महिलांमध्ये, तसेच अनुसूचित जाती आणि जमातीच्या महिलांमध्ये कमी होते. ३२% महिलांचे लग्नाच्या वेळी वय १८ वर्षांच्या आत होते. परभणी जिल्ह्यात शिक्षण आणि बालविवाह दोन्हीच्या बाबतीत परिस्थिती अधिक वाईट होती. तेथे सध्या ३० वर्षांपर्यंत वय

असणाऱ्या महिलांमध्येदेखील बालविवाहाचे प्रमाण ४९% होते. सर्व्हेमधील ३५% महिलांनी त्यांना घरगुती हिंसाचाराचा अनुभव येत असल्याचे सांगितले. बचतगट वगळता इतर कोणत्याही गावपातळीवरील संस्थांमध्ये महिलांचा समावेश नगण्य होता.

तेलंगणामध्ये परिस्थिती आणखी वेगळी होती. त्याठिकाणी सर्व्हे केलेल्या महिलांपैकी ६६% महिलांनी शालेय शिक्षण घेतलेले नव्हते. तर ८१% महिलांचे लग्नाच्या वेळी वय १८ वर्षांच्या आत होते. पंजाबमध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ४६% आणि १८% होते. सर्व राज्यांमध्ये अधिकृत आकडेवारीच्या तुलनेत परिस्थिती अधिक वाईट आहे असे दिसले.

सर्व्हेमधील महिलांपैकी १४% महिला विधवा तर तीन टक्के महिला घटस्फोटीत/परित्यक्ता होत्या. एकूण विधवा महिलांपैकी २३% महिला या आत्महत्याग्रस्त कुटुंबातील होत्या.

सर्व्हेमधील ५३% महिला भूमिहीन कुटुंबातील होत्या आणि भूधारक कुटुंबांमध्ये छोट्या आणि सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण ८६% होते. भूमिहीनतेचे प्रमाण सर्वसाधारण जाती आणि इतर मागास वर्गीय ह्यांच्या तुलनेत अनुसूचित जाती, जमाती, तसेच इतर वंचित जातींमध्ये अधिक होते. भूधारक कुटुंबांपैकी केवळ ३६ टक्के कुटुंबांकडे सिंचनाची सोय होती. भूधारक कुटुंबातील २५% महिलांच्या नावाने जमीन होती आणि त्यामध्ये विधवा महिलांच्या नावाने जमीन असण्याचे प्रमाण अधिक होते.

तेलंगणामध्ये भूधारणेच्या संदर्भात परिस्थिती वेगळी होती. भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण १६% होते आणि भूधारक कुटुंबातील महिलांपैकी ३४% महिलांच्या नावाने जमीन होती. पंजाबमध्ये १२% महिलांनी त्यांच्या नावाने जमीन असल्याचे सांगितले.

ह्या महिलांना शेती आणि शेतमजुरी वगळता रोजगाराच्या इतर संधी काहीच उपलब्ध नव्हत्या. भूमिहीनतेचे प्रमाण अधिक असल्याने केवळ मजुरीवर अवलंबून असणाऱ्या महिलांचे प्रमाण ५३% होते. तसेच भूधारक कुटुंबांमध्येही स्वतःच्या शेतीच्या बरोबरीने मजुरी करणेदेखील महिलांना उपजीविकेसाठी गरजेचे होते. शेती आणि मजुरी ह्याशिवाय इतर काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण केवळ दोन टक्के होते. तेलंगणामध्ये परिस्थिती महाराष्ट्राशी मिळतीजुळती असली तरी पंजाबमध्ये चित्र वेगळे होते. तेथील ७७% महिला पशुपालन करणाऱ्या, ३०% महिला शेतमजुरी करणाऱ्या तर केवळ ९ टक्के महिला शेती कसणाऱ्या होत्या. ह्यामध्ये प्रामुख्याने शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा महिलांचा समावेश होता.

कमी शिक्षण, लहान वयातील लग्न, कुटुंबातील दुय्यम स्थान, हिंसाचाराचे अनुभव, वैवाहिक स्थितीवर अवलंबून असलेले समाजातील स्थान, साधनहीनता आणि रोजगाराच्या मर्यादित संधी अशा मुळातच प्रतिकूल परिस्थितीतून येणाऱ्या या महिला आहेत. त्याचबरोबर वंचित जातींमधील आणि भूमिहीन कुटुंबांमधील महिलांच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अधिक भर पडते हे समोर आले. शेतीमधील बदललेली परिस्थिती आणि त्याचे महिलांवर होणारे परिणाम हे या सर्व प्रतिकूलतेच्या संदर्भात समजून घेणे गरजेचे आहे.

## शेतीचे मॉडेल आणि त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न

''तणनाशकं वापरून जमीन खराब झाली आहे, त्यामध्ये सोयाबीन शिवाय काही उगवत नाही, पण तणनाशक तर वापरावं लागतंय. मजुरीचे दर वाढलेले आहेत, त्यामुळे निंदायला मजूर लावणं परवडत नाही''– अकोला जिल्ह्यातील महिला शेतकरी

अभ्यास केलेल्या भागांमध्ये मागील दोन दशकांमध्ये हळूहळू एकसुरी पीकपद्धती रूढ झाली आहे. कापूस आणि सोयाबीन ही दोन मुख्य पीके इथे घेतली जातात. त्याचबरोबर रसायनांचा वापरदेखील वाढला आहे. त्यामुळे बाजारावरचे अवलंबित्व आणि पर्यायाने

उत्पादनाचा खर्च वाढला आहे. ह्याचा परिणाम मातीच्या गुणवत्तेवर तर झाला आहेच पण त्याचबरोबर अन्न आणि पोषण सुरक्षेवर त्याचे गंभीर परिणाम झाले आहेत. अन्नधान्य आणि भाजीपाल्यासाठी बाजारावर अवलंबून असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या आहारावर होतो. काही महिला धान्य मिळविण्यासाठी उक्त्याने कामे घेणे, किंवा शेतातून उरलेले दाणे उचलणे अशा प्रकारची कष्टाची आणि वेळखाऊ कामे स्वीकारतात. जेणे करून त्यांच्या कुटुंबाची अन्नधान्याची गरज पूर्ण होऊ शकेल. एकसुरी पीक पद्धतीचा कामाच्या उपलब्धतेवरही मोठा परिणाम होतो असे दिसते.

### कमी झालेले काम आणि मजुरांचा तुटवडा ह्यामधील विरोधाभास

''पूर्वी इतर पिकं असायची त्यावेळी भरपूर काम रहायचं. आता सोयाबीनमध्ये बायांना काम नाही. ते तणनाशक मारतात आणि हार्वेस्टरने कापणी करतात. मशीनच माणसांची सगळी कामं करतंय. मग आम्ही काय करायचं?'' - अकोला जिल्ह्यातील शेतमजूर महिला

एका बाजूला शेती कसणाऱ्या महिला वेळेवर मजूर मिळत नाहीत असे सांगतात, तर दुसऱ्या बाजूला मजुरी करणाऱ्या महिलांना काम उपलब्ध नाही असे दिसून येते. सर्व्हेमधल्या ६५% मजूर महिलांनी मागील काही वर्षांमध्ये त्यांचे काम कमी झाले आहे असे सांगितले. २०२२-२३ या वर्षामध्ये मजुरी करणाऱ्या महिलांना सरासरी १२३ दिवसांचे काम मिळाले असे दिसून आले.

सर्व शेतकरी एकच पीक घेत असल्याने ठरावीक काळ काम उपलब्ध असते, त्यावेळी शेतकऱ्यांना मजुरांचा तुटवडा जाणवतो. पण वर्षातील मोठा काळ काम उपलब्ध नसते त्यावेळी मजुरांची अडचण होते. ज्या काळात मजुरांची आवश्यकता आहे त्या काळात मजूर मिळणार नाहीत या विचाराने शेतकरी मशीनने कामे करून घेणे, तणनाशके वापरणे असे पर्याय घेतात. तसेच शेतकरी महिला परस्परांच्या शेतात काम करून मजुरांच्या प्रश्नांवर तोडगा काढतात. तर शेतमजूर महिलांना इतर काळामध्ये कामाच्या शोधात रहावे लागते.

### शेतमजूर महिलांना येणारे प्रश्न

''उन्हाळ्यात मी बोरं विकते. आधी सिझनमध्ये गोळा करून वाळवून ठेवायची. मग उन्हाळ्यात काम नाही मिळालं की त्यामध्ये मीठ-साखर घालून माझ्या मुलाकडे विकायला देते. तो गावात फिरून ती विकतो. एका ग्लासला एक रुपया असे दिवसाला ३०-४० रुपये निघतात.'' - परभणीमधील शेतमजूर महिला

अभ्यासात सहभागी झालेल्या महिलांमध्ये केवळ मजुरीवर अवलंबून असणाऱ्या महिलांचे प्रमाण ५३% होते. कामाचे कमी झालेले दिवस आणि मर्यादित उत्पन्न ह्यामुळे मजूर महिलांची आर्थिक ओढाताण होते. रोजच्या गरजांसाठीही पैसे नाहीत अशी वेळ अनेकदा येत असल्याने पैसे उधार घ्यावे लागतात. नंतर मजुरी करण्याच्या बोलीवर घेतलेले उधार पैसे फेडताना अनेकदा त्यांना जास्तीचे काम करावे लागते. अशा प्रकारे मजुरांचे बांधले जाणे वाढताना दिसत आहे. काम कमी असताना काम मिळेल की नाही हे जातीवरदेखील ठरते. शेतकरी स्वतःच्या जातीमधील महिलांना प्राधान्याने काम देतात आणि वंचित जातींमधील महिलांच्या कामाच्या उपलब्धतेवर त्याचा परिणाम होतो. तसेच पारधी समाजातील महिलांना ठरावीक कामे नाकारली गेल्याने काम मिळविण्यासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागतो. काही महिला काम मिळत नसल्याने स्थलांतर करून जातात आणि त्याठिकाणी कमी मोबदल्यात अतिशय कष्टाची कामे करतात. कोणत्याही सोयी सुविधा नाहीत, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता नाही अशा परिस्थितीमध्ये वर्षातील काही महिने त्यांना काढावे लागतात.

## अन्न आणि पोषण सुरक्षा

''आता आम्हाला कोणतेही रेशन मिळत नाही, म्हणून आम्ही गव्हासाठी उक्तं घेतो. पण गावात गहू करणारे शेतकरी पण फार नाहीत.'' - अकोल्यामधील शेतकरी महिला

शेतीमध्ये होत चाललेल्या या बदलांचा अन्न आणि पोषण सुरक्षेवर परिणाम होतो. बहुतेक कुटुंबे ही अन्नधान्य आणि आहारातील इतर गोष्टींसाठी बाजारावर अवलंबून आहेत. अनेक कुटुंबांना तांदूळ आणि गहू रेशनव्यवस्थेमधून मिळत असला तरी त्याचे प्रमाणही कमी झाले आहे. गहू, तांदूळ आणि डाळ वगळता इतर पोषक अन्नपदार्थ, जसे की भाज्या, फळे, दुग्धजन्य पदार्थ आणि मांस ह्यांचे महिलांच्या रोजच्या आहारातील प्रमाण फार कमी आहे असे दिसून आले.

## आरोग्यावर होणारे परिणाम

''आजारी असलं तरी दवाखाना कुठं आहे? आणि जरी असला तरी पैसे कुठं आहेत?''

महिलांच्या कामाचे स्वरूप अत्यंत कष्टाचे असल्याने त्याचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. सर्व्हेमध्ये महिलांनी नोंदवलेल्या प्रमुख आरोग्याच्या समस्यांमध्ये पाठदुखी, अंगदुखी, सांधेदुखी, डोकेदुखी आणि अशक्तपणा ह्यांचा समावेश होता. सर्व्हेमधील महिलांनी मानसिक आरोग्याच्या समस्या असल्याचेही मोठ्या प्रमाणात सांगितले. काम शोधण्याच्या चिंता, कुटुंबाची काळजी, मुलांच्या शिक्षणाची धडपड आणि घरगुती हिंसाचार ह्यामुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अनेक महिलांनी चिडचिडेपणा (६२%), झोप न येणे (५९%) आणि चिंता वाटणे (६०%) अशा समस्या असल्याचे सांगितले.

सर्व्हेमधील चार टक्के महिलांची गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया झाली होती. NFHS-5च्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्रासाठी हे प्रमाण तीन टक्के आहे. तेलंगणामध्ये मात्र या शस्त्रक्रियांचे प्रमाण मोठे होते. NFHS-5च्या अहवालाप्रमाणे तेलंगणामध्ये हे प्रमाण ७.७% आहे. पण सर्व्हेमधल्या २७.२% महिलांनी त्यांची शस्त्रक्रिया झाल्याचे सांगितले.

सार्वजनिक आरोग्य सेवांचा अभाव अभ्यासामधून मोठ्या प्रमाणात लक्षात आला. गेल्या दोन वर्षांत आरोग्यावर मोठा खर्च झाल्याचे ३७% महिलांनी सांगितले. खर्चाची सरासरी रक्कम ४० ते ५० हजार रूपये होती. यापैकी ९२% महिला खाजगी रुग्णालयात गेल्या, तर फक्त आठ टक्के महिलांनी सरकारी रुग्णालयाचा आधार घेतला.

## बाजाराशी संबंधित अडचणी

''उधारीवर खतं-बियाणं घेतली की त्यासाठी जास्तीचे पैसे द्यावे लागतात. रोख पैसे दिले तर जो माल ५,००० रुपयांना मिळेल त्याला ५,५०० ते ६,००० रुपये द्यावे लागतात. आणि वर दोन टक्के व्याज. पण करणार काय?'' - यवतमाळमधील शेतकरी महिला

''मुलाच्या फीसाठी पैसे पाहिजे होते, त्यामुळे त्यादिवशी मिळेल त्या भावाला होता तो कापूस विकून टाकला. तो ओला आहे म्हणून व्यापाऱ्याने भाव अजूनच कमी केला.''- यवतमाळमधील महिला शेतकरी

वर्षाच्या सुरुवातीला पुरेसे भांडवल नसल्याने बहुतेक शेतकरी महिलांना उधारीवर निविष्ठा घ्याव्या लागतात. त्या मुळात जास्त रकमेने घ्याव्या लागतात, पण अनेकदा विकतानादेखील जिथून निविष्ठा घेतल्या त्याच व्यापाऱ्याला माल विकणेदेखील बंधनकारक असते. वेगेवगळ्या कारणांमुळे चांगला भाव मिळेपर्यंत थांबणे छोट्या शेतकऱ्यांना शक्य होत नाही आणि तोटा सहन करून मालाची विक्री करावी लागते. त्यांच्याकडे माल साठवायला जागा नसते. तसेच पैशांची गरज असल्याने फार काळ विक्रीसाठी थांबणे शक्य होत नाही. महिला शेतकऱ्यांचा बाजाराशी येणारा संपर्क फार कमी आहे.

खरेदी-विक्रीचे बहुतेक व्यवहार हे पुरुषांकडून केले जात असल्याने त्याचा परिणाम महिलांना मिळणाऱ्या उत्पन्नावर होतो.

**कर्जाचे ओझे**

''इथे ज्याच्यावर कर्ज नाही असं तुम्हांला कोणीच सापडणार नाही. त्याशिवाय शक्यच नाही. कर्ज पूर्ण फिटलं असं कधी होतच नाही. जात्यावर दळल्यासारखं ते चक्र चालूच राहतं.'' - यवतमाळमधील महिला शेतकरी

शेतीमधील उत्पन्नाची अनिश्चितता आणि मजुरीमधील कामाची अनुपलब्धता ह्यामुळे महिलांना मोठ्या प्रमाणात कर्जावर अवलंबून रहावे लागते. महिलांच्या नावाने असणाऱ्या बँक खात्यांचे प्रमाण मोठे असले, तरी बँकेतून घेतलेल्या कर्जांचे प्रमाण मात्र त्याच्याशी सुसंगत नाही. शेतीशिवाय इतर सर्व कारणांसाठी महिला अनौपचारिक स्त्रोतांवर अवलंबून होत्या. केवळ शेती नाही तर मुलांचे शिक्षण, आरोग्य ह्याचबरोबर रोजच्या खर्चासाठी घेतलेल्या कर्जांचे प्रमाणही मोठे होते. अनुसूचित जातींमध्ये शेतीशिवाय इतर घरगुती गोष्टींसाठी घेतलेल्या कर्जांचे प्रमाण अधिक होते, आणि ही कर्जे प्रामुख्याने अनौपचारिक स्त्रोतांकडून घेतलेली होती. मायक्रोफायनान्स आणि सावकाराकडून घेतलेल्या कर्जाचा व्याजदर मोठा होता आणि तो फेडण्यासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागतो असे दिसले. त्यासाठी सोने गहाण ठेवणे, शेळ्या विकणे, कमी भावाला माल विकणे असे पर्याय त्या निवडत असतात. वेळच्या वेळी कर्ज चुकवले गेले पाहिजे ह्यासाठीचा मानसिक ताणही मोठा असतो. इतर दोन राज्यांशी तुलना करता पंजाबमध्ये सरासरी कर्जाची रक्कम अधिक होती.

**सरकारचे अपयश**

ह्या अभ्यासातून महिलांना सामाजिक सुरक्षा आणि इतर योजनांचा लाभ किती मर्यादित प्रमाणात मिळतो आहे हे स्पष्टपणे दिसून आले. पेन्शन, मातृत्व वंदन अशा महिलांसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ फार मोजक्या महिलांना मिळाला होता. शेतीशी संबंधित पी एम किसान, पीक विमा या योजनांचा लाभ मिळालेल्या महिलांचे प्रमाणदेखील फार कमी होते. त्याचबरोबर आरोग्य सेवा, रोजगार हमी इत्यादी उपक्रम पूर्णतः अपयशी ठरलेले असल्याचे अभ्यासातून समोर आले. सर्व्हेमधील शेतमजुरी करणाऱ्या महिलांपैकी केवळ ३३% महिलांकडे जॉब कार्ड होती. एकूण मजुरी करणाऱ्या महिलांपैकी केवळ तीन टक्के महिलांना रोजगार हमीमधून २०२२-२३मध्ये काम मिळाले. तेलंगणामध्ये विधवा पेन्शन आणि रोजगार हमी या दोन्ही योजनांमध्ये अधिक चांगली परिस्थिती दिसून आली. तेलंगणामधील सर्व्हेमध्ये सहभागी असणाऱ्या एकूण विधवा महिलांपैकी ८२.७% महिलांना पेन्शनचा लाभ मिळत होता. तसेच ८४% कुटुंबांकडे जॉब कार्ड होती आणि ७७% कुटुंबांनी कामाची मागणीदेखील केली होती.

कामाची अनुपलब्धता, आर्थिक ओढाताण आणि कर्जाचे ओझे या सगळ्याशी झगडत असताना पुरेशी सामाजिक सुरक्षा सरकारकडून न मिळाल्याने त्यांचा संघर्ष अधिकच वाढतो.

**आयुष्याचे वेगवेगळे भाग व्यापणारा हिंसाचार**

सर्व्हेमधील ३५% महिलांनी त्यांना कौटुंबिक हिंसाचाराचा अनुभव येत असल्याचे सांगितले. शेतकरी महिलांना कामाच्या ठिकाणी येणारे हिंसाचाराचे वेगवगळे अनुभव अभ्यासातून समोर आले. पुरुष मजुरांकडून केली जाणारी अरेरावी, मजुरीच्या ठिकाणी होणारा अन्याय, जातीमुळे केला जाणारा अन्याय, बाजारात व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक, सरकारी

कार्यालयांमध्ये मिळणारी वागणूक, कर्जवसुलीसाठी येणाऱ्या लोकांचा त्रास अशा अनेक प्रकारच्या अनुभवांमधून तो समोर आला. त्याचबरोबर शेती क्षेत्रात गुंतलेल्या महिलांसाठी घरगुती आणि कामाच्या ठिकाणी होणारा हिंसाचार ह्यामधील सीमारेषा पुसट असतात हेही अभ्यासातून समोर आले. कुटुंबातील लोकांनी संपत्तीवरचा अधिकार न देणे, नवऱ्याने दारूच्या व्यसनासाठी शेतामधील माल विकून टाकणे, स्थलांतर करून गेलेल्या ठिकाणी वाढलेली मारहाण, स्वतःच्या शेतात बोलावलेल्या पुरुष मजुरांकडून होणारी अरेरावी अशी कितीतरी उदाहरणे महिलांनी सांगितली, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या उपजीविकेवर होतो.

कौटुंबिक आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसाचाराचे अनुभव अनेक येत असले तरी त्यासाठी मदत मागणाऱ्या महिलांचे प्रमाण फार कमी होते. 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, निषेध आणि निवारण) कायदा, २०१३' अंतर्गत जिल्हा पातळीवर समित्या स्थापन झालेल्या असल्या तरी महिला तिथपर्यंत पोहोचत नाहीत. एकतर शेतीच्या संदर्भात कामाचे ठिकाण कोणते ह्याबाबत स्पष्टता नाही आणि त्यासाठी तक्रार करण्यासाठी कोठे जायचे ह्याबद्दल महिलांना माहिती नाही. ज्यांना कौटुंबिक हिंसाचाराचा अनुभव होता अशा महिलांपैकीही केवळ सहा टक्के महिला पोलीस स्टेशनमध्ये मदतीसाठी गेल्या. कौटुंबिक हिंसाचाराच्या संदर्भात महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराच्या विरोधात काम करणारी मोठी संरचना अस्तित्त्वात असली तरी ती महिलांपर्यंत पोहोचू शकत नाही असे दिसले.

आजच्या शेतीच्या बदलत्या परिस्थितीचे महिलांची उपजीविका, त्यांचे आरोग्य आणि स्वास्थ्य ह्यावर कसे परिणाम होत आहेत हे या सर्व निष्कर्षांमधून प्रकर्षाने समोर येत आहे. तसेच वंचित समुदायांमधील महिला – दलित, आदिवासी, भटक्या समुदायाच्या महिला, एकट्या महिला, भूमिहीन मजूर महिला – ह्यांच्यावर होणारे विशेष परिणामही स्पष्ट होत आहेत. महाराष्ट्राप्रमाणेच तेलंगणा आणि पंजाबमध्येही शेती आणि शेतकरी महिलांच्या परिस्थितीमध्ये फरक नाही. महाराष्ट्रातील शेतीपेक्षा उद्योग आणि आणि ठरावीक पीकांना प्रोत्साहन देणारे धोरण, नवीन राज्याच्या स्थापनेनंतर बदललेली तेलंगणाच्या धोरणांची दिशा आणि पंजाबमध्ये हरितक्रांतीचे दुष्परिणाम लक्षात येऊनही त्याच मार्गाने जाणारी धोरणे या सर्वांचा परिणाम शेती व्यवस्थेवर होत आहे. शेतीमध्ये बदलत जाणारी ही परिस्थिती महिला शेतकरी आणि शेतमजुरांवर अधिक परिणाम करणारी आहे.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर ही परिस्थिती बदलण्यासाठी काय करता येईल ह्याबद्दल मांडणी करणे हादेखील अभ्यासाचा एक उद्देश होता. त्यादृष्टीने केलेली सर्व मांडणी ह्याठिकाणी नमूद करणे शक्य नाही, परंतु त्यामधील काही प्रमुख मुद्दे पुढील भागात नमूद केले आहेत.

### पुढील दिशा

हे सर्व निष्कर्ष पाहता महिला शेतकऱ्यांना अधिकार मिळवून देण्यासाठी, त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, आणि कामाच्या ठिकाणी त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे हे स्पष्ट आहे. त्यादृष्टीने बियाणे-खतांच्या कंपन्यांऐवजी, कोरडवाहू प्रदेशातील शेती; तेथील पिके आणि तेथील शेतकरी ह्यांना प्राधान्य देणारे धोरण आखणे, विविध अन्नधान्याच्या पिकांना प्रोत्साहन देऊन रेशनमध्ये त्यांचा समावेश करणे, सामाजिक सुरक्षा बळकट करणे, स्थानिक रोजगाराच्या संधी वाढविणे, महिलांचा संसाधनांवरील अधिकार आणि निर्णयप्रक्रियेतील सहभाग वाढविणे, त्यांना शेतकरी म्हणून ओळख मिळवून देणे, संरचनात्मक असमानतांचे निवारण करण्यासाठी प्रयत्न करणे या काही प्रमुख मागण्या आहेत. त्याचबरोबर कौटुंबिक

आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या हिंसाचाराला ग्रामीण भागाच्या संदर्भात वेगवेगळे न पाहता तो परस्परांशी संबंधित आणि व्यापक स्वरूपाचा आहे या दृष्टीने त्याकडे पहिले जाणे महत्त्वाचे आहे हे अभ्यासातून अधोरेखित होते आहे.

●

ह्या अभ्यासाच्या रिसर्च टीममध्ये या लेखाच्या लेखकांच्या बरोबरच तेलंगणामधील एस. आशालता, एस. सीतालक्ष्मी, विजय रुक्मिणी राव, आणि एन. इंदिरारानी, पंजाबमधील अनुपमा, महाराष्ट्रामधील वनिता तुमसरे आणि ऋचा वसुमती सतीश ह्यांचा समावेश होता. त्याचबरोबर महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांमधून माधुरी खडसे, शालिनी वानखडे आणि राजू केंढे हे अभ्यासात सहभागी झाले होते.

१. Government of Maharashtra (2023) Economic Survey of Maharashtra (2022-23)

२. https://www.ncrb.gov.in/

३. Government of India. 2021. National Family Health Survey (NFHS-5) 2019-21 https://ruralindiaonline.org/hi/library/resource/national-family-health-survey-nfhs-5-2019-21-maharashtra/

४. Government of India.Agriculture census 2015-16 https://agcensus.da.gov.in/chartin.html

५. Government of India. 2021. National Family Health Survey (NFHS-5) 2019-21 https://ruralindiaonline.org/ur/library/resource/national-family-health-survey-nfhs-5-2019-21-telangana/

६. Government of India. 2023. Periodic Labour Force Survey 2022-23 https://www.mospi.gov.in/publication/annual-report-periodic-labour-force-survey-plfs-july-2022-june-2023

७. Government of India. 2021. National Family Health Survey (NFHS-5) 2019-21 https://ruralindiaonline.org/en/library/resource/national-family-health-survey-nfhs-5-2019-21-punjab/

## गार्गी मांगुळकर... (पृष्ठ क्र. १०वरून)

माध्यमातून शेतकरी स्त्रियांना सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न 'मकाम' करत आहे.

पर्यावरणस्नेही शेती आणि त्यामधील महिलांचा सहभाग या विषयावर नैसर्गिक शेतीसाठीची राष्ट्रिय पातळीवरील युती (National Coalition of Natural Farming or NCNF) आणि कोरडवाहू शेतीच्या पुनरुज्जीवनासाठी गट (Revitalising Rainfed Agriculture Network or RRAN) ह्यांच्या बरोबर मिळून मकामचे काम चालू आहे.

### पुढील दिशा

दहा वर्षांमध्ये 'मकाम'ने महिला शेतकऱ्यांची ओळख, जमीन अधिकार, सामाजिक सुरक्षा आणि शाश्वत शेतीक्षेत्रात नेतृत्व विकासाठी भरीव कामगिरी केली आहे. कृषी संकट, हवामान बदल आणि कामगारांवरील जास्त कामाचे ओझे, यांसारख्या आव्हानांवर सातत्याने काम करणे आवश्यक आहे. पुढील काळात 'मकाम'चे उद्दिष्ट्य अधिक व्यापकतेने साध्य करणे, सहाय्यक गटांना पाठबळ देणे आणि महिला केंद्रित धोरणांसाठी प्रभावी भूमिका बजावणे हे आहे. दुसऱ्या दशकात प्रवेश करताना 'मकाम'चा दृष्टिकोन सामूहिक कृती, समता आणि लवचिकतेवर आधारित आहे. नवकल्पना आत्मसात करत आणि उदयोन्मुख सामाजिक-राजकीय आव्हानांना प्रभावीपणे प्रतिसाद देत, 'मकाम' महिला शेतकऱ्यांचे अधिकार पुढे नेण्याचा निर्धार कायम ठेवते. न्याय, समता, समावेशकता, परिवर्तनशीलता आणि स्त्रीवादी कृषी, पर्यावरणवाद हे कार्याचे केंद्र मानून 'मकाम' वाटचाल करेल.

●

१. https://makaam.in/

२. https://makaam.in/category/farm-suicides/

(मूळ इंग्रजी लेखाच्या मराठी भाषांतरासाठी स्त्री आणि लिंगभाव अभ्यास विभागाच्या **सोनाली वाघ** यांचे सहाय्य लाभले आहे.)

# संशोधन पद्धती आणि संशोधकांचे अनुभव

वनिता तुमसरे

प्रस्तुत लेख महाराष्ट्र, तेलंगणा आणि पंजाबमधील शेती क्षेत्रातील अरीष्ट आणि ग्रामीण महिलांवर होणारा संरचनात्मक हिंसाचार या विषयावर संशोधन करणाऱ्या संशोधकांच्या अनुभवांची मांडणी करतो. संशोधकांच्या अनुभवांचे दस्तऐवजीकरण संशोधकांच्या वैयक्तिक प्रगतीला मदत करते आणि शैक्षणिक समुदायाला संशोधनाच्या आव्हाने, संधी आणि परिणाम समजून घेण्यास मदत करते. अश्या अनुभवांमुळे संशोधनातील उणीवा उघड होण्यास, संशोधन पद्धती सुधारण्यास आणि अदृश ज्ञानाचे आदान-प्रदान करण्यास मदत होते. संशोधकांच्या अनुभवांचे दस्तऐवजीकरण हे स्त्रीवादी संशोधन दृष्टिकोनातील तत्त्व वैयक्तिक आत्मपरीक्षण, सत्तासंबंध आणि संशोधकांच्या सामाजिक ओळखीवर लक्ष केंद्रित करते. या लेखात, संशोधनाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर सहभागी असणाऱ्या अभ्यासगटाला विविध टप्प्यांवर आलेले अनुभव आणि त्या प्रक्रियेतून मिळालेली दृष्टी यांचा आढावा घेतला आहे.

संशोधकांच्या गटाने सुरुवातीपासूनच सर्वंकष असा स्त्रीवादी दृष्टिकोन अवलंबून शेतकरी स्त्रियांच्या सर्व समस्यांचा बारकाईने अभ्यास केला. उषा सीतालक्ष्मी म्हणतात त्या प्रमाणे, ''आंतरछेदितता दृष्टिकोनामुळे लिंगभाव, वर्ग, जात आणि इतर घटकांद्वारे महिलांच्या अनुभवांचा अभ्यास करण्यात आम्हाला मदत झाली. कारण हा दृष्टिकोन महिलांच्या असमान संसाधन वितरण, कामाची अदृश्यता आणि संरचनात्मक हिंसा यावर लक्ष केंद्रित करतो.''

स्त्रीवादी दृष्टिकोनामुळे संशोधकांना स्त्री शेतकऱ्यांच्या समस्यांचा अधिक खोलवर आणि व्यापक अभ्यास करणे शक्य झाले. ज्यामुळे त्यांचे सक्षमीकरण, संसाधनांचे पुनर्वितरण आणि पुरुषसत्तात्मक संरचनांचा बिमोड करण्यासाठी धोरणात्मक बदल सुचवता आले. कृषी संदर्भातील हिंसाचाराच्या संरचनात्मक मुळांचा उलगडा करण्यासाठी गटाने केलेले सामूहिक प्रयत्न आणि आंतरछेदितता दृष्टिकोन महत्त्वपूर्ण ठरला.

**संशोधन आराखड्याची निवड आणि संशोधकांचे अनुभव**

शेतीतील अरिष्ट आणि लिंगभाव आधारित हिंसाचाराच्या विश्लेषणासाठी, संशोधकांनी शेतकरी स्त्रियांच्या अनुभवांचा अभ्यास केला. त्यांनी शेतजमिनीवरील मालकी हक्क, असमान वेतन, कर्जबाजारीपणा, आरोग्य आणि हिंसा यांसारख्या मुद्द्यांवर संशोधन प्रश्न समाविष्ट केले. विशेष म्हणजे, कामाच्या ठिकाणी स्त्री शेतकऱ्यांवर

लेखिका 'मकाम' आणि 'सोपेकॉम'शी जोडलेल्या आहेत.
vanitatumsare07@gmail.com

होत असलेल्या हिंसाचाराचे अनुभव, स्वरूप उलगडण्याच्या दृष्टीने संशोधकांनी विविध सहभागी पद्धतींचा अवलंब केला होता. या प्रक्रीयेदरम्यान संशोधकांना हे स्पष्टपणे उलगडले, स्त्रियांवरती होणारी हिंसा ही स्त्रियांना हिंसाच वाटत नाही, अशी पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेने तजवीजच करून ठेवली आहे.

या संदर्भात माधुरी खडसे आणि शालिनी वानखेडे यांचे अनुभव बोलके आहेत.

माधुरी खडसे – ''मी स्वतः शेतकरी आहे. महिलांसोबत काम करताना अनेकदा त्यांचे अनुभव ऐकले होते, परंतु त्यावर खुलून कधीच चर्चा झालेली नव्हती, कारण महिलांमध्ये नेहमी भीतीची भावना असल्याने आणि सामाजिक दबाव असल्याने, त्याकडे हिंसा म्हणून न बघता, ती सामान्य बाब म्हणून दुर्लक्ष करण्याची आणि सहन करण्याची वृत्ती महिलांमध्ये अधिक आहे.''

शालिनी वानखडे सांगतात, ''एक संशोधक टीमचा भाग म्हणून जेव्हा मी महिलांशी त्यांच्यावर होत असलेल्या हिंसाचाराबाबत अनुभव जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला शेती क्षेत्रातील महिला हिंसाचाराचे अनेक पैलू समजता आले, ज्यावर मी स्वतः कधी विचार केलेला नव्हता.''

या अभ्यासादरम्यान तथ्य संकलनासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक पद्धती वापरण्यात आल्या, ज्यामुळे विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक अशी दोन्ही प्रकारची माहिती मिळाली. माधुरी खडसे, शालिनी वानखडे आणि राजू केंढे यांनी सांगितले, की त्यांनी स्थानिक परिचित आणि गावातील सहभागींशी आत्मविश्वासाने संवाद साधण्याची क्षमता असलेले गट तयार केले होते. या प्रक्रियेचा सकारात्मक प्रभाव सांगताना स्थानिक अभ्यासकांनी सांगितले, की ''तथ्य संकलनाची संपूर्ण प्रक्रिया आमच्यासाठी नवीन असली तरी, त्यामध्ये आम्हाला आमच्या शेतकरी आई–बहिणींच्या आणि इतर महिला शेतकऱ्यांच्या संघर्षांची आणि धावपळीची जवळून ओळख मिळाली, जी आधी फारच दुर्लक्षित होती.'' यवतमाळच्या शिवानी आणि तिच्यासारख्या अनेक स्थानिक संशोधकांनी सांगितले की, तथ्य संकलनाच्या प्रक्रियेमुळे त्यांचे शेतकरी स्त्रियांकडे व त्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याचे दृष्टिकोन बदलले. तसेच, त्यांनी स्वतःच्या कुटुंबातील शेतकरी पालकांकडे विशेषकरून स्वत:च्या आईकडे अधिक आदराने बघायला सुरुवात केली.

संशोधक आणि सहभागी यांच्यामधील सत्तेची असमानता कमी करण्याचे प्रयत्न सहभागी संशोधन पद्धतीच्या वापरातून केले गेला. त्याबाबतच्या अनुभवांवर भाष्य करताना संशोधकांनी संवाद, संवेदनशीलता, ऐकण्यावर आणि समान सहभागावर भर दिला, ज्यामुळे स्त्रियांच्या अनुभवांना महत्त्व देऊन ज्ञान निर्मितीची प्रक्रिया सशक्त झाली.

उषासीतालक्ष्मी याबाबत म्हणतात, ''ऐकणे, ऐकवणे आणि सांगणे, सांगताना जबाबदारी आणणे, अनुभव लिहून घेणे, नंतर महिलांचे अनुभवांना त्यांनाच ऐकवणे. त्यांना विचारणे की, त्यांच्याबाबत आपण लिहिलेली ही कहाणी/कथा त्यांना अशा प्रकारे लिहायची होती का? ती अशीच इतरांना ऐकवायची होती का? सांगायची आहे का? महिलांना विचारणे की, त्या त्यांच्या कहाणी सोबत त्यांचे नाव जोडू इच्छितात, किंवा त्यात काही बदल करू इच्छितात का?''

### माहिती संकलन आणि विश्लेषण

माहिती संकलन आणि विश्लेषण करताना सहभागींच्या अनुभवांना त्यांच्या दृष्टिकोनातून अर्थ देणे हे संशोधकांचे विशेष कौशल्य असते. या संदर्भात स्त्रीवादी संशोधक सीमा कुलकर्णी, स्नेहा भट, अनुपमा, रुक्मिणी आणि इतर संशोधक सांगतात की, पुरुषसत्तात्मक संरचनांमुळे महिलांचे आवाज दडपले जातात. अनुपमा उपल म्हणाल्या, ''मला पंजाबमधील

शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नांचे नव्याने विश्लेषण करताना आश्चर्यकारक अनुभव आले. हरित क्रांतीने पंजाबच्या शेतकरी स्त्रियांना हिरो म्हणून सादर केले, परंतु स्थानिक परिस्थिती मात्र महिलांच्या वेदनांनी व्यापलेली आहे.''

स्नेहा भट नमूद करतात की, ''तथ्यांचे विश्लेषण करताना स्त्रियांच्या शब्दात फेरफार न करता हिंसाचाराचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी एफजीडी (फोकस ग्रुप डिस्कशन) आणि केस स्टडीजसारख्या माध्यमांचा उपयोग झाला.''

**संशोधन प्रक्रियेतील आव्हाने आणि मिळालेले धडे**

शेतकरी स्त्रियांशी संवाद साधताना विश्वास निर्माण करणे, गोपनीयतेचा आदर राखणे आणि सामाजिक दबावाचा सामना करणे ही अशा प्रकारच्या संशोधनात प्रमुख आव्हाने ठरतात.

माधुरी खडसे आणि शालिनी वानखडे म्हणल्या त्याप्रमाणे स्त्रियांना सामाजिक दबावामुळे त्यांच्या खाजगी अनुभवांबद्दल बोलणे कठीण जाते. मात्र, विश्वास, सुरक्षितता आणि सतत क्षेत्रभेटींमुळे आणि संवेदनशीलतेमुळे त्यांच्यातील संवाद सुलभ झाला. तेलंगणातील स्त्रियांशी चर्चा करण्यासंदर्भात इंदिरा राणी सांगतात, की त्यांनी स्त्रियांना चर्चेसाठी सुरक्षित जागा उपलब्ध करून दिली आणि पुन्हा पुन्हा भेटी घेऊन त्यांच्या अनुभवांचे दस्तऐवजीकरण करणे त्यांना शक्य झाले.

अनुपमा म्हणतात, ''मी सामान्यतः महिला शेतकऱ्यांच्या लवचिकतेबद्दल जागरूक होते, परंतु त्यांच्या सातत्यपूर्ण अडचणींवर मात करण्याची आणि आत्मसन्मानाने जगण्याची त्यांची क्षमता पाहून मी खूप प्रभावित झाले. त्यांची नैतिक बुद्धिमत्ता, अडचणींमध्ये सुद्धा आनंद आणि हास्य शोधण्याची वृत्ती, आणि जिजीविषा मला भविष्याबद्दल आशा देऊन गेली.''

**संशोधनाचे परिणाम, ज्ञानाचे आदानप्रदान आणि संशोधकांचे अनुभव**

स्त्रीवादी संशोधन प्रक्रियेत, संशोधनाचे निष्कर्ष मांडणे, ज्ञानाचे आदानप्रदान करणे, आणि संशोधकांचे अनुभव शब्दबद्ध करणे महत्त्वाचे ठरते. अनुपमा यांनी नमूद केले की, ''संशोधनामुळे विविध राज्यांतील संशोधकांमध्ये नेटवर्किंग वाढले, ज्यामुळे भौगोलिक विविधतेतून स्त्रियांच्या समस्यांबाबत सखोल समज निर्माण झाली.''

माधुरी खडसे सांगतात, जिल्हा स्तरीय कार्यशाळा झाल्यानंतर, अनेक महिला त्यांच्या पर्यंत पोहोचल्या. काही महिलांनी यंत्रणेबाबत अधिक माहिती मागितली. भरोसा सेल आणि पोलीस यंत्रणेने सुद्धा सकारात्मक सहकार्य करणे सुरु केले. तर आदिवासी भागातील महिलांनी स्वतः एकजुटीने संघर्ष करीत त्यांच्या गावातील पाण्याची समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले. त्या म्हणतात, ''महिलांमध्ये हक्कासाठी लढण्याची ताकत आहे, त्यासाठी त्यांना फक्त योग्य मार्गदर्शनाची गरज असते.''

महाराष्ट्र, पंजाब आणि तेलंगणा येथील संशोधकांनी सांगितले त्याप्रमाणे सदर संशोधनामुळे कृषी अधिकारी, पोलीस आणि इतर सरकारी विभाग यांच्याशी शेती प्रश्न, शेतकरी स्त्रियांचे प्रश्न आणि एकूण कृषी अरिष्ट यांचा स्त्रियांवरील हिंसेच्या प्रश्नाची असलेला संबंध यावर चर्चा करणे शक्य झाले.

**सामूहिक विचारांचा अवकाश व संशोधकांचे अनुभव**

स्त्रीवादी दृष्टिकोनातून सामाजिक संशोधन करताना सामूहिक विचार संशोधन प्रक्रियेला दिशा देण्यास महत्त्वपूर्ण ठरते. सहभागींशी चर्चा, कार्यशाळा, चित्रफिती आणि फोटो प्रदर्शनांच्या माध्यमातून प्राथमिक टप्प्यापासून निष्कर्षापर्यंत विमर्षात्मक विचाराची प्रक्रिया संशोधन अधिक सघन करते. संशोधन गटाने सुरुवातीपासूनच नियमित संवाद, पुनरावलोकन आणि

सामूहिक नियोजनासाठी प्रणाली विकसित केली. कामाची विभागणी सदस्यांच्या तज्ज्ञतेनुसार करण्यात आली.

माधुरी खडसे सांगतात की, संशोधकातील सामूहिक चर्चांमुळे कार्यकर्ता म्हणून स्थानिक पातळीवर महिलांचे प्रश्न अधिक विवेकी पद्धतीने सोडवण्यास त्यांना मदत झाली.

सीमा कुलकर्णी यांनी सांगितले की, संशोधन गटातील चर्चांमुळे शास्त्रज्ञ आणि तज्ज्ञ सल्लागारांकडून मिळालेल्या सूचना अधिक समृद्ध करता आल्या. इंदिरा यांनी सांगितले की, सामूहिक चिंतनाच्या प्रक्रियेमुळे संशोधन अधिक सखोल आणि परिणामकारक बनते, तसेच सहभागी सदस्यांच्या दृष्टिकोनाला समृद्ध करते.

### नैतिक आव्हाने, संशोधनातील पेच व संशोधक

स्त्रियांवरील हिंसा, संपत्तीचे वाद, वैवाहिक कलह आणि लिंगभाव असमानतेसारख्या संवेदनशील मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करताना संशोधकांना अनेक नैतिक आव्हानांचा सामना करावा लागला.

माधुरी खडसे यांनी सांगितले की, ''महिलांना असे वाटते की कौटुंबिक हिंसा किंवा कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळासारख्या वैयक्तिक विषयांवर चर्चा केल्यास त्यांच्यावर कलंक लावला जाईल, काही वाईट घडेल, किंवा कुटुंबातील इतर सदस्यांकडून पुन्हा हिंसेचा सामना करावा लागेल. आणि तशी भीती मलाही वाटत होती की खरंच तसे झाले तर महिलांना रोजगार मिळण्यास अडचणी येतील.''

राजू केंढे म्हणाले, ''मी एक पुरुष संशोधक म्हणून महिलांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्या घाबरत होत्या. शिवाय, इतर पुरुषांचेही माझ्याकडे लक्ष होते. त्यामुळे महिलांना अधिक अडचण येऊ नये म्हणून, मी माझ्या महिला सहकाऱ्यांच्या सहाय्याने महिलांच्या हिंसाचाराचे अनुभव एकत्रित करण्याचा प्रयत्न केला.''

वरील आव्हानांना तोंड देण्यासाठी संशोधकांनी सहभागींनी सर्व माहितीची खातरजमा करून, आपली संमती दिली आहे, याची खात्री केली. सहभागींना आपला सहभाग पूर्णतः ऐच्छिक आहे हे समजले आहे, असे सुनिश्चित केले आणि सहभागींना अस्वस्थ वाटणाऱ्या प्रश्नांना वगळण्याची किंवा उत्तर देणे टाळण्याची मुभा दिली.

इंदिरा राणी म्हणाल्या, ''आम्ही स्त्रियांच्या अनुभवांबाबत गोपनीयता राखण्याची स्त्रियांना हमी दिली. सुरुवातीला सहभागी स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी मुलाखतींच्या ठिकाणांमध्ये बदल केला.'' रुक्मिणी आणि आशालता यांनी सांगितले की, ''संशोधनादरम्यान बालविक्रीसारख्या बेकायदेशीर कृत्याचा प्रकार उघडकीस आला. या वेळी, गोपनीयता आणि कायदेशीर जबाबदाऱ्या यामध्ये संतुलन राखत, आम्ही सहभागी स्त्रियांना सुरक्षित आणि नियोजित मदत पुरवली.''

### पुढील दिशा आणि संशोधकांचे अनुभव

स्त्रीवादी संशोधन संशोधक आणि सहभागी यांच्या परस्परसंबंधावर आधारित असते, ज्यामुळे सहभागींचे प्रश्न, अनुभव पुढे आणणे आणि त्यांच्या आवाजाला (voices), ज्ञानाला महत्त्व देणे गरजेचे असते. सीमा कुलकर्णी यांनी नमूद केले, की संशोधनाच्या निष्कर्षांची स्थानिक पातळीवर चर्चा तिथल्या सामाजिक संस्थांच्या सहाय्याने घडवून करण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. याबाबत माधुरी खडसे, शालिनी वानखडे यांनी सांगितले की स्थानिक पातळीवर गटचर्चा, अभ्यासपूर्ण पोस्टर्स इत्यादींचा उपयोग करून जनजागृती करण्याचे नियोजन त्या करणार आहेत. तसे प्रयत्न त्यांनी 'जागा दाखवा' अभियाना अंतर्गत सुरूही केले आहेत.

उषासीतालक्ष्मी यांनी सांगितले, की स्त्री शेतकऱ्यांच्या दृष्टीने धोरणात्मक बदल आणण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाची भूमिका पार पाडेल. त्यामुळे सहभागी स्त्रियांच्या सहकार्याने, संस्था संघटनांनी एकत्रित

येऊन काम करण्याचीही अत्यंत गरज आहे, ज्यामुळे शेतकरी स्त्रिया आणि वंचित समुदायांच्या जीवनात दीर्घकालीन सुधारणा आणण्यास सहकार्य करता येईल.

## सारांश

या संशोधनातून स्त्रीवादी पद्धतीशास्त्राच्या वापरातून अतिशय गुंतागुंतीच्या सामाजिक प्रक्रिया आणि घटना यांना प्रकाशात आणणे शक्य झाले. स्त्री शेतकऱ्यांच्या अनुभवांना केंद्रस्थानी आणत, त्या अनुभवांचे अन्वयार्थ लावण्यासाठी आंतरछेदितता सिद्धांकनाचा वापर आणि संशोधक गट आणि सहभागींमधील बहुविधता यांच्यामुळे संशोधन सघन झाले. त्यातून धोरण, प्रत्यक्ष हस्तक्षेप आणि सामाजिक पातळीवरील जाणीव-जागृती या सर्व पातळ्यांवर या संशोधनाचे निष्कर्ष उपयुक्त ठरवण्यासाठी प्रयत्न करणे हे महत्त्वाचे ठरते. स्त्रीवादी संशोधनामध्ये संशोधक हे केवळ तथ्य संकलन करीत नाहीत तर त्या प्रक्रियेतून संशोधक सुद्धा बदलतात. या प्रक्रियेतून संशोधक गटाला शेतकरी स्त्रियांचे आयुष्य समजले, पण त्याचबरोबर आपण ज्या संरचनांमध्ये जगतो त्यांची अधिक चिकित्सक ओळख झाली. संशोधकांचे असे अनेक अनुभव स्त्रीवादी पद्धतींना पुढे नेण्यासाठी समर्पक ठरतील असे म्हणता येईल. ●

---

या लेखासाठी 'सोपेकॉम'मधील सीमा कुलकर्णी, स्नेहा भट यांचे सहाय लाभले. तसेच तेलंगणामधील एस. आशालता, एस. सीतालक्ष्मी, विजय रुक्मिणी राव आणि एन. इंदिरारानी आणि पंजाबमधील अनुपमा यांनी संशोधक म्हणून सहभाग आणि सहकार्य केले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांमधून स्थानिक संशोधक टीमच्या माधुरी खडसे, शालिनी वानखडे आणि राजू केंढे यांचे सहकार्य मिळाले.
'सोपेकॉम' आणि 'मकाम' यांनी २०२१-२०२४ या कालावधीत हा अभ्यास तीन राज्यांत केला आहे.

लेखन सहाय्य : स्नेहा गोळे आणि स्वाती देहाडराय

**संदर्भग्रंथ:**

१. Kaur, Ramandeep and Nagaich, Sangeeta, Understanding Feminist Research Methodology in Social Sciences (March 15, 2019)

२. M Devault, G Gross, Feminist qualitative interviewing: Experience, Talk, and Knowledge, The Handbook of Feminist Research Theory and Praxix, p. 206-236 Posted: 2012

परिवर्तनाचा वाटसरू

पीपल्स बुक हाऊस
मेहेर हाऊस,
१५, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट
मुंबई ४११००१
दू. ०२२ २२८७३७६८

माणगावकर एजन्सी
५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५

# कलामाध्यमातून अभ्यास निष्कर्षांचा वेध

संकलन
विद्या कुलकर्णी

प्रत्येक अभ्यासाचे अकादमिक महत्त्व वादातीत आहे, तरीही त्याच्या शैक्षणिक क्षमता त्याहून अधिक व्यापक आहेत. या क्षमतांचा प्रभावीपणे उपयोग करण्यासाठी विविध कलामाध्यमांचा वापर करण्याचे 'सोपेकॉम' आणि 'मकाम'ने ठरवले. कलेच्या माध्यमातून एखादा विषय अधिकाधिक लोकांपर्यंत नेता येतो, तसेच प्रत्येक माध्यमाची वैशिष्ट्यपूर्ण ताकद विषयाला अधिक उठावदारपणे पुढे आणायला मदतकारक ठरते. या विचाराने पोस्टर्स, ग्राफीक बुक आणि छायाचित्र प्रदर्शन अशा माध्यमांतून सोप्या आणि प्रभावी पद्धतीने अभ्यास निष्कर्ष मांडण्यात आले. प्रत्यक्ष अभ्यासाइतकीच ही माध्यमांतराची प्रक्रिया महत्त्वाची आहे. ज्यांच्या सर्जनशील साथीने ती घडली त्या कलाकार-छायाचित्रकारांची निर्मितीचा प्रवास उलगडणारी ही मनोगते;

**महिला संघर्षाचा आशय उठावदार करणारी चित्रे व भाषा**
**हिमांशी परमार**
ग्राफीक डिझाईनर

ग्राफीक बुकमध्ये महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्यातल्या आठ जणींच्या कथा आहेत. त्या तयार करण्याचा माझा प्रवास मला या स्त्रियांच्या अधिकाधिक जवळ नेणारा आणि महत्त्वाचा होता.

अगदी पहिल्यांदा त्यांच्या कथांचा कच्चा मसुदा मी वाचला, तेव्हा मला प्रकर्षानं जाणवलं, की या प्रत्येकीनं त्यांच्या आयुष्यात खूप चढउतार पाहिले आहेत आणि तितकंच सोसलंही आहे. मात्र त्यांच्या आसपासची परिस्थिती त्याबाबतीत पूर्णपणे संवेदनाहीन आहे. त्यांच्या प्रश्नांची दखल घेणारं त्यांच्या आसपास कोणी नाही. प्रत्येकीच्या आयुष्यात जणू दोन समांतर कथानकं चालू आहेत - पहिलं, समस्यांना तोंड देत त्यांनी उभारलेल्या त्यांच्या आयुष्याचं कथानक आणि दुसरं, 'बायकांचं आयुष्य असंच असतं!' हे मानणारं आणि वारंवार बिंबवणारं त्यांच्या आसपासचं समाजवास्तव उलगडून दाखवणारं कथानक. हा विरोधाभास पुढे आणला पाहिजे असं मला वाटलं.

तुमच्या-माझ्यासारख्या ज्यांना ग्रामीण आणि शेतकरी स्त्रियांचं आयुष्य जवळून परिचयाचं नाही अशांसाठी ही ग्राफीक बुक आम्ही तयार करणार होतो. हा अपेक्षित वाचकवर्ग डोळ्यासमोर ठेवून आम्ही कथांची भाषाशैली ठरवली. वाचकांना जवळची व वाचावीशी वाटेल

संकलक ज्येष्ठ मुक्त फोटो पत्रकार, अनुवादक असून स्वयंसेवी सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.
vidyakulkarni.in@gmail.com

अशी, त्याचबरोबर महिला संघर्षाचा आशय उठावदार करणारी भाषा राहील याची काळजी आम्ही घेतली.

चित्रशैली कशी असावी याबाबत मात्र मी साशंक होते. गंभीर विषयाशी सुसंगत ठरणारी ब्लॅक अँड व्हाईट स्केचेस करावीत, की रंगीत ही दुविधा होती. 'सोपेकॉम'शी झालेल्या चर्चेनंतर ती दूर झाली. रंगीत चित्रे करायचं आम्ही ठरवलं. स्त्रियांच्या दैनंदिन आयुष्यातली गुंतागुंत दर्शवण्यासाठी रंग (कलर) आणि पोत (टेक्श्चर) या दोन्हीचा वापर मी केला आहे. प्रत्येकीची कथा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे



प्रत्येक कथेसाठी वेगळे कलर पॅलेट वापरले आहे. तसेच सगळ्या कथा परस्परांशी जोडलेल्याही आहेत. त्यामुळे रंग वेगळे असले तरी सर्व चित्रांसाठी रवाळ पोत (ग्रेनी टेक्श्चर) वापरले, जे त्यांना समान सूत्रात बांधते. स्त्रियांचा खडतर जीवनप्रवास या रवाळ पोतातून प्रतीत होतो. परिस्थिती प्रतिकूल असूनही त्या आज चिकाटीने आणि धडाडीने उभ्या आहेत, विविध रंगांचा वापर महिलांच्यातील आश्वासक जिद्दीला उजाळा देतो.

मला सुरुवातीपासून वाटत होते, की या पुस्तकातील चित्रे केवळ चांगली असून भागणार नाही, तर ती महिलांच्या कथानकाला न्याय देणारीही असायला पाहिजेत. महिलांचं जीवनसार चित्रातून योग्य रितीने समोर येतंय की नाही हे मी सतत तपासत होते. चित्रातील प्रत्येक तपशील, जसे बांगड्यांचे रंग, कपाळावरील बिंदीचा प्रकार, साड्यांची स्टाईल आणि वातावरणातील प्रत्येक तपशील हा खऱ्याखुऱ्या स्त्रियांच्या विश्वाशी जोडलेला असला पाहिजे याची काळजी घेत होते. मी काढलेली चित्रे 'सोपेकॉम' टीम, संशोधकांसोबत शेअर करत होते. त्याविषयी आमच्या अनेक चर्चा झाल्या. चित्रे काढतानाची माझी कल्पनाशक्ती आणि प्रत्यक्षातील वास्तव यांच्यातील समतोल साधायला आणि अर्थपूर्ण चित्रमालिका तयार करायला मला या चर्चांमुळे मोलाची मदत झाली.



प्रत्येक कथेचे छोटेखानी पोस्टकार्ड साईजचे १०-१५ पानांचे स्वतंत्र पुस्तक तयार होणार आहे. पुस्तकाच्या आशयाशी वाचकांना अधिक जवळीक वाटावी या हेतूने पुस्तक लहान आकाराचे केले आहे. पुस्तक लहानसे असले तरी त्यातील आशय सघन आणि गंभीर आहे. महिलांचे वास्तव वाचकांच्या पचनी पडायला हवे, म्हणून प्रत्येक कथेचे स्वतंत्र पुस्तक केले आहे. सर्व आठ पुस्तकांचा मिळून एक पुस्तक संच असेल. म्हणजेच, वाचकांपर्यंत स्वतंत्र एकेक कथा त्यातील

बारकाव्यांसह पोहोचते आणि एकत्रित संचातून त्यातील स्त्री संघर्षाचे समान विषयसूत्रही अधोरेखित होते.

या आठजणींच्या जीवनाशी निगडित चित्रे काढताना माझे त्यांच्याशी एक आपसूक नाते तयार झाले. त्यांच्या जवळ जाऊन मला त्यांना समजून घेता आले ही गोष्ट माझ्यासाठी खूप मोठी आहे. त्यांच्या संघर्षमयी जगण्याचे चित्रण मी प्रभावीपणे करू शकले असेन अशी आशा मी बाळगते. प्रकाशित झालेली पुस्तके देण्याच्या निमित्ताने त्यांना भेटण्याची संधी मिळेल तेव्हा एक वर्तुळ पूर्ण होईल. मला माझ्या कामाची खरी पावतीही मिळेल!

**मोजके शब्द, बोली भाषा**

**मेधा काळे**

पोस्टर्सचे संहिता लेखन

बाया, काम, हिंसा हे तीन शब्द नवे नव्हते किंवा त्यांचा एकमेकांशी किती आणि कसा संबंध आहे याचीही बरीच स्पष्टता आजवर केलेल्या कामातून आली होती. काबाडकष्ट, काटकसर, घर चालवण्यासाठी बाया करत असलेला आटापिटा, मुलं जणू त्यांची एकट्यांचीच असल्यासारखी टाकलेली जबाबदारी आणि केस पांढरे झाले तरी उपसावे लागत असलेले कष्ट पाहिले होते. शहरात. गावात. पण ‘सोपेकॉम’च्या या अभ्यासाने फार ठोसपणे या तिन्हींचा सहसंबंध पुढे आणला. काही गोष्टी नव्याने स्पष्ट झाल्या. स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेला ‘कौटुंबिक हिंसा’ असं मर्यादित करणं मी ‘तथापि’मध्ये काम करत असल्यापासून कटाक्षाने टाळलं होतं. ते किती योग्य होतं हे या अभ्यासाचे निष्कर्ष वाचून पुन्हा पटलं.

देशाचं आणि समाजाचं अर्थकारण, राजकारण तसंच दिशा काय आहे यावर त्या देशातल्या लोकांचं विशेषतः परिघावर असणाऱ्या, वंचित, पीडित घटकांचं जगणं कसं असेल हे ठरत असतं. ‘सोपेकॉम’ आणि ‘मकाम’ने केलेल्या अभ्यासातून ही बाब माझ्यासाठी पुन्हा एकदा अधोरेखित झाली. १९९१ साली *स्ट्रक्चरल अ‍ॅडजस्टमेंट*च्या गोंडस नावाखाली कल्याणकारी राज्याची संकल्पना मोडीत काढण्यात आली. आणि आज तीन दशकांनंतर त्याच तथाकथित ‘सुधारणां’चा परिपाक म्हणजे स्त्रियांवर होत असलेला *स्ट्रक्टरल व्हायोलन्स* असं माझं स्पष्ट मत आहे. आणि हीच समज आणि स्पष्टता डोक्यात ठेवून मी पोस्टरचा मजकूर लिहायला घेतला.

या स्त्रिया कोण आहेत, त्यांचं काम काय आहे, त्यांच्यावर होत असलेली हिंसा काय आहे हे तीन प्रश्न केंद्रस्थानी होते. त्यासोबतच त्यांचं कामाचं ठिकाण तसं मानलं जातं का? त्या कामाच्या ठिकाणी होत असलेल्या हिंसेचा समावेश त्यासंबंधीच्या कायद्यामध्ये का नाही? हे दोन प्रश्नही तितकेच महत्त्वाचे होते.

मग अगदी मोजक्या शब्दांत हे सगळं मांडण्याचा प्रयत्न केला. गेल्या २५ वर्षांत लोकांमध्ये काम करत असताना मी जाणीवपूर्वक पाळलेलं तत्त्व म्हणजे जे ऐकतोय, वाचतोय ते त्या व्यक्तीच्याच शब्दांत जितकं येईल तितकं ते अर्थगर्भ असतं. *‘नथिंग अबाउट अस, विदाउट अस’* हे तत्त्व मनाशी पक्कं असल्याने या अभ्यासाच्या गाभ्याशी असलेलं स्त्रियांचं स्वतःचं म्हणणं पोस्टरवर आल्याशिवाय ती पोस्टर्स पूर्णच झाली नसती. म्हणून जिथे आवश्यक तिथे अगदी मोजकी, थेट आणि प्रभावी उद्धृतं वापरायचं ठरलं आणि ऋचाने त्यासाठी अगदी मन लावून मदत केली.

पोस्टर्सची चित्रं आणि डिझाइन राजू देशपांडे करणार आहेत हे माहीत होतं. त्यांची चित्रं शब्दांत पकडता न येणारं बरंच काही बोलतात. त्यामुळे मी निर्धास्त होते, की माझे शब्द कमी पडले तरी त्यांची चित्रं आहेत ना...

अभ्यास तीन राज्यांतला होता त्यामुळे या तिन्ही ठिकाणचे अनुभव यावेत, सगळ्या नाही तरी विविध समूहांच्या अनुभवांचं प्रतिनिधित्व असावं हेही पाहिलं. त्यातूनच ही पोस्टर सीरिज तयार झाली आहे.

## ओबडधोबड व ठसठशीत चित्रशैलीचा वापर

**राजू देशपांडे**
चित्रकार आणि ग्राफीक डिझाईनर

कमीत कमी मजकूर आणि लक्षवेधी चित्रं ही 'पोस्टर' या माध्यमाची गरज आहे. पोस्टर्स सहसा भिंतीवर लावली जातात, जी फार कोणी रेंगाळून, बारकाईनं बघत नाहीत. जवळून जाणाऱ्यांची जी क्षणिक नजर पडेल ती खिळवून ठेवणारी रचना करणं हे पोस्टर डिझाईनरचं काम. जे सांगायचं ते (मेसेज) थेट आणि ठसठशीतपणे सांगणं आणि बारकाव्यांचा समावेश टाळणं, हीदेखील या माध्यमाची गरज. या साधारण गोष्टी मनात ठेवून पोस्टरमालिकेच्या स्क्रीप्टला प्रत्यक्षरूप द्यायला सुरुवात केली.

शेतकरी, कष्टकरी स्त्रियांचं वास्तव आणि त्यांच्यावरील हिंसा हे या मालिकेचं विषयसूत्र आहे. विषय गंभीर आहे, ती गंभीरता पोहोचवण्यासाठी मांडणीमध्ये 'रॉ'नेस वा ओबडधोबडपणा पाहिजे असं मला वाटलं. फाँटचा प्रकार, आकार, चित्रशैली आणि एकंदर मांडणी याच दृष्टीने निवडली.

प्रत्येक पोस्टरचा विषय वा शीर्षक ठळक अक्षरलेखनात (बोल्ड लेटरींग) आहे. यासाठी मुद्दाम प्रमाणशीर फाँट टाळला. शीर्षकाच्या पाठीमागे वापरलेला कलर पॅचही ओबडधोबड आहे. एखादा कागद हाताने फाडल्यावर जसा वेडावाकडा फाटतो, तशी ही पार्श्वभूमी आहे. सर्व पोस्टरमालिकेत शीर्षकाचा फाँट सारखाच आहे, विषय/थीमनुसार मागचा रंग बदललेला आहे.

प्रमाणशीर फाँट जसे टाळले, तसेच रेखीव चित्रेही. बोल्ड ब्रश, ठसठशीत रेषा आणि जेवढे किमान आवश्यक तेवढेच स्ट्रोकस्, यांच्या वापरातून एकेक चित्र तयार झाले. आशयानुसार चित्र पूर्ण झाले असे मला वाटले त्याक्षणी मी त्यावरचे काम थांबवले.






कलाकुसर जाणीवपूर्वक टाळली.

अगदी सुरुवातीच्या एका पोस्टरमध्ये 'आम्ही कोण?' हे आले आहे. त्यात शेतीआधारित उपजीविका करणाऱ्या महिलांच्या अनेकविध कामांचा यात उल्लेख आहे. या सर्व कामात गुंतलेल्या ग्रामीण स्त्रिया केवळ एकाच ठिकाणी दाखवण्याऐवजी पोस्टरमालिकेत विखुरल्या आहेत. प्रत्येक पोस्टरवर चित्रात एकच विषय ठसठशीतपणे मांडलेला आहे. अगदी अपवादात्मक एक-दोन पोस्टरमध्ये एकापेक्षा अधिक चित्रांचा समावेश आहे. चित्रातील स्त्रियांची कामे, कपड्यांची स्टाईल, त्यांचे रंगसंगती ग्रामीण स्त्रियांशी मिळतीजुळती राहील याचीही काळजी घेतली.

स्त्रियांवरील हिंसा हा विषय मला नवीन नव्हता. पण 'सोपेकॉम'च्या अभ्यासाने हिंसेचे जे वेगळे पैलू समोर आणले ते माझ्या समजेत भर घालणारे होते. शारीरिक हिंसा बहुतेकांना परिचित आहे, ती गंभीर आहेच. पण सूक्ष्म स्वरूपातील, न दिसणारी, जिला 'हिंसा' मानलंच जात नाही अशी भेदभावाची वागणूक, अशी हिंसेची रूपं हा अभ्यास पुढे आणतो. कमी वेतन देणं, कष्टाचं वेतन मारणं/कापणं, कामाच्या ठिकाणी असुरक्षितता या व अशा कितीतरी गोष्टी. ग्रामीण शेतकरी स्त्रियांच्या वास्तवावर प्रकाश टाकणाऱ्या या अभ्यासातील अदृश्य हिंसेची अनेकविध रूपं पाहून मला एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली. मी कुणाला 'मारत' नाही म्हणजे मी हिंसा करत नाही, असं मानायचं कारण नाही. न दिसणारी/अदृश्य हिंसा तर माझ्याकडून होत नाही आहे ना, याबाबतीत आपण प्रत्येकानं सजग व्हायलाच हवं.

### स्त्रियांची आंतरिक ताकद टिपण्याचा प्रयत्न

**विद्या कुलकर्णी**

छायाचित्रकार

कापूसवेचणीचा हंगाम चालू होता. वर्षा करलुकेंना सकाळी लवकर कामाला निघायच्या आत भेटायचं ठरलं होतं. आम्ही त्यांच्या घरी पोहोचलो. मागच्या दारातून सूर्याची कोवळी किरणं घरात शिरत होती. सूर्यप्रकाशाचा सुरेख पांढरा पट्टा जमिनीवर पडला होता. तो चेहेऱ्यावर येईल अशा जागेवर बसायची विनंती मी वर्षाला केली. तिथे बसून त्या 'सोपेकॉम' गटाशी बोलत होत्या. परावर्तित प्रकाशानं उजळलेला त्यांचा चेहेरा आणि पाठची खोली अंधारात. मला फ्रेम दिसू लागली. पण हातात कॅमेरा तसाच ठेवून मी त्यांचं बोलणं ऐकत राहिले. शेतीच्या कर्जापायी पतीनं केलेली आत्महत्या, सासरच्यांनी न मिळालेली साथ आणि जमीन मक्त्यानं घेऊन कसण्यातल्या अडचणी त्या बोलत होत्या आणि मनातले भाव चेहेऱ्यावर उमटत होते. आपल्या तीन मुलींविषयी, त्यांच्या शिक्षणाविषयी त्या बोलू लागल्या आणि चेहेऱ्यावर पहिल्यांदा डोळ्यांपर्यंत पोहोचणारं हसू उलटलं. ते मी कॅमेऱ्यानं टिपलं.

फोटो टिपायला सेकंदभरही वेळ लागत नाही. वेळ लागतो तो विषय अधिकाधिक समजून घ्यायला. त्यामुळे व्यक्तीच्या अधिक जवळ जायला मदत होते हा फोटोग्राफर म्हणून माझा अनुभव. ही फोटो घेण्यापूर्वीची पूर्वतयारीची प्रक्रिया खूप महत्त्वाची. 'सोपेकॉम' संस्थेसाठीही ती महत्त्वाची वाटली, त्यामुळे पूर्वतयारीला आम्ही भरपूर वेळ दिला. अर्थात पूर्वतयारी ही पार्श्वभूमीसारखे असते, ती फोटोच्या पाठी असते, त्याचं सार फोटोत उतरतंही. प्रत्यक्ष फोटो घेताना जी परिस्थिती समोर आहे त्यावरच भागवावं लागतं. जो लाईट आहे, जे सेटींग आहे, त्यात अधिकाधिक चांगलं, अर्थपूर्ण, परिणामकारक करायचा प्रयत्न करावा लागतो.

अभ्यासाचं काम साधारणपणे अखेरच्या टप्प्यात आल्यावर फोटो डॉक्युमेंटेशन सुरुवात झाली. सीमा, स्नेहा आणि चमूशी झालेल्या चर्चा आणि त्यांनी शेअर केलेली मुलाखतींचं टिपणं यातून मी विषयाचा


आवाका समजून घेतला. शेतीची सध्याची बिकट अवस्था हा अभ्यासाचा संदर्भ आहे, तर त्या अनुषंगाने शेतकरी व शेतमजुर महिलांची परिस्थिती, त्यांच्यावरील कामाचा बोजा, त्यांच्या अनेकविध समस्या, वाढते शोषण आणि हिंसा असे अभ्यासाचे अनेक पदर आहेत. हे फोटोतून कसे दाखवता येतील यावर आम्ही विचार केला. फिल्ड व्हिजिटला सोबत असलेल्या ऋचा, वनिता, स्वाती, पल्लवी यांच्यासोबतच्या गप्पा म्हणजे माहितीचा खजिना गवसत असायचा. त्यातले बारीक-सारीक तपशील मी नोंदवायचे, त्यातले व्हिज्युअली काय टिपता येईल हे विचारचक्र चालू राहायचे.

शेतीतली कामं हा दृश्य विषय. फोटोत टिपता येण्यासारखा. हंगामानुसार कामाचं स्वरूप बदलतं. यातल्या शक्य तितक्या कामांचे प्रकार आम्ही टिपले. काही वेळा घरातून निघण्यापासून शेतापर्यंत आम्ही त्यांच्या सोबतीने गेलो. यातून कामाबरोबरच त्यांचा कामाचा एकूण परिवेश आणि बारकावे टिपता आले. पूर्वीसारखी शेतातली कामं आता मिळत नाहीत, कामं कमी झालीत हेदेखील महिला सतत सांगत होत्या. परिणामी त्यांना दूरवर जावं लागतं, कष्ट वाढतात, असुरक्षित वाटतं. असे अनुभव फोटोबद्ध करण्याचा प्रयत्न केला. हिंसेचं वास्तव पुढे आणण्यावर या अभ्यासाचा भर होता. महिलांनी मोकळेपणाने आपले अनुभव सांगितले आहेत. घरात-कामावर जाताना-कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा, त्याच्या मुळाशी असलेला भेदभाव. हिंसा-भेदभावाचा अनुभव दर्शवणारे फोटो प्रतीकात्मक आहेत, महिलांची ओळख दिसणार नाही याची खबरदारी घेऊन घेतले आहेत.

फोटो घेणं हा कामाचा एक भाग होता, तर त्याचं सादरीकरण हा पुढील टप्पा आहे. त्यात 'भविष्य पेरणाऱ्या' हे छायाचित्र प्रदर्शन, महिलांच्या कथांवर आधारित फोटो स्टोरीज आणि अन्य माध्यमांचा समावेश आहे. यातील महाराष्ट्र व तेलंगणा राज्यातील फोटो मी घेतले, तर पंजाबमधील फोटो राजवीर बैन्स या तरुण फोटोग्राफरने घेतले आहेत.

फोटोचं श्रेय बहुतेकदा फोटोग्राफरला दिलं जातं. पण फोटोकडे एक स्वतंत्र अभिव्यक्ती म्हणून पाहणं बरोबर नाही. मी घेतलेले फोटो अनेकांच्या सहभागातून आणि योगदानातून तयार झाले आहेत. फोटोंचा संदर्भ असलेला 'सोपेकॉम'चा अभ्यास आणि तो करणारे अभ्यासक, ग्रामीण महिलांशी जोडलेल्या स्थानिक संस्था आणि स्वत: महिलांनी दाखवलेला विश्वास, फोटोसाठी दिलेली संमती या पार्श्वभूमीपासून हे फोटो वेगळे काढता येणार नाहीत. माझ्या छायाचित्रातून महिलांची प्रतिकूल वा नकारात्मक प्रतिमा उभी राहणार नाही आणि मला जाणवलेली त्यांची आंतरिक ताकद फोटोत उतरेल, याची काळजी मी फोटोग्राफर या नात्यानं घेतली.

●



मकाम Makaam
दशकपूर्ती

# महिला ऊसतोड कामगारांना वाली नाही !

पल्लवी हर्षे,
स्वाती सातपुते,
स्नेहा भट

बारा वर्षांच्या दोघी मुली पाणी भरून फडाच्या दिशेने चालल्या होत्या. गावातल्या एका मुलानं एकीचं तोंड दाबून तिला ऊसात नेलं आणि तिच्यावर बलात्कार केला. तिच्या बरोबरची मैत्रीण रडत परत आली पण तिला नेमकं काय झालं सांगता येईना. सगळे त्या मुलीला शोधायला लागले, तर ती ऊसाच्या शेतात मृतावस्थेत सापडली. तोवर तो मुलगा पळून गेला होता. तक्रार करायला गेले तर पोलिसांनी मुलाचं नाव विचारलं. पण तो कुठला हे सांगता आले नाही. मुकादमाशी बोलल्यावर तो म्हटला मी इकडं गावाकडं. तुम्हांला तुमच्या पोरी सांभाळता येत नाहीत का? तिचं काही तरी लफडं असंल. दिलेल्या पैशांतून माझं व्याज द्या आणि गावाकडं परत जा. मुलीशी झालेल्या या प्रकाराने तिच्या आईला धक्का बसला आणि तिने विहिरीत उडी मारून जीव दिला. बीडमधील ऊसतोड कामगार महिलेने सांगितलेला अनुभव.

'मकाम'च्या कामामध्ये महिला ऊसतोड कामगारांचे असे अनेक सुन्न करणारे हिंसाचाराचे अनुभव समोर आले आहेत. आपल्याला ज्यांची भयानकता ऐकूनही सहन होणार नाही असे अनुभव लाखो ऊसतोड कामगार महिला आपल्या उराशी बाळगून, हिंसाचाराची टांगती तलवार आपल्या डोक्यावर असताना, जवळपास वर्षातील सहा महिने नाईलाजाने काम करतात.

### महिला ऊसतोड कामगार

महाराष्ट्र हे भारतामधील अग्रगण्य साखर उत्पादक राज्यांपैकी एक आहे. प्रत्येक वर्षी ऊसतोड हंगामात लाखो ऊसतोड कामगार मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र यांसारख्या दुष्काळग्रस्त भागांतून जवळपास चार ते सहा महिन्यांसाठी स्थलांतर करतात. सामान्यतः एक नवरा-बायकोची जोडी ज्याला 'कोयता' असे म्हटले जाते, ऊसतोडीचे काम करते. त्यांच्याबरोबर अनेकदा पूर्ण कुटुंब स्थलांतर करून जाते. कुटुंबातली मोठी मुले छोट्या मुलांचा सांभाळ करतात.

२०२२-२३ या वर्षी 'सोपेकॉम'च्या सहाय्याने बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील एकूण ७८ गावांमधील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात एकूण ५,९८२ कुटुंबांची माहिती घेण्यात आली. यापैकी २९.४% कुटुंबे ही अनुसूचित जातीतील होती तर २१.२% ही अनुसूचित जमातींमधील होती. या कुटुंबांमधून जे एकूण ११,४३७ कामगार उचल घेऊन स्थलांतरित झाले, त्यापैकी

तिन्ही लेखिका 'मकाम'च्या प्रमुख कार्यकर्त्या असून 'सोपेकॉम'मध्ये कार्यरत आहेत.
pallavi.harshe@gmail.com

५,४८० (४७.९%) स्त्रिया होत्या. जर शासनाने विविध शासन निर्णयात उल्लेख केलेली महाराष्ट्रातील ८ लाख ऊसतोड कामगारांची संख्या गृहीत धरली तरी दरवर्षी जवळपास ४ लाख महिला या ऊसतोडीसाठी स्थलांतरित होतात. म्हणजेच प्रत्येक वर्षी जवळपास सहा महिने एवढ्या मोठ्या प्रमाणात महिला ऊसतोड कामगार या असुरक्षित वातावरणात राहतात.

## मूलभूत सोयी सुविधांचा अभाव व लैंगिक शोषण

ऊसतोडीच्या ठिकाणी साखर कारखाने सोयी सुविधांच्या नावावार उसतोड कामगारांना तात्पुरते घर बनवण्यासाठी केवळ ताडपत्री व काही बांबू देतात. मुकादम त्याच्या ओळखीने स्थलांतरित गावात कधी कारखाना परिसरात, कधी गावाच्या जवळ किंवा दूर, कधी हागणदारीत, स्मशानात, गावाबाहेरील मोकळ्या जागेत टोळीला[१] खोपी[२] टाकायला जागा उपलब्ध करून देतो. या खोपीमध्ये जेमतेम जागा असते. खोपी उघडी असल्याने कुणीही त्यामध्ये शिरू शकते.

अनेक वेळेला खोपीच्या जवळ पाण्याची सोय नसल्यामुळे पाणी दुरून आणावे लागते. अंघोळीसाठी न्हाणीघराची सोय नसते त्यामुळे ते उघड्यावर किंवा तात्पुरते न्हाणीघर बनवून पहाटे लवकर आंघोळ उरकतात. शौचालयासाठी पण उघड्यावर जावे लागते. पाण्यासाठी, शौचालयासाठी जाताना जर चुकून महिला एकटी असली तर गावातील लोक परिस्थितीचा फायदा उचलतात. खोपीमध्ये सुद्धा जर महिला एकटी राहिली तर पुरुष खोपीजवळ घिरट्या घालणे, कधी कधी सरळ खोपीत शिरणे इत्यादी त्रास देतात. अनेक नकोशा वाटणाऱ्या घटना महिला ऊसतोड कामगारांच्या आयुष्यात, मूलभूत सोयी सुविधांची उचित सोय नसल्यामुळे व असुरक्षित वातावरणामुळे ओढवतात.

## कामाचे स्वरूप व लैंगिक हिंसा

ऊसतोडीच्या कामासाठी मुकादमाने जी टोळी केलेली असते त्यामध्ये कधी स्वतःच्याच गावातील तर कधी वेगवेगळ्या गावांतील लोक असतात. टोळीत स्वतःच्या गावातीलच लोक असतील किंवा मुकादम हा स्वतःच्या जातीतील असेल तर तुलनेने महिलांना सुरक्षित वाटते. परंतु वेगळ्या गावातील अनोळखी लोक असले तर मात्र महिलांना प्रचंड भीती वाटते.

खोपीपासून ऊसाचा फड अंदाजे दोन कि.मी.च्या परिसरात असतो. त्यामुळे महिला सहसा एकत्र जाण्याचा प्रयत्न करतात. पण कधी चुकून एखादी महिला मागे राहिली तर तिचा पाठलाग होणे, हात पकडला जाणे, पदर ओढणे, नितंबावर धक्के, चापट्या मारणे, शिटी मारणे, सोबत येण्याचा आग्रह करणे, बलात्कार अशा अनेक घटना अनुभवाला येत असल्याचे महिलांनी मांडले. मोळी[३] खाली वाकून बांधावी लागते. अशा वेळेस पदर खाली सरकला तर पुरुष बघत बसतात. मोळी घेऊन शिडीवरून चढताना कधी कधी गाडी मालक, ड्रायव्हर शिडीच्या खाली झोपतात व त्यांच्याकडे खालून बघतात तसेच महिला जेव्हा मोळी पुरुषांच्या हाती देतात तेव्हा त्यांच्या हाताला मुद्दामहून स्पर्श करतात.

## स्थलांतरित असल्यामुळे अधिक असुरक्षित

स्थलांतरित गावात सुरक्षेच्या कोणत्याच यंत्रणा महिलांसाठी उपलब्ध नसतात, उदा. त्यांचा समाज, पोलीस यंत्रणा इत्यादी. गावातील लोक सत्तास्थानी असल्यामुळे ऊसतोड कामगारांना तेथील यंत्रणांचा उपयोग होऊ देत नाहीत. महिला बहुतेक करून खालच्या जातीच्या असल्यामुळे त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हा तुच्छतेचा व लैंगिक उपभोगाची वस्तू असाच असतो. काही झाले तर महिलांच्या बाजूने उभे राहायला, आवाज उचलायला कुणी नाही याची खात्री असल्यामुळे त्यांचे शोषण सहजपणे केले जाते. या सर्व परिस्थितीमुळे ऊसतोड कामगार स्त्रिया व पुरुषांची हतबलता वाढते. कमलाताईने (नाव बदललेले आहे) एक घटना मांडली.

गावातील एका मुलाने टोळीतील किशोरवयीन मुलीला भुलवण्याचा प्रयत्न करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणात पोलिसांनी केस दाखल करून घेतली नाही. गावातील मुलगा असल्यामुळे गावकरी, टोळीतील लोकांना तो विषय सोडून देण्यासाठी धमकीवजा समजवायला आले. हा विषय का वाढवताय? ते वाढवणं तुम्हालाच त्रासदायक होईल, असे त्यांचे म्हणणे होते.

अशा प्रकरणांमध्ये काय आरोप प्रत्यारोप होतील, केस कशा पद्धतीने पुढे जाईल, कोण नमतं घेईल हे जातीवरून ठरते, असे महिला ऊसतोड कामगार संघटनेच्या मनिषा तोकले मांडतात. जर टोळीतील खालच्या जातीतील मुलगी टोळीतील किंवा स्थलांतरित गावातील वरच्या जातीच्या मुलाच्या प्रेमात पडली तर त्या लोकांची प्रतिक्रिया असते, ‘तुम्ही मुद्दाम करता. नादी लावता आमच्या पोराला. अस वागायचं तर गावच सोडायचं नव्हतं, तिकडंच धंदा करायचा.’ मनीषा तोकले म्हणतात, की हेच वाक्य जर टोळीतील मुलगी उच्च जातीय असेल तर ते बोलू शकत नाहीत. यावरून खालच्या जातीतील स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

गावातील शेतकऱ्यांच्या शेतातून कधी भाजी, कोणतं फळ घेतलं आणि ते शेतकऱ्याला कळलं तर तो विषय सरळ शिवीगाळ, मारहाण व अनेक वेळेला लैंगिक सुखाच्या मागणीपर्यंत जातो. असाच एक अनुभव कल्पनाताईनी (नाव बदललेले) त्यांच्या सोबतच्या महिलेसोबत घडलेला सांगितला. सर्व महिला ऊस तोडून खोपीवर येताना, त्यांना एका शेतात मक्याची कणसं दिसली. कणीस तोडून सर्व महिला शेतातून बाहेर पडल्या पण एक महिला मागे राहिली, कारण तिच्यासोबत तिचा छोटा मुलगा होता. तेवढ्यात शेतकरी मालक तिथे आला आणि घाण भाषेत शिवीगाळ करत त्या महिलेला म्हटला, की तोडलेली कणसं झाडाला जोडून दे नाहीतर माझी इच्छा पूर्ण कर.

अशा परिस्थितीत कामाच्या ठिकाणची ही असुरक्षितता एकट्या महिलांसाठी कैक पटीने वाढते. एकट्या स्त्रियांबाबत तर टोळीतील लोक, स्वतःच्या समाजातील लोक पण वाईट नजरेने बघणे, लैंगिक सुखाची मागणी करणे हे करताना मागे पुढे बघत नाहीत.

## कौटुंबिक हिंसाचार

ऊसतोडीच्या ठिकाणी महिलांना मोठ्या प्रमाणात कौटुंबिक हिंसाचाराचाही सामना करावा लागतो. पुरुष कोणत्याही छोट्या छोट्या कारणावरून हाताला भेटेल त्या वस्तूंनी महिलांना मारतात. महिलांवर संशय घेणे, त्यांच्यावरील नियंत्रण, मारहाण ह्याचे प्रमाण स्वतःच्या गावाच्या तुलनेत स्थलांतरित गावात वाढते. स्थलांतरित ठिकाणी नवरा-बायकोला एक दुसऱ्यांना वेळ न देता येणं, लैंगिक जीवनावर परिणाम झाल्याचा राग, बाहेरगावातील असहाय्यता या सर्व कारणांमुळे कौटुंबिक हिंसाचार वाढतो. टोकाच्या कौटुंबिक हिंसाचाराचे एक प्रकरण २०२३-२४मध्ये घडले. अलकाला (नाव बदललेले आहे) पूर्वीही अनेक वेळेला तिच्या नवऱ्याने मारहाण केली होती. मागील वर्षी लघवीला जातोय, सोबत ये असे म्हणत नवऱ्याने एकट्यात नेऊन कोयत्याने तिच्यावर वार केले. त्यामुळे तिला कायमचे अधूपण आलेले आहे व तिला या पुढे काम करणे अवघड होणार आहे.

महिलांच्या मनावर नवऱ्याकडून मार खाण्याचे संस्कार एवढे रुजेलेले आहेत, की कौटुंबिक हिंसेच्या घटनाही त्या सहजपणे हसून सांगतात. ऊसतोड कामगार महिलांच्या गटचर्चेत एक महिला म्हणली, ‘‘इथे बसलेल्या प्रत्येक बाईने नवऱ्याचा मार खाल्ला आहे.’’

ऊसतोडीच्या ठिकाणी पुरुषांनाही कुणी दाद देत नाही. कुटुंबातील पुरुषांना बाहेरील यंत्रणा नियंत्रणात नसण्याची असहाय्यता असते. त्यामुळे बाहेरील यंत्रणांशी झगडण्याचा मार्ग जीवावर किंवा कामावर

बेतेल ही भीती असते. त्या तुलनेत पितृसत्तेने त्यांना स्वतःच्या बायकांवर नियंत्रण करण्याचे अधिकार दिलेले आहेत. तो त्यांच्यासाठी जास्त सोपा मार्ग असल्यामुळे ते त्याचा अवलंब सर्रासपणे करतात.

या शारीरिक हिंसेसोबतच कुटुंबातील 'पुरुष व साखर साखळी' स्त्रियांचे आर्थिक शोषणही करते. ऊसतोड हंगामात पुरुषांएवढेच, किंबहुना त्यांच्यापेक्षा जास्त काम करूनही उचल मात्र पुरुषांच्याच हातात दिली जाते.

**असे काही झाले... तर आमची जबाबदारी कुणाची?**

महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या नफ्यामध्ये ऊसतोड कामगार मोठी भूमिका बजावत असले तरीही ते साखर कारखान्यांचे कामगार नाहीत. ते केवळ शेतकऱ्यांचे कामगार आहेत. त्यामुळे त्यांची कोणतीही जबाबदारी साखर कारखाने घेत नाहीत. शासनामार्फत ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्याची प्रक्रिया मागील दोन वर्षात सुरू झाली असली तरीही बीड सोडून इतर कोणत्याही ठिकाणी महिलांची अजून स्वतंत्र कामगार म्हणून नोंदणी केली जात नाही. अजून महिलांना शासन किंवा साखर कारखाने कामगार म्हणूनच बघत नसल्यामुळे महिलांचे सुरक्षिततेचे प्रश्न हे पूर्णपणे दुर्लक्षित आहेत.

मार्च २०२३मध्ये 'द हिंदू' या वृत्तपत्रातील लेखात[४] लैंगिक शोषणासोबतच महिला ऊसतोड कामगारांचे आर्थिक शोषण कसे होते यावर भाष्य केले गेले आहे. जवळ जवळ १८ तास काम करूनही किमान वेतनापेक्षाही कमी वेतन मिळते हे त्यात अधोरेखित केले. या लेखाची दखल मुंबई हायकोर्टाने २०२३ साली घेतली व स्वतःहून एक केस (सू मोटो) दाखल केली. केसमधील आरोपांना उत्तर देताना विशेष पोलीस निरीक्षण, महिला अत्याचार प्रतिबंधक विभागाच्या रिपोर्टचा संदर्भ दिलेला आहे. त्यानुसार २०२१पासून महाराष्ट्रात ऊसतोड कामगार महिलांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या १६ केसेस त्यांच्याकडे दर्ज झाल्याचा दाखला ते देतात. त्यामध्ये असाही उल्लेख आहे, की साखर कारखाना परिसरात एकही लैंगिक शोषणाची केस समोर आलेली नाही.

न्यायालयाच्या या केसला दिलेले उत्तर पाहिले तर हेच स्पष्ट होईल, की शासनाची यंत्रणा अजून महिला ऊसतोड कामगारांपर्यंत पोहोचलेलीच नाही. जी यंत्रणा उपलब्ध आहे, ती बहुतेक वेळेला शोषण करणाऱ्यांच्या बाजूने उभी राहते. शासनाने ऊसतोड कामगारांमध्ये विश्वास निर्माण न केल्यामुळे, तसेच त्यांची परिस्थिती समजून घेऊन यंत्रणा न घडवल्यामुळे त्यांच्यापर्यंत केसेस पोहोचतच नाहीत. त्यामुळे महिला ऊसतोड कामगारांची सुरक्षा वाऱ्यावरच राहते.

ज्या मुकादमाच्या भरवशावर त्या परगावी आलेल्या असतात तो सुद्धा त्यांचे प्रश्न पुढे रेटत नाही. खालच्या जातीतील महिलांचे चारित्र्य हनन करून प्रश्न तिथेच थांबविणे हा सोपा मार्ग सामाजिक व्यवस्थेने पुढे ठेवला आहे त्यामुळे मुकादम सुद्धा हा सोपा मार्ग अवलंबतो आणि सोयी सुविधांचा, सुरक्षिततेच्या यंत्रणांचा अभाव हे प्रश्न माघारी पडतात.

तसेच नवऱ्याला सांगितले तर तो तिच्यावरच शंका घेईल, मारहाण करेल किंवा रागात पुरुष स्थलांतरित गावातील लोकांना मारहाण करेल आणि त्यामुळे त्यांच्याच जीवावर आणि कामावर बेतेल या भीतीने महिलाच पुरुषांना अशा घटना सांगायला जात नाहीत.. मग त्या काय करतात? कधी गप्प बसून सहन करणे, धाडसी असेल तर पुरुषाशी समोरा समोर बोलून प्रश्न सोडवणे, कधी कधी शोषणाला बळी जाणे, तर कधी खोपीतील वयस्कर अनुभवी स्त्रिया जर साथ द्यायला तयार असतील तर त्यांच्याशी बोलणे. अनुभवी स्त्रिया अनेकदा शांतपणे प्रत्यक्ष शोषण करणाऱ्याशी बोलून तो प्रश्न मिटवतात. हे पर्याय अनेकदा उपलब्ध नसतात. मग एकटी कधीच कुठे न जाणे, साडीवर शर्ट घालणे, साडीच्या आत सलवार घालणे इत्यादी पर्याय त्या

निवडतात. पण हे कायमचे उपयोगी पर्याय नाही. महिलांनी कोणाकडे दाद मागावी हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

**महिला ऊसतोड कामगारांच्या मागण्या**

महिला ऊसतोड कामगारांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना कामगार म्हणून मान्यता मिळणे, त्यांची स्वतंत्र कामगार म्हणून नोंदणी, पक्क्या घरांची सोय, तात्पुरते सामूहिक शौचालय व न्हाणीघराची व्यवस्था, पालापासून फडापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहन, उपरोक्त केसमध्ये मांडल्याप्रमाणे साखर कारखाना परिसरात एक तात्पुरती पोलीस चौकी, पोलिसांनी नियमितपणे पालांवर व फडांवर गस्त करणे, महिलांच्या सुरक्षिततेसाठी साखर कारखान्यांनी एक व्यक्ती नेमणे व प्रत्यक्ष तक्रार करण्यासाठी हेल्पलाईन सुरू करणे गरजेचे आहे. तसेच त्यांचे आर्थिक शोषण कमी होण्यासाठी त्यांच्या हातात व खात्यात त्यांच्या कामाचे पैसे मिळणे, त्यांचे स्थलांतर थांबण्यासाठी स्थानिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच ऊसतोड कामगारांची शेती व इतर उपजीविकेची साधने सशक्त करणे इत्यादी पर्याय शोषणाच्या व्यवस्थांना उत्तर देण्यासाठी उपयोगी ठरतील. ●

---

या लेखासाठी 'सोपेकॉम'मधील सीमा कुलकर्णी, आरती बनकर, 'मकाम' संलग्नित महिला उसतोड कामगार संघटनेच्या स्थानिक कार्यकर्त्या - मनिषा तोकले, छाया पडघन, ज्योती थोरात, क्रांती खळगे, दीपा वाघमारे, अलका पाचपुते, अर्चना सभादिंडे व रुपाली डोंगरे यांचे सहाय्य झाले आहे. तसेच संघटनेशी जोडलेल्या सर्व महिलांनी आपल्या आयुष्यातील कटू अनुभव निर्भयपणे मांडले, त्यांचाही सहभाग या लेखात आहे.

**टिपा :**

१. सहा ते दहा कोयते मिळून एक टोळी बनते जी मुकादम तयार करत असतो. दोन लोकांच्या एका जोडीला कोयता म्हटलं जात. बहुतेक करून नवरा बायकोचा एक पूर्ण कोयता असतो. आपल्या गरजेप्रमाणे कुटुंब मुकादमाकडून उचल घेते व ते फेडण्यासाठी मुकादम ज्याठिकाणी घेऊन जाईल तेथील ऊस तोडून उचल फेडते.

२. तात्पुरते ताडपत्री व बांबूच्या सहाय्याने बनवलेले घर.

३. तोडलेला ऊस गाडीत टाकण्यासाठी त्याचा ४०-४५ किलोचा गठ्ठा बनवला जातो. त्याला मोळी म्हणतात. ती मोळी उचलून महिला एका शिडीच्या सहाय्याने गाडीवर टाकतात.

४. Sugar-belt shocker: the financial and sexual abuse of Maharashtra's migrant workforce - https://www.thehindu.com/news/national/sugar-belt-shocker-the-financial-and-sexual-abuse-of-maharashtras-migrant-workforce/article66573710.ece

परिवर्तनाचा वाटसरू

'परिवर्तनाचा वाटसरू'ची वर्गणी भरूनही काही वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत, असे आमच्या निदर्शनास आले आहे. तसेच काही वर्गणीदारांना त्यांच्या जिल्हा - शहर - पिनकोड प्रभागातील सर्व वर्गणीदारांचे अंक एकगठ्ठा मिळत आहेत. सदर बाबीसाठी आम्ही पोस्टाकडे तक्रार करत आहोत. आपणही पोस्टात तक्रार करावी ही विनंती.

मकाम Makaam दशकपूर्ती

# भविष्य पेरणाऱ्या

स्वाती सातपुते,
सीमा कुलकर्णी

लेखिका 'मकाम'च्या प्रमुख कार्यकर्त्या असून 'सोपेकॉम'मध्ये कार्यरत आहेत.

swatisatpute236@gmail.com

मुख्य प्रवाहातील शेती पद्धतीत महिला शेतकऱ्यांना अनेक बाबतीत दुय्यम स्थान मिळताना दिसते. त्यांचा जमिनीवर अधिकार नसणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे, सर्व साधन संपत्तीतून बेदखल करणे इत्यादी उदाहरणे देता येतील. भांडवली शेती व्यवस्थेत सरसकट सर्वच शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होत असले तरी त्यात महिलांचे अधिक खच्चीकरण होते. या पद्धतीत महिलांच्या ज्ञानाला कमी लेखले जाते अणि त्यांच्या श्रमाला किंमत देण्यात येत नाही.

हवामान बदलामुळे ही परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. बदलत्या हवामानामुळे उत्पादनात बदल होताना दिसत आहेत. तसेच पिकांवरील कीड, रोग आणि शेतातील तण यातही बदल होताना दिसत आहेत. याचे थेट परिणाम उत्पादनावर तर होतीलच पण पुढे जाऊन अन्न सुरक्षितता आणि पोषणावरदेखील होतील. यामुळे महिलांचे आरोग्य आणि रोजगाराच्या संधी कमी होण्याची आणि त्यामुळे आर्थिक तसेच सामाजिक स्थैर्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

वंचित आणि अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांसाठी शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नाही तर ती त्यांच्या अस्तित्वाची ओळख आहे. या भांडवली शेती व्यवस्थेमध्ये महिलांचा कामामधील सहभाग जरी जास्त असला तरी शेतीसंबंधी निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांना कुटुंबात आणि समाजात स्थान नसते. त्या शेती सांभाळतात, कुटुंबाची काळजी घेतात पण हे सर्व श्रम विनामोबदल्याचे असतात, त्याची कुठेही नोंद होत नाही. एका बाजूला पर्यावरणीय ऱ्हास, शेतीवरील संकट आणि दुसऱ्या बाजूला जात, वर्ग आणि पुरुषप्रधानतेमुळे होणारे शोषण यामुळे शेतकरी कष्टकरी महिला एका दुहेरी संकटाचा सामना करताना दिसत आहेत.

पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेती (ॲग्रोइकोलॉजी) ही निसर्गाच्या आणि महिलांच्या शोषणावर आधारित असलेल्या मुख्य प्रवाहातील शेती पद्धतीला एक पर्याय देते. एकसुरी पिके, रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा भडीमार यामुळे शेतीचा ऱ्हास होतो, खर्च वाढतो आणि कर्जाच्या बोजाखाली शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त होतात हे आपण जाणतो. पण शेती व्यवसायाचे हे चित्र पुन्हा सावरू शकते, हे महिला शेतकरी पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेतीचा अवलंब करून दाखवत आहेत. कृषी क्षेत्राची सामाजिक आणि पर्यावरणीय परिमाणे बदलण्याची क्षमता असलेला हा पर्याय म्हणून या पद्धतीला

आज अधिकाधिक मान्यता मिळत आहे. ही पद्धती केवळ शेती तंत्रांमध्ये बदल आणणारी व्यवस्था नसून सत्ता संबंधांबद्दल प्रश्न उपस्थित करणारी एक चळवळ आहे.

**परिवर्तनाची बीजे**

'सोपेकॉम' आणि 'मकाम'च्या सहाय्याने महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा येथील अकोला, नागपूर, यवतमाळ, बीड, हिंगोली आणि परभणी या सहा जिल्ह्यात पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेतीचा प्रयोग राबवीत आहेत. या जिल्ह्यामध्ये कापूस आणि सोयाबीन ही नगदी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. या प्रयोगाची सुरुवात झाली ती कोव्हिड-१९ काळाच्या आसपास. या काळात निर्माण झालेल्या अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे नगदी पिकांच्या शेतीकडून मिश्र शेतीकडे वळण्याची गरज महिलांच्या लक्षात आली. त्यातून पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेती प्रयोगाला सुरवात झाली. महिलांना पर्यावरणस्नेही मार्गाने अन्न व पोषण सुरक्षेचा पर्याय निर्माण करणे हा या प्रयोगाचा प्राथमिक उद्देश. ह्यामध्ये प्रामुख्याने दलित, आदिवासी व इतर समाजातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला, एकट्या महिला, ऊसतोड कामगार महिला आणि इतर अल्प भूधारक महिलांचा समावेश आहे. सहभागी महिला आपल्या अर्धा/एक एकर शेतीवर हा प्रयोग करत आहेत.

या पद्धतीची प्रमुख तत्त्वे अशी आहेत - कोणत्याही प्रकारच्या रासायनिक खते, तणनाशके आणि कीटकनाशकांचा वापर नाही; स्थानिक जातीच्या बियाणांची लागवड; मिश्र पद्धतीने पेरणी; सेंद्रिय पद्धतीने मातीची गुणवत्ता आणि उत्पादकता वाढवणे; विविध मित्र कीटक आणि सूक्ष्मजीवांची संख्या तयार करण्याचे तंत्र अवलंबणे, सोबतच कीटक आणि रोगांचे नियंत्रण व पाण्याचे संवर्धन करण्याच्या नाविन्यपूर्ण पद्धतीचा अवलंब करणे; आणि सर्वात महत्त्वाचे महिला शेतकऱ्यांच्या ज्ञानाला प्राधान्य देणे.

**आम्ही (बी)घडलो**

२०२१मध्ये सुरू झालेल्या या प्रयोगात आज २०२४मध्ये २००हून अधिक महिला सहभागी आहेत आणि 'आमची शेती आमच्या हातात' हे घोषवाक्य घेऊन याचा प्रसार करत आहेत. शेतीतल्या निर्णयप्रक्रियेत महिलांचे स्थान जसे वाढत आहे तसे सामाजिक व कौटुंबिक स्तरावर उलथापालथीचे संकेत दिसत आहेत.

काही महिलांच्या कुटुंबातील पुरुषांना हा प्रयोग पटला नाही. हा प्रयोग म्हणजे जागेचा अपव्यय आहे असे त्यांना वाटले, तेवढ्या जागेत नगदी पीक भरपूर होईल असा त्यांचा त्यामागचा विचार. त्यामुळे बऱ्याच महिला शेतकऱ्यांना प्रयोगात सहभागी होण्यास नकार देणे, प्रयोगास शेत कमी देणे किंवा कमी दर्जाचे शेत देणे असे अनुभव महिलांना आले. यवतमाळच्या एका महिलेला तिच्या पतीने या प्रयोगात सहभागी होण्यास नकार दिला. त्यांच्या मते मुग-उडीद हे पीक येणार नाही आणि तेवढी कापसाची जागा वाया जाणार. 'हा प्रयोग करून तू मला आत्महत्या करायला भाग पाडत आहे', असे त्यांचे मत. शेतातील जागा वाया जाऊ देणार नाही असे आश्वासन देऊन ती महिला प्रयोगात सहभागी झाली. शेतात मुगाचे पीक पाहिल्यानंतर त्यांचे मत बदलले. पुढे जेव्हा गावात कीड व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले तेव्हा त्यात ते सक्रीयपणे सहभागी झाले.

स्वावलंबी शेतीच्या प्रयोगामुळे महिला बैठका, प्रशिक्षण सत्रे यासाठी घराबाहेर पडायला लागल्या. महिला घर आणि शेताच्या चौकटीबाहेर जातात हे अनेकदा कुटुंबातील पुरुषांसाठी अस्वस्थ करणारे ठरते. कविताताई एकदा त्यांच्या पतीला म्हणाल्या - ''तुम्ही कधी नेलं का मला बाहेर? पाहा मी संघटनेमध्ये आहे म्हणून मला आता दिल्लीही पाहायला मिळत आहे.'' हा साधा प्रश्न त्यांच्या आत्मविश्वासाची आणि बदलाची जाणीव करून देतो. परंतु, महिलांचे हे पुढे जाणे सहज

स्वीकारले जात नाही. अनेकदा पुरुषसत्ताक मानसिकतेतून महिलांच्या या प्रगतीला पायबंद घालण्याचे प्रयत्न केले जातात. स्वावलंबी शेतीचा महत्त्वाचा नियम म्हणजे रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर शून्य. कविताताईचा प्रयोग असफल ठरावा आणि संघटनेतील त्यांचे नेतृत्व डगमगावे म्हणून त्यांच्या पतीने अंबाडीच्या पिकावर रासायनिक खत टाकले.

कविताताई यांचे उदाहरण हा केवळ एक किस्सा नसून, प्रयोगातील अनेक विवाहित महिलांना भेडसावणाऱ्या समस्या आणि संघर्षांचे प्रतिबिंब आहे. या प्रयोगात अनेक एकट्या शेतकरी महिलादेखील सहभागी आहेत, त्यांना तर कौटुंबिक आणि सामाजिक अशा दुहेरी अडचणींचा सामना करावा लागतो.

गावांमध्ये एकसुरी पिकांची शेती सर्वसामान्य असल्यामुळे ट्रॅक्टरचा वापर मोठ्या प्रमाणात होतो, त्यामुळे पारंपारिक अवजारे – जसे तिफन, डवरा जे या शेतीला उपयुक्त आहे ते मिळणे ही एक मोठी अडचण आहे. यवतमाळ येथील वर्षाताई सांगतात, ''पुरुष मजुरांच्या मागे लागून बैलाने सारं काम करून घेणं सोपं नाही. अनेकदा बोलावूनही ते वेळेवर येत नाहीत, त्यामुळे कामे उशिराने होतात. पुरुष मजूर बऱ्याचदा महिलांनी सांगितलेले ऐकत नाही वरून सल्ला देतात, रंगबिरंगी शेती करून शेतात काय पिकणार? पण याच शेतात बऱ्याच गोष्टी उपलब्ध असतात त्यामुळे महिलांच्या शेतातील खाण्याची पीके चोरून घेऊन जातात.''

वरुडमधील अनिताताई म्हणतात, ''अशाप्रकारची शेती केली म्हणून घरी खायला मिळाले आणि नवाळीने द्यायला पण मिळाले. कापसाची शेती असेल तर कुणाला कापूस थोडी देणार आहे? आपण कापूस थोडीच खातो, तो सरळ मार्केटला जातो. आमच्या बायकांच्या हाती थोडं असतं काही कापसाच्या शेतीचं?''

आमची अन्नसुरक्षा आमच्या हातात आली असे महिलांना वाटत आहे कारण आधी फक्त २-३ पिकेच घेणाऱ्या महिला आता ३५ वेगवेगळ्या प्रकारची पीके घ्यायला लागल्या. त्यामुळे त्यांच्या आहारात वैविध्य आले. पूर्वी वर्षभरात थोडासा मुग बाजारातून विकत घ्यायच्या पण आता तो घरच्या शेतातच पिकतो त्यामुळे मुगाची खिचडी आणि इतर पदार्थ मनसोक्त खायला मिळतात, असे महिला आनंदाने सांगतात. भाज्यांबाबतही असेच आहे, पूर्वी बाजारातून भाजी विकत घेताना ती ताजी नसेल किंवा महाग असेल तर पैसे वाचविण्याच्या दृष्टीने भाजी विकत घेणे टाळले जाई, पण आता स्वतःच्या शेतात विविध भाज्या पिकवल्यामुळे घरात भाज्या खाण्याचे प्रमाण वाढले. बचत व्हायला लागली सोबतच महिला आवर्जून सांगतात, की तब्येतीमध्ये बदल दिसत आहे.

चंदाताई घोडाम यांच्या अनुभवातून पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेतीचा खरा बदल दिसतो. त्या म्हणतात, ''कृषी केंद्रात जाणं कमी झालं. रासायनिक खतं, बियाणं आणण्याची गरज नाही. शेणखत वापरते, फवारणी करत नाही. आधी वाटायचं घरचं बियाणं उगवत नाही, पण स्वावलंबी शेतीमुळं बियाणं राखायला शिकले.'' आता त्यांचा बियाणांचा खर्च वाचायला लागला आणि महत्त्वाचे म्हणजे त्या व्यापाऱ्याच्या कचाट्यातून मुक्त झाल्या. पूर्वी हाच खर्च जास्त व्हायचा म्हणून त्या अर्धी शेती मक्त्याने द्यायच्या. आता सर्व शेती स्वतः कसतात.

हळूहळू महिला आता बाजारावरचं अवलंबत्व कमी करायला लागल्या. संजीवनीताई म्हणतात, ''मी आता माझं बी जपून ठेवायला लागले. टायमाला पळावं लागत न्हाई. इकत आणायचं कुठून? दुसऱ्या बायांना पण मी बी देते. हळूहळू त्यांच्याकडंही गावरान बी व्हईल. सगळ्यायचाच खर्च वाचंल.'' महिला शेतकरी बियाणांची निवड, संवर्धन आणि देवाणघेवाण करून जैवविविधता टिकवतात. त्यामुळे त्यांना बीज-रक्षक मानलं जातं. त्यांचं बियाणांचं ज्ञान आणि परंपरा

टिकाऊ शेतीसाठी महत्त्वाची आहे. मुख्य प्रवाहातील शेतीत हे ज्ञान दुर्लक्षित केलं जातं, पण स्वावलंबी शेतात महिलांना त्या संधी मिळायला लागल्या.

शेतात कुठलं पीक घ्यायचं इथपासून ते कधी काढायचं, कुठे विकायचं असं सगळं बहुतेककरुन पुरुष ठरवतात. परंतु स्वावलंबी शेती प्रयोगामुळे महिलांच्या शेतीतल्या सहभागाला नवा आयाम मिळाला आहे. आता महिलांनी आपले पारंपारिक ज्ञान आणि अनुभवांच्या आधारे शेतीची दिशा बदलायला सुरुवात केली आहे.

प्रयोगात असलेल्या महिला बारकाईने शेताचं वैज्ञानिक नजरेने निरीक्षण करायला लागल्या, उपाय शोधायला लागल्या. उदाहरणार्थ, 'हरळ' नावाचं गवत सतत काढूनही पुन्हा पुन्हा उगवतं. पण निरीक्षणादरम्यान महिलांच्या लक्षात आलं की, जिथे बोरूचे पीक (तंतुजान्य वनस्पती) असते, तिथे हरळ उगवत नाही. या लक्षात आलेल्या निरीक्षणातून महिलांनी बोरूचा वापर खत आणि नको असलेल्या गवताचा नायनाट करण्यासाठी सुरू केला. आता ज्यांच्या शेतात 'हरळ' असेल ते या महिलांकडे येऊन बियाणे मागतात. हा बदल महत्त्वाचा आहे कारण इथे महिलांच्या ज्ञानाला मान्यता मिळत आहे.

या प्रयोगाचे सर्वात मोठे यश म्हणजे महिलांना शेतकरी म्हणून ओळख मिळायला सुरुवात झाली. हातगावच्या संगीताताई सांगतात, ''आता माझा नवरा मला म्हणतो, तुह्या शेताच तू पाहा, ती जमीन तुझी, तू त्यात हवं ते कर! अमुक तुकडा तुझा!'' असं नवऱ्यानं म्हणणं संगीताताईंना महत्त्वाचं वाटतं. कारण त्या आता केवळ शेतातील कष्ट करणारी व्यक्ती नाही, तर त्यांच्या स्वतः निर्णय घेण्याच्या अधिकाराला मान्यता मिळाली आहे.

बीड जिल्ह्यातील संजीवनी ताई या ऊसतोड कामगार. जमीन म्हणून गायरान त्यांच्या वाट्याला आलेलं. तसेच दलित वंचित समूहातून येत असल्याने आजुबाजूच्या इतर उच्चजातीय शेतकऱ्यांकडून कधी शेतकरी म्हणून बघितलं गेलं नाही. ऊसतोड कामगार म्हणूनच त्यांची ओळख. परंतु जेव्हापासून त्यांनी पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेती प्रयोगाला सुरुवात केली, तेव्हापासून त्यांना एक वेगळी ओळख व इतर कधीही न मिळालेला सन्मान मिळायला लागला, असे त्या सांगतात. एक उच्चजातीय महिला त्यांच्या शेतातील विविधता, विशेषतः पूर्वीची जुनी दुर्मिळ पीके पाहण्यासाठी शेतात आली आणि त्यांच्याकडे बिया मागितल्या. हा बदल एरवी अशक्य होता, पण या प्रयोगामुळे जातीपलीकडे जाऊन शेतकरी म्हणून आपआपसात संवाद होऊ लागला आहे. त्यामुळे सन्मानाची वागणूक मिळत असल्याची भावना महिला व्यक्त करत आहेत.

**पुढचं पाऊल**

या प्रयोगाचे यश हे शेतातील उत्पादकता किती वाढली किंवा उत्पन्न किती वाढलं एवढ्या पुरतं मर्यादित पाहता येणार नाही. या प्रयोगाच्या माध्यमातून महिला घराबाहेर पडल्या, प्रयोग करण्यासाठी कुटुंबात झगडल्या, स्वतःच्या जमिनीवर हक्क सांगता आला, कुटुंबातील महिलांचे स्थान बदलले, आदर वाढला, त्या स्वावलंबी झाल्या, एकसंघ झाल्या, सत्ता संघर्षात बदल व्हायला सुरुवात झाली हे सगळंही खूप महत्त्वाचं आहे. या महिला आता 'पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेतकरी महिला संघटना'च्या माध्यमातून एकत्र येत आहेत व अनुभवाच्या आधारे सरकारकडे आपल्या मागण्याही मांडत आहेत.

नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, महिलांकडे असलेलं शेतीचे ज्ञान आणि येईल त्या संकटाला तोंड देण्याचा विश्वास या आधारावर सुरू झालेला हा प्रयोग सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय संकटाची वलये पार करत आहे. भांडवली आणि बाजारीकरणाच्या या काळात महिलांनी आपल्या शेतीमध्ये हळूहळू बदल घडवून आणले आहेत. या बदलात आणखी इतर

महिला सहभागी होत आहेत. पर्यावरणाशी संवाद साधत सन्मानजनक उपजीविकेच्या मार्गावर चालत राहण्याचा महिलांनी निर्धार केला आहे. आम्ही केवळ शेतात राबणाऱ्या मजूर नाही तर आम्ही शेतकरी आहोत हे त्या कृतीतून दाखवत आहेत. जागतिक तापमान वाढ, हवामान बदल आणि शेतकरी विरोधी धोरणांच्या संदर्भात पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेती प्रयोग पुढील काळात दिशादर्शक ठरेल ह्याची 'मकाम'ला खात्री आहे.

●

---

ह्या लेखाच्या लेखकांसोबतच, या प्रयोगाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी 'सोपेकॉम' टीममधील स्नेहा भट आणि भूमिका कडू ह्यांचा सहभाग आहे. जिल्हा पातळीवर समन्वयाचे काम सांभाळणारे 'मकाम'चे कार्यकर्ते– मनीषा तोकले, माधुरी खडसे, छाया पडघन, शालिनी वानखडे, राजू केंढे, बालाजी नरवाडे, आशा कर्वेवार आणि ललिता तांबारे यांचे आभार.

**टिप** : पर्यावरणस्नेही स्वावलंबी शेतीच्या या प्रयोगात चेतना विकास, वर्धा, तसेच 'मकाम'शी संलग्न असणाऱ्या प्रकृती, प्रेरणा ग्रामविकास संस्था, राजलक्ष्मी प्रतिष्ठान, जागर, उगम आणि सह्याद्री बहुउद्देशीय संस्था या संस्था सहभागी आहेत.

परिवर्तनाचा
वाटसरू

**वर्गणीचे नवे दर** : वार्षिक : ८०० रु., त्रैवार्षिक : २,१०० रु., दशवार्षिक : ६,५०० रु.

डिजिटल कॉपीसाठी वार्षिक ३०० रु., डिजिटल + छापील १००० रु.

**महाविद्यालये व संस्थांसाठीची वार्षिक वर्गणी : १००० रु.**

**'परिवर्तनाचा वाटसरू'**ची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील
आय.डी.बी.आय. बँक, ठाणे – जांभळी नाका, चालू खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 0495102000023296 आयएफएससी क्र. : IBKL0000495

Google Pay PhonePe साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

UPI ID: abhaykanta3@okicici

# स्त्री–अभ्यास शिकण्या–शिकविण्याच्या प्रक्रियेत शेतकरी स्त्रिया

स्वाती देहाडराय

लेखिका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लिंगभाव व स्त्री अभ्यास विभागात सहाय्यक प्राध्यापिका आहेत.

swatidroy@gmail.com

स्त्री–अभ्यास या ज्ञानशाखेच्या उगमाचा प्रवास बघितला तर एका बाजूला स्त्रियांचे किंवा स्त्री–प्रश्नाचे वगळले जाणे ह्याला आव्हान देत तो पुढे आला असे दिसून येते. यामध्ये आत्तापर्यंत तयार झालेल्या ज्ञानविश्वाचा चिकित्सक आढावा घेऊन त्यामध्ये स्त्री प्रश्नाचा समावेश नसल्याने ते कसे अपूर्ण आहे आणि एका प्रकारे पितृसत्ताक एकाधिकारशाही टिकवून ठेवण्यास कशी मदत करते हे त्यांनी अधोरेखित केले. स्त्री अभ्यासाची स्थापनाही प्रस्थापित सामाजिक शास्त्रातील पद्धती, ज्ञानव्यवहार यामधील पितृसत्ताकता आणि विषम व्यवस्थेत ज्याची पाळेमुळे खोलवर रुजलेली असतात हे निर्देशित करण्यासाठी झाली असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

अर्थात स्त्री अभ्यासाने दिलेल्या आव्हानांना मिळालेला प्रतिसाद हा संमिश्र होता आणि स्त्री अभ्यास ही एकीकडे ज्ञानशाखा म्हणून विकसित होत होती आणि दुसरीकडे स्त्रीवादी अभ्यासक या त्या ज्या ज्ञानशाखेत आहेत त्यांना लिंगभाव संवेदनक्षम बनवण्यासाठी प्रयत्नशील होत्या. दोन्ही प्रयत्नांना खूप विरोध झाला असे म्हणता येणार नाही, परंतु स्त्रीवादी अभ्यासाने जी आव्हाने उभी केली होती त्याला शिताफीने बगलही दिली गेली. चालू अभ्यासक्रमात स्त्रियांच्या संदर्भातील एखादा विषय किंवा जास्तीत जास्त एक पेपर (ऐच्छिक) समाविष्ट केला गेला. अर्थात ज्ञानशाखांच्या शिकण्या–शिकवण्याच्या पद्धती आणि विचार करण्याची पद्धत ह्यामध्ये जास्त बदल झाले नाहीत. ज्ञानशाखांच्या वैचारिक चौकटीत जे बदल होणे अपेक्षित होते तेही खूप मोठ्या प्रमाणात झाले नाहीत. या संपूर्ण प्रवासाचा आढावा घेणारे अभ्यास हेच अधोरेखित करतात, की स्त्री प्रश्नाचा समावेश हा कधी (add-on) आहे त्या ढाच्यात आणखी एक धडा / विषय म्हणून चिकटवला गेला, कधी एक स्वतंत्र विषय म्हणून आणला पण खूप कमी वेळेला ज्ञानशाखेच्या वैचारिक चौकटीची पुनर्मांडणी केली गेली.

ऐंशीच्या दशकात सामाजिक शास्त्राच्या प्रवास हा आणखी दोन कारणासाठी महत्त्वाचा होता. एक म्हणजे सत्ता आणि व्यवस्थात्मक पातळीवर कोण वगळले जाते त्यातून प्रस्थापित सत्ता संबंध कसे दृढ होत जातात आणि म्हणूनच संरचनांचा अभ्यास करताना त्यातील सत्तेचे राजकारण तपासून बघणे का गरजेचे आहे ह्यावर सामाजिक शास्त्रामधून मांडणी होत होती. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आत्तापर्यंत शिक्षणाच्या प्रवाहातून ज्यांना बाहेर ठेवले गेले होते ते उदाहरणार्थ स्त्रिया आणि परिघावरील गट (कनिष्ठ जातीय / आदिवासी इत्यादी)

आत्ता संघर्ष करून यामध्ये येऊ लागले होते. हे गट फक्त नव्याने आले असे नाही तर त्यांच्या येण्याने या क्षेत्रतील अनेक गहीतके बदलली आणि त्यात विशिष्ट जात वर्गाच्या मक्तेदारीला आव्हान दिले गेले.

अशा वेगवेगळ्या प्रकारे प्रस्थापित व्यवस्थेला धक्का देत स्त्री अभ्यास ही ज्ञानशाखा म्हणून उभी राहत होती, जिला वरील संदर्भांनी अधिक राजकीय बनवले आणि त्याच प्रमाणे प्रस्थापित होण्यातील धोकेही जाणवून दिले. स्त्री अभ्यासही ज्ञानशाखा ही ज्याप्रमाणे इतर ज्ञानशाखेतील पितृसत्ताकता आणि विशिष्ट गटाची मक्तेदारी ठळक करत होती त्याच वेळी स्त्री अभ्यासातील विशिष्ट विषयांची / गटांची मक्तेदारी आणि काही विषयांचे वगळले जाणे ह्यावरही लागलीच प्रश्नचिन्ह ठेवत होती. त्यामुळे स्त्री अभ्यासात कशाचा समावेश असावा आणि कशावर भर दिला गेला पाहिजे हे सातत्याने चर्चिले गेले आणि त्यातून एका अर्थाने स्त्री अभ्यासाचा पाया हा इंटरसेक्शनॅलिटी / आंतरछेदितता या सैधान्तिक भूमिकेकडे वळला. अर्थात स्त्री अभ्यासात कशाचा समावेश असावा हे त्या अर्थाने कधीच पक्के करणे शक्य होईल असे नाही, पण तरीही त्यात नक्की काय असलेच पाहिजे या विषयीची स्पष्टता होती. त्यामुळे स्त्री प्रश्न इतर संरचना आणि संस्था ह्याच्या पेक्षा वेगळा न काढता त्याचा भौतिक पाया, संरचनात्मक पाळेमुळे, इतर शोषण शासनाच्या व्यवस्था आणि समकालीन सामाजिक राजकीय संदर्भातील त्याचे रुतलेपण या सगळ्याचा विचार हा स्त्री अभ्यास या ज्ञानशाखेच्या गाभ्याशी असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे स्त्री अभ्यासात श्रम, लैंगिकता, हिंसा, जमातवाद, जात आणि जाती आधारित हिंसा, उजव्या गटांचे राजकारण, संस्कृती इत्यादी अशा विविध विषयांवर अभ्यास होत असताना दिसतात. ही यादी सर्व समावेशक तर नाहीच किंवा या लेखात ह्यातील काही मुद्द्यांचा उहापोह करणे हे उद्दिष्ट पण नाही. येथे प्रयत्न एवढाच आहे, की ह्यातील जात, श्रम, हिंसा, लैंगिकता, कुटुंब या विषयी अभ्यास करताना शेतकी क्षेत्रातील स्त्रिया ह्यांचा विचार होणे आणि त्यांचा अभ्यास करणे का गरजेचे आहे.

स्त्री अभ्यासात राबवत असलेल्या वेगवेगळ्या अभ्यासक्रमातून श्रम, स्त्रियांचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा आणि स्त्रियांवर होणारी हिंसा या विषयीचे अभ्यास बघताना प्रकर्षाने जाणवते, की स्त्रियांचे शेतकी क्षेत्रातील श्रम, त्यांचे होणारे शोषण आणि त्यांचे त्यातील योगदान ह्यावर होणाऱ्या अभ्यासाचा संदर्भ घेणे महत्त्वाचे आहे. स्त्री हा कोटिक्रम हा जसा इतर संरचनापासून वेगळा काढता येत नाही त्याचप्रमाणे त्यातील गुंतागुंत जोपर्यंत आपण बघत नाही तोपर्यंत त्यावरील विचार हा बळी किंवा योगदान देणाऱ्या या दोन टोकाच्या भूमिकांमध्ये फिरत राहतो. असे न होता जर त्यातील जटील गुंतागुंत आणि वास्तव जे या दोन टोकांच्या मध्ये आहे ते बघायचे असेल तर लक्ष जरी एक क्षेत्र किंवा मुद्द्यावर केंद्रित करायचे असले तरी त्याचा बहु-आयामी दृष्टिकोनातून विचार होणे आणि त्याची उकल करताना त्यातील बारकावे न सुटता काम करणे गरजेचे आहे. अर्थात या साठी विविध क्षेत्रात काम करत आहेत त्या स्त्रियांचा अभ्यास होणे गरजेचे आहेच. पण त्याचबरोबर वेगवेगळ्या गटांकडून स्त्रियांच्या प्रश्नावर जे काम होते आहे प्रामुख्याने रूढ अशा अभ्यासाच्या चौकटीत किंवा संस्थाच्या बाहेर होणाऱ्या अभ्यासांची नोंद घेणे गरजेचे आहे. थोडक्यात स्त्री अभ्यासाच्या शिकण्या-शिकवण्याच्या प्रक्रियेत ह्याचा समावेश होणे गरजेचे आहे. प्रामुख्याने शिकण्या शिकवण्या-साठीचे साहित्य आणि प्रत्यक्ष



क्षेत्रात काम करणाऱ्यांनी जे लिहिले आहे त्याचा स्त्री अभ्यासाच्या अभ्यासक्रमात आणि वर्गात कसा समावेश करता येईल ह्याविषयी अधिक सजगपणे काम होणे गरजेचे आहे. अगदी थोडक्यात येथे शेती आणि स्त्रिया ह्याविषयाचा विचार केल्यास हे लक्षात येते, की हा विषय त्या अर्थाने दुर्लक्षित नाही. पण शेती आणि स्त्रिया ह्यावर स्त्री अभ्यास ज्ञानशाखेमधून खूप संशोधन होताना दिसत नाही. त्या उलट 'सोपेकॉम' आणि 'मकाम'सारख्या संस्था या शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नावर धोरणात्मक काम करत आहेतच पण त्याचबरोबर त्या शेतकरी स्त्रिया आणि त्यांचे वास्तव ह्यावर जे संशोधन करत आहेत ते अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या अभ्यासातून त्या शेतकरी स्त्रियांचे वास्तव तर पुढे आणत आहेतच, पण त्याही पेक्षा त्या ग्रामीण भाग, त्याचे बदलते वास्तव आणि त्यातून शेती, स्त्रिया, हिंसा आणि संपत्तीचा अधिकार या विषयातील जटिलता त्या मांडतात. अजून एक महत्त्वपूर्ण मुद्दा म्हणजे सदर अभ्यास हे जी संशोधन पद्धती वापरतात, ज्या प्रकारे संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावतात हे स्त्रीवादी अभ्यासाच्या पद्धतीशास्त्रासाठी एक महत्त्वपूर्ण योगदान आहे. थोडक्यात अशा संस्था, ते करत असलेले संशोधन आणि स्त्री-अभ्यास या अकादामिक क्षेत्रात पाय रोवून उभ राहू पाहणाऱ्या ज्ञान शाखेतील संवाद हा महत्त्वाचा आहे.

ज्या प्रमाणे सुरुवातीला स्त्रिया जे म्हणत आहेत ते ज्ञान आहे आणि त्याला अकादामिक क्षेत्रात दर्जा मिळाला पाहिजे किंवा अकादामिक क्षेत्रातील गृहितकांना आव्हान देणारे संशोधन महत्त्वाचे आहे आणि त्यातून आजपर्यंत जे दुर्लक्षित राहिले आहेत त्यांचे आवाज पुढे आले पाहिजेत ही मांडणी झाली आणि त्यासाठी संघर्ष झाला (जो अजूनही संपलेला नाही) त्याचबरोबर ज्ञान निर्मिती कोण करते आणि त्यामागील सत्ताकारण काय आहे किंबहुना जे सत्ताधारी आहेत त्यांची सत्ता अधिक बळकट करण्यासाठी ज्ञाननिर्मिती काय प्रकारे केली जाते या विषयीचा जो विचार सामाजिक शास्त्रात झाला त्याचा विचार होणे गरजेचे आहे. इथे पुन्हा एकदा शेती आणि स्त्रिया ह्यावरील अभ्यासाकडे वळलो तर हे लक्षात येते, की स्त्रियांचे सामाजिक स्थान आणि त्यांच्यावर होणारी हिंसा हे परस्परांमध्ये गुंतलेले आहेत. शेती आणि स्त्रिया ह्यावरील अभ्यासातून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील स्त्रिया, एकल स्त्रिया ज्या शेती करत आहेत, खंडाने शेती करणाऱ्या स्त्रिया किंवा ज्या शेतावर काम करतात (भूमिहीन शेत मजूर) या वास्तवाचा त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर कसा आणि काय परिणाम होतो आणि पितृसत्ताक व्यवस्था त्यांना उपलब्ध असणाऱ्या संधी, त्या कोणती स्वप्नं बघू शकतात किंवा नाही या सगळ्यावर कसा निर्बंध आणतात हे सगळे स्पष्ट होते.

स्त्री अभ्यासाच्या अभ्यासक्रमात वेगवेगळ्या अवकाशामधून निर्माण होणाऱ्या ज्ञानाचा जर समावेश केला गेला तर स्त्री-प्रश्न विषयक विचार हा अधिक सघन तर होईलच पण त्याचबरोबर ज्ञान कशाला म्हणायचे आणि कोणते स्त्रोत आणि मांडणी त्यासाठी वापरली जाऊ शकते या विषयीच्या प्रस्थापित सामजुतींना धक्का देता येऊ शकेल. स्त्रियांचा बदलता दर्जा, त्यांच्या शोषणाचे बदलते स्वरूप, जातिव्यवस्थेची पकड आणि शोषण शासन व्यवस्थांचा भौतिक आणि सांस्कृतिक पाया स्पष्ट करणारे संशोधन हा स्त्री-अभ्यासाचा पाया अधिक बळकट बनवते त्यामुळे वर म्हंटल्याप्रमाणे असे संशोधन हे स्त्री अभ्यासाच्या शिकण्या शिकवण्याच्या प्रक्रियेचा भाग असला पाहिजे. स्त्री अभ्यास हा त्यातूनच धोरणात्मक बदल आणि वैचारिक मांडणी ह्यातील कृत्रिम द्वैत मोडून काढू शकेल आणि स्त्री अभ्यासाचा परीघ त्यातून अधिक व्यापक होईल. शेतकरी स्त्रियांवरील अभ्यासातून त्यांच्या शोषणाचा जात, वर्ग, पितृसत्ता या सारख्या शोषण शासनाच्या व्यवस्थांचा पाया समजून घेता येतो आणि शेती क्षेत्राचा लिंगभाव दृष्टिकोनातून आकलन पण पुढे येते. ●

*गाँव छोडब नहीं, जंगल छोडब नहीं,*
*माय माटी छोडब नाहीं लडाई छोडब नहीं।*
*बाँध बनाए, गाँव डुबोए, कारखाना बनाए,*
*जंगल काटे, खदान खोदे, सेंक्चुरी बनाए,*
*जल जंगल जमीन छोडी हमिन कहाँ-कहाँ जाएँ*
*विकास के भगवान बता हम कैसे जान बचाएँ।*

# ओरिसामधील विस्थापनविरोधी जनआंदोलनाची गाथा

## ललित भवरे

दुसऱ्या महायुद्धानंतर, जगभरामध्ये विकासाच्या चर्चेला सुरुवात झाली. १९५०च्या दशकात उदयास आलेल्या विकासाच्या सिद्धांकनाने औद्योगिकीकरण, राष्ट्रीय उत्पादनात वाढ, तंत्रज्ञानात्मक प्रगती आणि आधुनिकीकरणावर भर दिला. परिणामी वसाहतवादी साम्राज्याच्या जोखडातून नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्र-राज्यांनी आर्थिक विकास हे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले. विकासाच्या या संकुचित दृष्टिकोनाला साध्य करण्यासाठी, अन्य राष्ट्रांप्रमाणे भारतानेदेखील स्वातंत्र्योत्तर काळात नियोजित योजनांच्या माध्यमातून शेती आणि उद्योगधंद्यांच्या विकासाकरिता मोठमोठी धरणे, खाणी, महामार्ग, पर्यटनस्थळे, अभयारण्य, औष्णिक विद्युत केंद्र आणि अणुऊर्जा प्रकल्प आदि विकास प्रकल्पांना प्राधान्य दिले. अगदी १९९०च्या दशकाच्या सुरुवातीला नव-आर्थिक धोरणाचा स्वीकार करून खासगी कारखानदारीला व परदेशी भांडवल गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. नव आर्थिक धोरणानुसार शेती, उद्योग, व्यापार याबाबतची धोरणे बदलण्यात आली. भांडवली कारखानदारीला उत्तेजन देण्याकरिता कोळसा, पोलाद, स्टील, लोखंड, वीज इतकेच नव्हे तर अन्न-धान्य, शेती आणि मासेमारीच्या क्षेत्रात खासगी राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांना भांडवल व तंत्रज्ञान स्वरूपातील गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. नवउदारवादी धोरणातील बदलानुसार देशाचा ‘विकास’ घडवून आणायचा असेल तर, नैसर्गिक संसाधनांवर राज्यसंस्थेचे अधिकाधिक नियंत्रण असावे, या मुद्द्यावर भर दिला गेला. ज्यामुळे जल, जंगल, जमीन आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि हक्क याविषयी स्थानिक समाज व समुदाय आणि राज्यसंस्था यांच्यातील संबंध अधिक गुंतागुंतीचे आणि संदिग्ध बनले. आजपर्यंत जंगल, जमिनीचे व्यवस्थापन विकेंद्रित पद्धतीने होत होते ते आता केंद्रित पद्धतीने होत आहे. परंपरेने ज्या समुदायांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असलेल्या व शेकडो वर्ष ज्यांनी नैसर्गिक संसाधनाचे व्यवस्थापन केले, त्यांना

लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लिंगभाव व स्त्री अभ्यास विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत.
lbhaware@gmail.com

कधी विकास तर कधी जंगल, जमीन संवर्धनाच्या नावाखाली हुसकावून लावले गेले/लावले जात आहे.

अशाप्रकारे, स्वातंत्र्यपासून ते आजपर्यंत वेगवेगळ्या विकास प्रकल्पाच्या नावाने हुसकावून लावलेल्या ओरिसातील विस्थापितांच्या जनआंदोलनाची गाथा रंजना पाढी आणि निगमानंद षडंगी यांनी *रेझिस्टींग डिसपझेशन : द ओडिशा स्टोरी* पुस्तकात मांडली आहे. हे पुस्तक २०२० साली आकार प्रकाशनाने प्रकाशित केले, तर राजेंद्र सिंह नेगी यांनी २०२३ साली सदर पुस्तकाचा हिंदी अनुवाद 'गाँव छोडब नहीं' प्रकाशित केला आहे. सदर पुस्तकामध्ये १९५०च्या दशकात ओरिसामध्ये उभारण्यात आलेल्या हिराकूड धरणाच्या प्रकल्पापासून ते समकालीन काळात पॉस्को (दक्षिण कोरियाची पोहाँग आयरन अँड स्टील कंपनी) आणि वेदांता प्रकल्पापर्यंतचा आढावा घेण्यात आला आहे. पंडित नेहरूंनी 'आधुनिक भारताची मंदिरे' असे संबोधलेल्या विकास प्रकल्पांच्या उभारणीमध्ये, ज्यांची वारंवार आहुती दिली गेली, त्या ओरिसातील सर्वसामान्य शेतकरी, आदिवासी, स्त्रिया, दलित, वंचित, मच्छीमार, आणि भूमिहीन मजूर कष्टकऱ्यांच्या विद्रोह, प्रतिकार आणि बलिदानाचा इतिहास प्रस्तुत पुस्तकामध्ये रेखाटला आहे.

सदर पुस्तकामध्ये विस्तृत प्रस्तावनेसह एकूण १० प्रकरणांचा समावेश आहे. प्रत्येक प्रकरण स्थळ-काळ-परिस्थितीनुरूप योजले आहे. ओरिसातील मोठी धरणे, खाणकाम आणि औद्योगिक प्रकल्पामुळे पर्यावरणाची होणारी हानी, विस्थापन आणि त्याविरुद्ध स्थानिक लोकांच्या प्रतिकाराच्या सामाजिक आणि राजकीय घटनांचा इतिहास या प्रकरणांत मांडला आहे.

ओरिसा राज्य हे जंगल, पहाड, नद्या, समुद्र किनारपट्टी, नैसर्गिक संपदा आणि मुबलक खनिज संपत्तीने संपन्न आहे. देशातील सुमारे ६०% बॉक्साइट, ९८.४% क्रोमाइट, ९१.८% निकेल, ३२.९% लोह, २४.८% कोळसा आणि ६७.८% मँगेनीजचे प्रचंड साठे ओरिसामध्ये आहे. खनिज संपत्तीच्या मुबलकतेमुळे देश-विदेशातील कंपन्यांनी आपला मोर्चा ओरिसाकडे वळविला. पॉस्को, जेएसडब्लू, टाटा, बिर्ला, वीज़ा, जिंदाल, महाराष्ट्र सीमलेस, वेदांता ल्युमिना लि. यासारख्या डझनाहून अधिक कंपन्यांनी याठिकाणी आपले खाण प्रकल्प उभारले आहेत आणि अजूनही काही कंपन्या खाणकामाची योजना आखत आहेत. खाणकामासाठी कंपन्यांना जमिनीची आवश्यकता आहे. ओरिसाचा खनिज संपत्तीयुक्त भाग हा प्रामुख्याने डोंगर, जंगल आणि पहाड आच्छादित आहे. ज्याठिकाणी अनेक शतकांपासून आदिवासी समुदायाचे वास्तव्य आहे. जंगल हेच येथील आदिवासींच्या उत्पादनाचे आणि उपजीविकेचे एकमात्र साधन आहे. परंतु आज मुठभर भांडवलदारांच्या आर्थिक लाभासाठी, लाखो लोकांच्या उपजीविकेचे एकमेव साधन असलेली वनजमीन त्यांच्याकडून बळजबरीने काढून घेतली जात आहे. त्यामुळे त्यांचे शाश्वत जगणे धोक्यात आले आहे. राज्यसंस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या 'विकास प्रकल्पा'मुळे पिढ्यांपिढ्यापासून अस्तित्वात असलेली गावे, संस्कृती ध्वस्त होत आहेत. उपजाऊ शेतजमीन, पान उत्पादन, भातशेती, पशुपालन आणि मासेमारी यांसारख्या सर्वसामान्य समुदायांच्या उपजीविकेचे स्त्रोत नष्ट होत आहेत. विविध प्रकारच्या वनऔषधी, वनस्पती, पर्वत, जंगले, नद्या आणि जमिनीचे सपाटीकरण करून त्यांना त्यांच्या स्वतःच्या 'माय माटी' पासून कायमचं बेदखल केल जात आहे. राज्यसंस्था, लोकनियुक्त प्रतिनिधी, कंपनीचे एजंट आणि सरकारी यंत्रणांकडून साम, दाम, दंड, भेद या चाणक्य नीतीचा वापर करून गरीब आदिवासी, दलित लोकांच्या जंगल, जमिनीचे अधिग्रहण केले जात आहे. त्यामुळे राज्यसंस्था आणि कंपन्यांच्या दडपशाही विरोधात स्थानिक जनतेने लढा उभारला, त्या लढ्याच्या साक्षी, नोंदींचा आढावा सदर पुस्तकात घेतला आहे.

स्थानिक रहिवाश्यांनी खाणकाम विरोधी आंदोलन

तीव्र करत ऐंशीच्या दशकामध्ये गंधमार्धन पर्वतावर, भारत ॲल्युमिनियम लिमिटेड कंपनी (बाल्को) द्वारे बॉक्साईट खाण निर्मितीची आखलेली योजना उधळून लावली. शिवाय, भारत सरकारतर्फे उभारण्यात येणाऱ्या *नॅशनल टेस्ट रेंज*च्या विरोधात बलियापाल भागातील लढा ही यशस्वी ठरला. ओरिसातील सामान्य स्त्री-पुरुषांनी जनआंदोलन उभे करून पॉस्कोसारख्या बलाढ्य कंपनीच्या विरोधात एक दशकाहून अधिक काळ लढा दिला. अंतिमतः २०१७ साली पॉस्कोला आपले गाठोडे बांधून पलायन करावे लागले. परंतु जेएसडब्लू कंपनी विरोधातील संघर्ष आजही सुरू आहे. तसेच, कालाहंडी जिल्ह्यातील नियामगिरी पर्वताच्या पायथ्याशी वेदांता ल्युमिना लि.ने रिफायनरी प्लँटची उभारणी केली, ज्याची नजर नियामगिरीच्या बॉक्साईटवर आहे. परंतु या डोंगरावर राहणाऱ्या डोंगरिया कोंड समाजाकडून याचा निकराने प्रतिकार होत आहे. हा प्रतिकार म्हणजे विकासाच्या विरोधात गरीब आदिवासी, शेतकरी, स्त्रिया, दलितांचा एल्गार आहे.

याशिवाय, विकासाच्या नेहरूवादी प्रारुपाच्या आधारे उभारण्यात आलेल्या हिराकुड आणि रेंगाली धरणाच्या विरोधातील शेतकरी आणि भूमिहीनांचा प्रतिकार आणि त्यांचे झालेले अतोनात नुकसान धरणग्रस्तांच्या कथनांमधून अधोरेखित केले आहे. हिराकुड आणि रेंगाली धरणग्रस्तांच्या मुलाखतीमधून विकासाचा भकासपणा अधोरेखित होतो. त्यांचे पुनर्वसन कधीही पूर्ण झाले नाही. तसेच १९९०च्या दशकातील ओरिसा सरकार आणि टाटाच्या कोळंबी शेती प्रकल्पाच्या विरोधातील मत्स्यबी महासंघ आणि चिल्का बचाव आंदोलनाने खंबीरपणे केलेल्या प्रतिकाराचे वर्णन पुस्तकात आहे. चिल्का हे आशियातील सर्वात मोठे जलसरोवर आहे, जे दोन लाखांपेक्षा अधिक अवलंबित असलेल्या लोकांचे घर आणि ५०,००० मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाच्या रोजगाराचे ठिकाण आहे. शतकानुशतके याठिकाणी अधिवास आणि मच्छिमारीचा व्यवसाय करून उपजीविका भागवणाऱ्या समुदायांना तथाकथित विकासाच्या नावाने हुसकावून लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. याविरोधात सर्व मच्छिमार समुदायांनी जनआंदोलन उभारून टाटाच्या कोळंबी प्रकल्पाला माघार घेण्यास भाग पाडले. ह्याप्रकारच्या अनेक छोट्या-मोठ्या आंदोलनांची त्यांच्या यश-अपयशाची आणि परिघावरील समुदायांच्या प्रतिकाराची दखल सदर पुस्तकात घेण्यात आली आहे.

एकूणच, सदर पुस्तक हे जल, जंगल, जमीन आणि स्व-अस्तित्वासाठी चुकीच्या विकास धोरणांच्या विरोधात प्रतिकार करणाऱ्या बेनाम नायक-नायिकांच्या विलक्षण संघर्षाच्या गाथांचा इतिहास आहे. या पुस्तकातील सामान्य जनांच्या, विशेषतः स्त्रिया, दलित, आदिवासी आणि उपेक्षित समुदायांच्या जीवनावर विकास प्रकल्पामुळे झालेला परिणामांच्या कथा वाचल्यानंतर, विकासाबद्दल संभ्रम व भीती निर्माण होते. सदर पुस्तकामध्ये विस्थापित पीडितांनी सांगितलेल्या मदत आणि पुनर्वसनाच्या कथा मार्मिक आणि भयानक आहेत. तर दुसऱ्या बाजूला विस्थापित जगणे वाट्याला येऊ नये म्हणून सामान्य जनसमूहांनी केलेला प्रतिकार प्रेरणादायी आणि बळ देणारा आहे.

विकास आणि विस्थापनाच्या संदर्भात एका विशिष्ट मुद्द्यापर्यंत आपण हे मान्य केले आहे की, विकास प्रकल्पांच्या निर्मितीमध्ये विस्थापन अपरिहार्य बनते आणि काहीवेळा विकासाचा मार्ग तयार करण्यासाठी कदाचित ते आवश्यक आहे. परंतु, राज्यसंस्था ज्यांच्या जीवावर विकास साध्य करू पाहत आहे त्यांच्या विकासाचे, पुनर्वसनाचे व पुनर्स्थापनेचे काय? 'विकासामुळे' बहुसंख्यांक उपेक्षित नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त होत असेल तर मग त्या विकासाचा उपयोग काय? हे प्रश्न सदर पुस्तकाच्या वाचकांना अस्वस्थ करतात आणि संवेदनशील बनवतात. कारण समकालीन सदोषविकासाच्या प्रतिमानामुळे समाजामध्ये विषमता

**(पृष्ठ क्र. ५२वर)**

Makaam
दशकपूर्ती

# झारखंडमधील लिंगभाव, जमीन आणि विकासाची गुंतागुंत

स्नेहा गोळे

*क्वेस्ट फॉर आयडेंटिटी : जेंडर, लँड अँड मायग्रेशन इन कंटेंपररी झारखंड* (अस्मितेच्या शोधात : समकालीन झारखंडमधील लिंगभाव, जमीन आणि स्थलांतर) हे पुस्तक नित्या राव यांनी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा संग्रह आहे. गेल्या २५ वर्षांच्या काळात राव यांनी झारखंडमधील विकासविषयक व्यवहार आणि चर्चाविश्वाचे केलेले विश्लेषण या लेखांमध्ये आहे. यात प्रामुख्याने लेखिकेने संथाल परगणा प्रदेशात आदिवासी समूहांबरोबर केलेल्या अनुभवांवर आणि संशोधनावर आधारित लेखनाचा समावेश आहे. आदिवासी समूहांमधील संशोधनावर हे पुस्तक आधारित असल्यामुळे लिंगभावाचा विचार केवळ स्त्री-पुरुष आणि त्यांच्या सामाजिक भूमिका आणि नातेसंबंध यापुरता मर्यादित न राहता, लिंगभाव ही संकल्पना गतिमान आणि गुंतागुंतीची कशी आहे हे लक्षात येते. त्यामुळे लिंगभावाचा अभ्यास करताना विमर्षात्मक पद्धतीशास्त्र का महत्त्वाचे आहे हे पुढे येते. दुसरे असे की या पुस्तकातील लेख आदिवासी समूहाचे आकलन त्यांच्या पर्यावरणाच्या संदर्भात आणि जमीन आणि श्रमासंबंधी त्यांच्या संकल्पनिकरणाला समजून घेऊन अधिक खोलात करतात. या विचारधारा आदिवासी समूहांमधील अंतर्गत उतरंडी कशा निर्माण करतात आणि इतर समूहांशी असलेल्या सत्ता संबंधांत काय भूमिका बजावतात याचा अन्वयार्थ या पुस्तकात लावण्याचा प्रयत्न राव यांनी केला आहे. वैयक्तिक आणि सामूहिक, मानवी आणि पर्यावरणीय गरजांची गुंतागुंत समजून घेण्यासाठी घर-दार, समूह आणि व्यक्ती यांच्यातील संबंध बदलत्या आर्थिक आणि राजकीय संदर्भात स्थानांकित करण्याचे महत्त्व या लेखांमधून पुढे येते.

प्रस्तुत पुस्तक सहा विभागांमध्ये विभागलेले आहे. पहिल्या विभागात लिंगभाव आणि जमीनविषयक लेखांचा समावेश आहे. या लेखांमधून तीन महत्त्वाचे मुद्दे पुढे येतात. एक, लिंगभावाचा अधिक गुंतागुंतीचा विचार, जो स्त्रियांना एकसारख्या गरजा असणारा एकजिनसी गट म्हणून बघत नाही. स्त्रियांच्या सामाजिक आणि गणगोतातील स्थानामुळे त्यांच्या गरजा वेगवेगळ्या असतात हे अधोरेखित करत या विभागातील लेखांमधून स्त्रियांचे मुद्दे आणि लिंगभावाचे मुद्दे यातील फरक पुढे येतो. दुसरा मुद्दा म्हणजे जमीनीचा अस्मितेशी आणि समाजातील दर्जाशी असणारा संबंध. उत्पादनामधील जमीनीच्या उपयुक्ततेपेक्षा जमीन असण्यातून समाजातील आणि समूहातील तुमच्या सत्तेत जो फरक पडतो, त्यामुळे जमिनीवरील हक्क सांगण्याच्या प्रक्रियेतील

लेखिका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लिंगभाव व स्त्री अभ्यास विभागात सहाय्यक प्राध्यापिका आहेत.

gole.sneha@gmail.com

सामाजिक संदर्भ स्पष्ट होतात. त्यामुळे जरी कायदेशीर रित्या जमिनीवर हक्क सांगणे शक्य असले, तरी अनेक स्त्रिया सामाजिक वाटाघाटींचा मार्ग का स्वीकारतात ते यातून लक्षात येते. तिसरा मुद्दा असा आहे, की जमीन हक्क हा इतर हक्कांच्या बरोबरीने हक्कांच्या गुच्छाचा भाग म्हणून येतो आणि त्यांच्या वाटाघाटी सामूहिक संस्था ते न्यायालये या वेगवेगळ्या क्षेत्रात घडतात.

दुसऱ्या विभागात स्थलांतर आणि अस्मिता यांची चर्चा करताना श्रमासाठी केलेल्या स्थलांतरातील असमान सत्ता संबंधांची चर्चा केलेली आहे. यात केवळ ठेकेदार आणि श्रमिक यांच्यामधीलच नाही, तर स्त्री आणि पुरुषांमधील सत्ता संबंध सुद्धा कशा पद्धतीने ऐरणीवर येतात याचा आढावा राव घेतात. संथाल समाजातील लिंगभाव संबंधांची जडण घडण कशी होते यावर त्यातून प्रकाश पडतो. यातील दोन प्रकरणे श्रमिकांच्या प्रतिनिधित्व आणि प्रतिष्ठा यांची चर्चा करतात. घरातील आणि कामाच्या ठिकाणी असणाऱ्या श्रम आणि सामाजिक नातेसंबंधांचे परीक्षण करीत असताना त्या दाखवून देतात, की या दोन्हींमधील अंतर, एकीकडे श्रमिकांना ग्रामीण संदर्भात वय आणि लिंगभावावर आधारित सत्ता संबंधांना आव्हान करण्याच्या संधी उपलब्ध करून देते, तर दुसरीकडे ते जिथे काम करायला स्थलांतर करतात तिथे मात्र शोषणग्रस्त कामाच्या परिस्थितीचा त्यांना सामना करावा लागतो. या भागातील तिसरे प्रकरण शिक्षणासाठी स्थलांतर आणि त्यातून आदिवासी तरुणांमध्ये निर्माण होणाऱ्या आशा-आकांक्षा यांची चर्चा करते. मात्र आदिवासी अस्मितेभोवती असलेल्या भ्रामक कल्पना आणि ठोकताळे यांच्यामुळे शिक्षणाच्या संधींवर घाला येणे आणि आशा-आकांक्षा अपुऱ्या राहणे हे कसे घडते, याचा आढावा या प्रकरणात दिसतो.

समूह आणि घर-दाराच्या परिप्रेक्ष्यातून उदरनिर्वाह आणि खुशहाली/ कल्याण (well-being) यांच्यामधील नात्याचा वेध तिसऱ्या भागातील प्रकरणांमध्ये पुढे येतो. सामूहिक पातळीवर विस्थापनाचे लिंगभावात्मक पैलू काय आहेत याचा शोध ऐतिहासिकरित्या घेण्याचा प्रयत्न राव करतात. यात प्रामुख्याने विस्थापनासाठी मिळालेल्या नुकसानभरपाईच्या रकमेचे फायदे काय असू शकतात आणि त्याचबरोबर विस्थापित समूहासाठी कोणते नवीन धोके निर्माण होतात याचा आढावा घेतला आहे. एकीकडे राज्यसंस्थेची अपुरी राहिलेली वचने आणि त्याच्या जोडीला वैयक्तिक पातळीवर केलेल्या शैक्षणिक आणि इतर गुंतवणुकीचे अपयश, ज्यायोगे लोकांच्या आयुष्यात कोणत्याही प्रकारे मूलभूत फरक पडत नाही. या सगळ्यातून समूहांपुढे असणारी आव्हाने अधिक तीव्र होत गेली आहेत अशी मांडणी या विभागातून पुढे येते. यातील दोन प्रकरणांमध्ये लिंगभाव आणि पिढ्या यांच्यातील नाते श्रम विभागणी आणि मालमत्तेच्या उपलब्धतेच्या संदर्भात तपासून पाहतात, तसेच यात सरकारी धोरणांची काय भूमिका आहे याचीही चर्चा करतात. उदाहरणादाखल, स्त्रिया काम करीत असलेले विविध अवकाश, जसे की शेत, जंगल, हाट यांचा विचार दळण-वळणासंदर्भातील धोरणे आखताना केला जात नाही, कारण दळण-वळणाची साधने ही अतिशय मर्यादित अर्थाने 'आर्थिक' समजल्या गेलेल्या औपचारिक बाजारपेठांना केंद्रस्थानी ठेवून बांधली जातात, आणि त्यामुळे उत्पादक असलेल्या अनेक कामांना त्यात स्थानच मिळत नाही. याचा विपरीत परिणाम हे विविध अवकाश व्यापणाऱ्या स्त्रियांवर होतात.

चौथ्या विभागात अधिक विमर्षात्मक दोन प्रकरणांचा समावेश आहे, ज्यात धोरण निर्मितीच्या विविध पैलू आणि जमीनविषयक कायदे आणि धोरणांचा सखोल विचार करण्यात आला आहे. हे दोन्ही लेख झारखंड राज्याच्या स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात लिहिलेले आहेत, ज्यावेळी आदिवासी समूहांच्या नवीन राज्याकडून असंख्य स्वप्ने आणि आशा-आकांक्षा होत्या. पण काही काळातच या आशा-आकांक्षांवर

पाणी फिरले, जेव्हा असे लक्षात आले, की नवीन राज्य आदिवासींच्या गरजा पूर्ण करण्यापेक्षा आधुनिक विकासनिगडित कल्पनांना अधिक महत्त्व देत आहे. यातील पहिल्या प्रकरणात झारखंड राज्याच्या ‘व्हिजन २०१०’ या धोरणात्मक दस्ताऐवजाच्या विश्लेषणातून राव दाखवून देतात, की ह्यात अन्न सुरक्षा, भुकेपासून मुक्तता, आणि रोजगार या सारख्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष केले गेले आहे. यातील दुसऱ्या प्रकरणात शेतीविषयक विस्तार कार्यक्रमांमधील आदिवासींचा कमी प्रमाणातील सहभाग हा त्यांना राज्यसंस्थेकडून ‘आळशी’ आणि ‘मागास’ ठरवण्यासाठी कसा वापरला जातो याची चर्चा येते. या असहभागाची कारणे त्यांच्यासमोरील संरचनात्मक अडचणींमुळे आहेत, हे समजून न घेता, त्यांना विकासात रस नाही अशी मांडणी केली जाते. तिसऱ्या प्रकरणामध्ये जमीनविषयक कायद्यांच्या सखोल अभ्यासातून राव त्यातील विसंगती आणि पळवाटा प्रकाशात आणतात, ज्यामुळे आदिवासींच्या जमिनी त्यांच्यापासून हिरावल्या जाऊ नयेत यासाठी कायदेशीर तरतुदी अस्तित्वात असताना सुद्धा, मोठ्या प्रमाणात आदिवासींची त्यांच्या जमिनीपासून फारकत होत आहे.

शेवटच्या निष्कर्षात्मक प्रकरणामध्ये झारखंड राज्याच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत त्याच्या विकासविषयक मार्गक्रमाचा आढावा घेतला आहे, ज्यात धोरणात्मक कथानकांचा आणि धोरणांच्या मुळाशी असलेल्या गृहितकांची चिकित्सा केली आहे तसेच बदलासाठी आवश्यक संधी कोणत्या आहेत याचा आढावा घेतला आहे. आदिवासी युवक समानतेच्या तत्त्वावर आधारित समूहांच्या बांधणीतून आपल्या पारंपारिक अस्मिता आणि ज्ञान यावर पुन्हा हक्क सांगत आहेत आणि त्यामुळे एक आशादायी भविष्याची कल्पना होऊ शकते अशी मांडणी राव यात करतात.


एकीकडे संथाल परगण्यामधील गरीब, आदिवासी स्त्री आणि पुरुषांचे दैनंदिन आयुष्यातील कर्तेपण या पुस्तकातून पुढे येते, मात्र त्याबरोबर या भागातील समूहांच्या सामाजिक पुनरुत्पादनाचे अरिष्ट काय आहे हेही अधोरेखित होते. यात भौतिक गरिबी किंवा कमी प्रमाणातील उत्पादकता हा केवळ प्रश्न नसून, परस्परसहकार्य आणि मिळून-वाटून राहणे यावर आधारित सांस्कृतिक आणि सामाजिक संरचना हळूहळू लोप पावत जाणे, व्यक्ती आणि समूह यांच्या गरजांमध्ये समन्वय साधणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे काही प्रमाणात लिंगभाव समानता प्रस्थापित करणे, असे सर्व मुद्दे आहेत. पारंपारिक संथाल समाजामध्ये मुलींना मुलांइतकेच महत्त्व होते, मात्र बदलत्या संदर्भात बालविवाहांचे प्रमाण वाढले आहे आणि वधुमुल्याची जागा हुंड्याने घेतली आहे. जमीन पवित्र मानली जात असे आणि मानव आणि त्यांच्या पर्यावरणामध्ये आदर आणि परस्परपूरकता यावर आधारित सहजीवन होते. मात्र आता जमिनीला व्यावसायिक मळे आणि विनियोगासाठी कुंपणे घातलेली दिसतात. जमिनीपासून झालेल्या फारकतीमुळे गेल्या दोन दशकात आदिवासी तरुण सर्रास कामाच्या आणि रोजगाराच्या शोधात दूरवर स्थलांतर करताना दिसतात. स्त्रिया घर आणि जमीन चालवायला मागे राहतात, ज्यातून कदाचित दैनंदिन पातळीवर त्यांचा कर्तेपणा पुढे येतो, मात्र उत्पादन आणि पुनरुत्पादनातील परस्परपूरकता आणि सहकार्य यांची कमी त्यांना जाणवत राहते, असे प्रतिपादन राव करतात.

राव यांचे काम ऐतिहासिक आणि लोकलेखा पद्धतीच्या समन्वयातून झारखंडमधील बदलत जाणाऱ्या लिंगभाव, अस्मिता, जमीन आणि विकासाच्या राजकारणाचा आढावा घेतात. स्त्रिया आणि शेती यांची चर्चा मर्यादित स्वरूपात न करता, आदिवासी अस्मितेवर आधारित नवीन राज्याची बांधणी, आदिवासी समूहाचे बदलते चित्र आणि त्यातील लिंगभावाची गुंतागुंत यांच्या समग्र संदर्भात, विकासाच्या प्रारूपाची उलट-तपासणी करणारे हे पुस्तक आहे. वांशिक, वर्गीय

आणि लिंगभावात्मक भेदांमध्ये झालेली वाढ, जमीन, श्रम आणि स्थलांतर यामधील परस्परसंबंध, आधुनिक शिक्षणात झालेली प्रगती आणि त्यायोगे आशा-आकांक्षांमधील झालेले बदल, विसंगतींमधील वाढ आणि राज्यसंस्थेच्या धोरणांचा दुटप्पी अवकाश : जिथे समानता आणि दुय्यमत्व दोन्हीच्या परस्पर विरोधी शक्यता दिसतात, या चार स्थित्यंतरांच्या संदर्भात राव यांची ही मांडणी येते. या सगळ्या स्थित्यंतरांमुळे सामाजिक पुनरुत्पादनात मोठे अरिष्ट आले आहे असे राव यांचे प्रतिपादन आहे. भौतिक विकासावरील मर्यादांसोबतच यामुळे घरादारापासून राज्यसंस्थेपर्यंत सर्वच संस्थांमध्ये संघर्ष आणि स्पर्धेची धार टोकदार झाली आहे आणि त्याचा लिंगभाव समानतेवर विपरित परिणाम पडतो आहे असेही त्या मांडतात. त्यामुळे वर वर पाहता हे पुस्तक झारखंडच्या मर्यादित संदर्भात भाष्य करीत आहे असे जरी वाटले, तरी त्यातून विकास, जमीन-जंगल, लिंगभाव या संदर्भातील ज्ञानात मोठी भर पडली आहे.

●

**क्वेस्ट फॉर आयडेंटिटी : जेंडर, लँड अँड मायग्रेशन इन कंटेंपररी झारखंड**, नित्या राव, केंब्रिज : केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, २०२३





**ललित भवरे... (पृष्ठ क्र. ४८वरून)**

वाढत आहे. विकास प्रकल्पांमुळे होणारा विकास हा सर्वसमावेशक, सार्वजनिक हित व राष्ट्रहिताचा नसून, तो फक्त काही अल्पसंख्यांक घटकांच्या हिताचा व बहुसंख्यांकांचे नुकसान करणारा आहे. त्यामुळे विकास प्रकल्पांना विरोध करणारे नेहमी विकास विरोधी, माओवादी किंवा राष्ट्रविरोधी असतात अशी समज बाळगणे चुकीचे आहे. मुळात विकासामुळे पूर्णतः उखडले जाणे किती भयावह आहे, याची जाणीव सदर पुस्तकातील विस्थापित व्यक्तींच्या आठवणी आणि मुलाखतीद्वारे- भरपाई म्हणून 'जमीनीसाठी जमीन' धोरणाची फसवेगिरी आणि त्यामुळे सध्याच्या त्यांच्या दुर्दशेचे वर्णन वाचल्यानंतर येते.

एकूणच, सदर पुस्तक हे समकालीन भांडवली विकासाच्या धोरणांची चिकित्सा करत, सर्वसमावेशक, शाश्वत आणि समन्यायी विकासाचा आग्रह धरते. तसेच विकासाकडे बघण्याची नवी दृष्टी आणि जनआंदोलनाप्रती संवेदनशील बनवते.

●

**रेझिस्टिंग डिसपझेशन : द ओडिशा स्टोरी**, पाढी आर. आणि सादंगी एन., दिल्ली : आकार बुक्स, २०२०, पृ. ३२२



## हे पहा, लक्षात ठेवा, आम्ही जबाबदार नाहीओत! । माया पंडित

आम्ही अजिबात जबाबदार नाहीओत तुमच्या गरीबीला,
तुमच्या बुरखाबंद पोरींच्या शिक्षणाला, तुमच्या पोरांच्या बेकारीला,
तुमच्या अम्मी-खालाच्या बेहालीला, भुकेकंगाल शर्मसार जगण्याला!
कायम मदतीची भीक मागता, अतिक्रमणं करता, रडगाणं गाता
कारण तुम्ही आहात म्हणे अविकसित नि मागास,
अरे, विकासाची गंगा गेली दारावरून तुमच्या,
तरी तुम्हीच का पडलात असे भकास?
तुम्हा लोकांच्या तक्रारींवर, रडगाण्यांवर, अतिक्रमणांवर
दया दाखवायला, शिक्कामोर्तब करायला
अजिबात सवड नाहीय आम्हाला
कोणालाही मदत नाकारण्याचा अधिकार आम्ही ठेवलाय राखून!
हा बुलडोझर पाहिलात ना समोर, नीट डोळे फाडून घ्या पाहून!

भले गेला असाल तुम्ही कुठल्या सत्तेच्या दलालांकडे मागत न्याय
आणि दिली असतील तुम्हाला कुणी आश्वासनं, त्यात येवढं काय!
घेऊ ऐकून पण पर्वा करूच असं नाही! शेवटी हा आहे सर्कारी मामला
अतिक्रमणं पाडायचा हुकुम आहे, त्याची ताबिली करायलाच हवी आम्हाला
सर्कारी काम आहे हे, उगा घालू नका कामात सतराशे खोडे
मुकाट्यानं व्हा बाजूला, पोराबाळांसहित, मारा काखोटीला गाठोडे

हरवलं जर तुमचं काही तर तुम्हीच बघून घ्या काय करायचं ते
तुम्ही असेलही केलेली पोलिसस्टेशनला तक्रार पण आम्ही आहोत त्यांच्या वरचे
आमची ऑर्डर आहे डायरेक्ट आलेली वरून, चला काढा बाहेर तुमचा लबेदा
चला वेळ नाही आम्हाला तुमचे फालतू लाड पुरवायला.

आमच्या कर्मचाऱ्यांनी मातीत सांडले डाळतांदूळ, पीठमीठ म्हणताय?
मातीत गेलेल्या अन्नाची तरी भीड राखा म्हणताय?
खामोष! बीफ होतं घरात, काय सांगताय चिकन म्हणून,

आता का बसली दातखीळ, बच्चाळी टाकू का उचकटून?
तुम्हाला कळत नाही आमची भाषा? आमचा कायदा आमचा न्याय?
याद राखा
कायद्याची काठीशी नि शिस्तीशी आहे तुमची गाठ
नसेल कळत तर तुम्हाला तर तुरुंग पाहताहेत तुमचीच वाट!

बघा बुलडोझरची बकेट लागली दाराला,
भिंत लागलीय धडाधडा खाली यायला
चाचाचं बखोट धरून काढा भाएर, पोरगी पोटुशी हाय म्हणताय
मंग न्ह्या की तिला लांब! न पुढं काय तो प्रश्न तुमचाय.
चला, चला, ढासळतंय छप्पर, सगळा उठलाय धुरळा,
दगड माती विटा मलबा सगळा, आता निमूट माघारी वळा,
तुमचं आधारकार्ड, रेशनकार्ड, डॉक्टरचा कागद, भांड्याकुंड्यांचा पसारा
भिंती पडतायत त्याखाली गेला आता राडारोड्यात सारा!

चला झालं आमचं काम, हुकुमाची झाली तामिली! दुसरं काय!
फुटा आता इथून! तुम्ही न तुमचं नशीब! आमचा संबंध काय?
तुम्ही जन्माला येतानाच पेहरून आलाय गंदे कपडे गुन्हेगारी रंगाचे!
तुमची नियतच बेकार, नि एकूण एक गंदे तुमचे देशद्रोही धंदे!
खबरदार! नो दंगा, आमच्याशी नो पंगा! चुप रह्य बे खुदाके बंदे
दिलीय वॉर्निंग एकदा! लक्षात ठेवा,
शहाणे असाल तर म्हणा आमची काहीएक तक्रार नाही
ते नागरी अधिकार बिधिकार न हक्कबिक्क वगैरे
फालतू बोलायचं काम नाही.
आता लक्षात ठेवा आम्ही जबाबदार नाही, तुम्हाला काही झालंबिलं तर
हे कायद्याचं राज्य आहे आम्हाला अजिबात नो फिकर!

**माया पंडित**
कोल्हापूर
mayapandit@gmail.com

# जातीय अस्मिता आणि राजकारण

आनंद तेलतुंबडे

अनुवाद

शरद नावरे

जात हा भारतीय राजकारणात नेहमीच एक कळीचा मुद्दा राहिला आहे. भारताचे आज अपरिवर्तनीय प्रकारे जर नुकसान होत असेल, तर त्यामागे सर्वतोपरी महत्त्वाचे कारण जात हे आहे.

आपण जात आणि सांप्रदायिक राजकारणाच्या वर आहोत, असा भाजप कितीही दावा करत असले तरी जात आणि सांप्रदायिकता यांचा सगळ्यात चतुराईने वापर करणारा पक्ष तोच आहे. प्रत्येकालाच आता हे ठाऊक आहे, की भाजपचे निवडणुकीतील यश हे मुस्लिमांना परका म्हणून दर्शवत सांप्रदायिक ध्रुवीकरण घडवून हिंदूंना त्यांच्याविरूद्ध एकजुटीने उभे करण्यावर आधारले आहे. मात्र त्या पक्षाने ज्यांना एकत्र आणले तो हिंदूंतील सर्वात मोठा जन विभाग इतर मागासवर्गीय आणि गौण दलित जाती हा आहे, हे मात्र फारसे कुणाला ठाऊक नसावे. बाळासाहेब देवरस हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक असताना, ऐंशीच्या दशकात, ब्राह्मण आणि बनियांचा पक्ष म्हणून भारतीय राजकारणावर ठसा उमटवणे केवळ अशक्य आहे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ध्यानात आले आणि त्यांनी जाणीवपूर्वक दलित आणि ओबीसींचा अनुनय करायला सुरुवात केली. भाजपाच्या निवडणूक यशामागे हा सगळ्यात महत्त्वाचा घटक आहे. २०१४च्या निवडणुकीत ओबीसींपैकी ३४ टक्क्यांनी भाजपाच्या बाजूने मतदान केले. ही टक्केवारी २०१९ साली ४४पर्यंत वाढली. दुसरा मुद्दा आहे तो दलितांना आपल्या बाजूला वळवण्यात भाजपाला यश मिळाल्याचा. दलितांमधील छोट्या जातींना भाजपने आधी आपल्या बाजूला वळवले होते, पण दलितांमधील मोठा विभाग (जो आंबेडकरवादी दलितांचा आहे) तोदेखील भाजपाने २०१४ साली यशस्वीरित्या आपल्या बाजूला खेचला. २०१४ साली २४ टक्के दलितांनी भाजपाला मत दिले होते. ही टक्केवारी पुढे २०१९मध्ये ३३पर्यंत वाढली.

ओबीसींनी भाजपला मतदान करणे, ही काही फार आश्चर्य वाटावे अशी गोष्ट नाही. ओबीसींचे सामाजिक स्थान, आसपासच्या दलितांच्या तुलनेने त्यांचे कितपत जास्त ब्राह्मणीकरण झाले, त्यावर अवलंबून असते. त्यामुळे भाजपाला मिठी मारायला ते निसर्गतः उत्सुक असतात. खरे आश्चर्य वाटते ते दलित आणि त्यातही जे आंबेडकरवादी दलितांच्या भाजपाला समर्थनाचे. त्याचे कारण त्यांच्या चळवळीचा आधार हा ब्राह्मणवादाविरोधी पूर्णतः असूनही भाजपासारख्या ब्राह्मण्यवादी पक्षाला शेवटी त्यांचे समर्थन गेले.

२०१४पासूनच्या निवडणुकांच्या वेळी बरेच मोठे दलित नेते प्रत्यक्ष

लेखक मुंबईस्थित निवृत्त प्राध्यापक, अभ्यासक आणि मानवाधिकार कार्यकर्ते आहेत. अनुवादक कोल्हापूरस्थित शिवाजी विद्यापीठाचे भौतिकशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.

prescient2023@gmail.com

sharadnavare@gmail.com

व अप्रत्यक्षरीत्या भाजपच्या मांडीवर बसले. माझ्या ईपीडब्ल्यूमध्ये स्तंभात मी म्हटले होते –तीन दलित राम भाजपाचे हनुमान बनले. हे तीन राम म्हणजे राम विलास पासवान, राम राज (त्याने स्वत:चे नामकरण नंतर उदित राज असे केले) आणि रामदास आठवले. ही तीन उदाहरणे त्या गलिच्छ प्रवाहाचे निदर्शक म्हणून सांगता येतील.

२०१४पासून लोकसभेत आणि विधानसभांमध्ये भाजपा इतर कोणत्याही पक्षांपेक्षा जास्त राखीव जागा जिंकत आली आहे. २०१९च्या निवडणुकीत तर इतर सर्व पक्षांनी जिंकलेल्या राखीव जागांच्या एकूण बेरजेपेक्षादेखील जास्त राखीव जागा त्यांना मिळाल्या. २०२४ची निवडणूकदेखील फारशी वेगळी नाही. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या निवडणुकीत त्यांना २९ पैकी २० राखीव जागा मिळाल्या आणि जिथे राज्याच्या सरासरीपेक्षा दलित १५ टक्क्यांनी जास्त आहे अशा मतदारसंघांमध्ये त्यांना ६७ पैकी ५९ जागा मिळाल्या. त्यातील जवळपास ९०% जागा आधीच्या निवडणुकीच्या तुलनेने दुपटीपेक्षा अधिक मताधिक्याने. महाराष्ट्र हा खरं तर आंबेडकरवाद्यांचा गड मानला जातो. त्या ठिकाणची ही कथा कुणालाही बुचकळ्यात टाकील अशीच आहे.

या पार्श्वभूमीवर या लेखाची मांडणी केलेली आहे.

हजारो वर्षे जात हे भारतीय समाज व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. जातींचा उगम कसा झाला आहे, वगैरे प्रश्न उपस्थित करून आपल्याला कल्पनातरंग निर्माण करायचे कारण नाही. याचे साधे कारण असे, की त्या अविरतपणे उत्क्रांत होत आल्या आहेत. आजचे त्यांचे जे स्वरूप आहे ते नक्कीच त्यांच्या उदयकाळात नव्हते. ज्योतिबा फुले आणि अगदी बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळींच्या सुरुवातीला जाती ज्या स्वरूपात होत्या त्या स्वरूपात आज त्या नक्कीच नाहीत. हे समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. पारतंत्र्याच्या काळात (आणि स्वातंत्र्योत्तर काळातदेखील) घडून आलेल्या राजकीय अर्थशास्त्रीय घडामोडीतून जातिव्यवस्था ढवळून निघाली आहे. आपल्या समाजशास्त्रीय आणि राजकीय चर्चाविश्वात हे सोयीस्करपणे विसरले जाते.

अभिजात जातिव्यवस्था ही घट्ट, धार्मिक मान्यता पावलेली, व्यवसायातून ठरणारी व्यवस्था होती. सद्यकाळात मात्र तो जास्त लवचीक सीमा असलेला सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रमेयार्थ बनला आहे. तथापि उच्चनीच भाव, अंतर्विवाह आणि जातीय हिंसाचार ही अजूनही टिकून राहिलेली वैशिष्ट्ये भारतीय समाजातील जातींच्या अस्तित्त्वाचे टिकाऊ निदर्शक आहेत.

जातिव्यवस्थेचा विकास समजून घेण्याकरता मार्क गॅलेंटरचे प्राथमिक विश्लेषण उपयुक्त ठरेल. भारतामध्ये जात समजून घेण्यासाठी आणि कायदेशीरपणे तिची व्याख्या करण्यासाठी तीन पद्धती महत्त्वाच्या आहेत.

१. धार्मिक पवित्रतेच्या अंगाने– जात ही एकात्मिक हिंदू धर्मातील प्रणाली म्हणून पाहता येते. ती (ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र या चार वर्णांमध्ये) उतरंडी स्वरूपात दर्शवली जाते. न्यायालय आणि वसाहत काळातील शासन व्यवस्था बऱ्याचदा स्मृति ग्रंथांच्या शिकवणीला प्रमाण मानून आणि शुचिता–मालिन्याच्या संकल्पनेवर आधारून जातींची श्रेणी ठरवत असे. द्विज जाती आणि शूद्रांकरिता वेगवेगळ्या व्यक्तिगत कायद्यांचा अवलंब केला जाई. त्यातून अर्थातच जातीश्रेणी बळकट होत.

२. सांप्रदायिक अंगाने – हिच्यामध्ये प्रत्येक जात ही वेगळी धार्मिक गट म्हणून मानली जाते. प्रत्येकीला स्वत:चे कायदेकानून आणि रितीरिवाज आहेत. हे गट स्वयंपूर्ण आहेत. त्यांचे हक्क आणि कर्तव्य जात्यंतर्गत ठरवले आहेत. व्यापक हिंदू धार्मिक तत्त्वांशी त्यांचा संबंध नाही.

३. साहचर्य अंगाने – जाती या स्वयंशासित गट आहेत. धर्माशी त्यांचा संबंध असेलच असे नाही. पण त्या स्वत:च सुसंघटित सामाजिक एकक म्हणून कार्यरत असतात. ही पद्धत हिंदू धर्म ओलांडून इतर जमाती

(उदाहरणार्थ, मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशी)मधून जातसदृश संस्था शोधायला उपयुक्त ठरते.

वासाहतिक शासनसंस्था वरील तीनपैकी आपल्या हेतूंना उपयुक्त ठरेल ती पद्धत अवलंबत असे. सांप्रदायिक आणि साहचर्य पद्धतींमध्ये, स्थानिक शासन आणि विशेष अधिकारांमध्ये (उदाहरणार्थ, वाळीत टाकण्याची पद्धत) जातीची भूमिका मान्य केली जाई. पण व्यक्तिगत कायद्यांतर्गत सर्रास वापरली जाणारी पद्धत म्हणजे अर्थातच धार्मिक पवित्रतेच्या अंगाने जाणारी पद्धत होती.

धार्मिक पवित्रतेच्या अंगाने जाणारी पद्धत भारताला विविध धार्मिक समूहांचा देश मानणाऱ्या वासाहतिक समजाला बळकटी देणारी होती. या पद्धतीचा प्रभाव बहुसंख्य सामाजिक व राजकीय चळवळींच्या चर्चाविश्वांवर पडल्याचे (यामध्ये जातीनिर्मूलन चळवळींचाही समावेश आहेच) व असल्याचे दाखवता येते. इथे आपण एका महत्त्वाच्या गोष्टीची नोंद करूया. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा जातीप्रश्नांची मांडणी केली तेव्हा त्यांनी जातीप्रथेसाठी प्रामुख्याने हिंदू स्मृतींना जबाबदार ठरवले आणि जातीविनाशांसाठी त्यांना जाळण्याची भाषा केली. जातीनिर्मूलनापासून ते बौद्ध धर्मांतरापर्यंत त्यांच्या मनावर धार्मिक पवित्रतेच्या अंगाने जाणाऱ्या पद्धतीचा पगडा दिसून येतो.

खरे पाहता आज, आणि त्या काळी सुद्धा, जातिव्यवस्थेचे अस्तित्त्व हे धार्मिक पवित्रतेपेक्षा सांप्रदायिक आणि साहचर्य अंगाने अधिक योग्य प्रकारे समजावून घेता येते. सर्व जाती स्वतंत्र धार्मिक समूह असल्याप्रमाणे वागतात. त्यांना स्वत:ची शिकवण आणि रितीरिवाज आहेत. त्या बहुश: स्वयंपूर्ण आहेत. हक्क आणि कर्तव्यांची व्याख्या, व्यापक हिंदू धार्मिक तत्त्वांशी असंबद्धरित्या, जात्यंतर्गत पद्धतीने केली जाते. त्यांचा उगम कसाही झाला असो, त्यांच्यावर फारच कमी प्रमाणात धर्मग्रंथांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे जात हा सगळ्या लोकांनी रिचवलेला एक सांस्कृतिक घटक बनतो. त्यांच्याकडे स्वयंनियामक गट म्हणून पाहता साहचर्य पद्धतीचे गुणविशेषदेखील दिसून येतात. कोणत्याही विशिष्ट धर्माशी न जोडता त्या संघटित सामाजिक एकक म्हणून काम करताना दिसतात. उदाहरणार्थ, माझ्या स्वत:च्या गावात सर्व लोक हिंदू ख्रिश्चन मुस्लिम शीख पारशी आपापल्या भाषा बोलत. कोणतेही धार्मिक वेगळेपण न जाणवता परस्पर साहचर्याने राहताना दिसत.

सत्तांतरानंतर जेव्हा घटना लिहिली जात होती, तेव्हा हिंदू कोड बिल आणि घटनात्मक अस्पृश्यता (आर्टिकल १७) या दोन बाबीं तेवढ्या धार्मिक पवित्रतेच्या अंगाने जाणाऱ्या पद्धतीला सोडून होत्या. मात्र असे तुरळक अपवाद वगळता वसाहतकालीन घटनेचा बराचसा भाग (गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५) घटनेमध्ये अंगिकारताना मुख्य भर धार्मिक पवित्रतेच्या अंगाने जाणाऱ्या पद्धतीवरच होता. हे आपल्याला शेड्युल्ड कास्टच्या व्याख्येवरून (आर्टिकल ३४१) दिसते. तिथे केवळ हिंदू धर्मांतर्गत जातींना एस.सी. म्हणून मान्यता दिली आहे (त्यानंतर शीख आणि बौद्ध धर्म यांना पंथ मानून ही मान्यता वाढवण्यात आली) यातही घटनाकारांमध्ये धार्मिक पद्धत रेंगाळताना दिसते. सर्वधर्मसमभाव अशा शब्दांमध्ये इहवाद दर्शवताना त्यामागे जमातीकडे पाहण्याची धार्मिक पद्धत गृहीत धरली आहे. त्यातून वसाहतकाळोत्तर भारतातील जाती आणि सांप्रदायिकतेचे महत्त्व लक्षात येते. या गोष्टींनी राजकीय वर्गांना वेगवेगळ्या अक्षांचा वापर करून जनतेला विभागता आले आणि वासाहतिक धन्यांप्रमाणेच तिला कह्यात ठेवता आले. याच प्रतिमानाचा उपयोग उजव्या शक्तींना पुनश्च उसळी मारण्यासाठी आणि परिणामी देशाला कडेलोटाच्या टोकावर पोहोचवण्यासाठी झाला आहे.

या दृष्टीने पाहता ज्या प्रकारचे विनाशकारी राजकारण देशामध्ये चाललेले आहे, त्याची बीजे एका अर्थाने संविधानातच दडली आहेत, हे लक्षात येते.

या व्यतिरिक्त मला आणखी एक अभ्युपगम

मांडायचा आहे. खालच्या जातींना सामाजिक न्याय देण्याच्या मिषाने राज्यकर्त्या वर्गाने जातिव्यवस्था कशी कायम ठेवली? मला असे म्हणायचे आहे, की जाती उन्मूलन न करता केवळ अस्पृश्यता निर्मूलन करणे हा एक डाव होता. सर्व उच्चवर्णीय समाजसुधारक (ज्याचे उत्तम उदाहरण म्हणजे गांधी) अस्पृश्यता निवारणाचे ढोल बडवत होते, पण त्यांनी जातीनिर्मूलनाबद्दल ब्रही काढला नाही. १९३६मध्ये जातिव्यवस्थेचा सर्वाधिक बळी असलेला शेड्युल्ड कास्टचा अर्धवट वर्ग तयार झाला होता. हिंदू धार्मिक मुळांशी त्याचा संबंध तुटला होता. त्यामुळे जातीउच्छेद करणे सोपे बनले होते. पण ती संधी दवडली गेली. कोणत्याही दृष्टीने पाहीले तरी जातिव्यवस्थेचे उन्मूलन न करता केवळ अस्पृश्यता निर्मूलन करणे हे वैचारिक आणि व्यावहारिक दोन्ही पातळीवर, पूर्णपणे निरर्थक होते. ही केवळ अज्ञानातून किंवा निरागसतेने घडलेली चूक नाही. वासाहतिक धन्यांनी राखीव कोटा मागणाऱ्या भारतीय पुढाऱ्यांना भरकटवण्यासाठी (फ्रान्सिस्का जेंकोनियस) निर्माण केलेला भुलभुलय्या पण तो नव्हता. कारण या कृतीला पूरक म्हणून त्यांनी राखीव जागांची संकल्पना (आधी शेड्युल्ड ट्राईब्जकरता आणि नंतर मागास जातींसाठीदेखील) लागू केली. त्यामुळे सामाजिक न्यायासाठीच्या योजना राबवण्यासाठी जातींचे अस्तित्त्व अपरिहार्य बनले. वस्तुत: या दगडांनी त्यांनी आणखीन दोन टीकास्पद पक्षी मारले. एक तर विविध आरक्षणे देऊन समाजात अनेकविध जातींचा सुळसुळाट केला आणि दुसरे जनतेला मोफत शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या हक्कांपासून वंचित ठेवले. गेल्या ७० वर्षात जातव्यवस्थेचे हे अनुभवास आलेले सत्य आहे.

जातींच्या या वैधानिक आणि संवैधानिक संकल्पनेव्यतिरिक्त तिचे अस्तित्त्व सामाजिक उतरंडीची संस्था म्हणून आहे. जातींना एका नेमक्या उतरंडीत ढोबळमानाने चार वर्णांशी जोडले आहे. मात्र एखाद्या विशिष्ट वर्णातील जातीदेखील उतरंडीचा वारसा पुढे चालवतातच. थोडक्यात उतरंड ही एक गुंफलेली रचना आहे. एखाद्या जातीची सभासद म्हणून व्यक्ती त्या वर्णातील इतर जातिसंबंधात एका अनिश्चित उतरंडीचा भाग असते आणि चातुर्वर्णव्यवस्था नामक एका व्यापक उतरंडीत तिचे स्थान निश्चित होते.

वासाहतिक शासकांनी जनगणनेद्वारा जातीगणना आणि जातीनिश्चिती करायचा प्रयत्न केला. तथापि जातींचा नेमका आकडा सांगणे दोन कारणामुळे कठीण आहे. एक तर जाती अजून जातीविहीन लोकांच्या (उदाहरणार्थ आदिवासी) समावेशामुळे आणि विभाजन व संमेलन प्रक्रियेने उत्क्रांत होत आहेत. दुसरे, जातीमध्ये पोटजाती असतात आणि पोट जातींमध्ये पोटपोटजाती. एरवी त्या सुप्तावस्थेत असतात, मात्र विशिष्ट परिस्थितीत हे भेद उफाळून वर येतात. परिणामतः जात हे व्यक्तीला वेगवेगळ्या प्रमाणात अनुभवाला येणाऱ्या उच्चनीचतेचे परिमाण बनते.

जात ही प्रत्येक भारतीय मनात वागवत असलेली एक अशी संकल्पना आहे, जिच्यामुळे तो त्याच्याशी संभाषण करणाऱ्या व्यक्तीशी बरोबरीच्या नात्याने बोलू शकत नाही. तो किंवा ती, इतरांना एक तर आपल्यापेक्षा श्रेष्ठ समजते नाही तर कनिष्ठ.

भारतात जन्मत:च प्रत्येकाला एक ओळख मिळते. त्या ओळखीमुळे व्यक्तींना त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक भूमिका प्राप्त होतात. या ओळखीमुळे त्यांना जातीय जन्माधारित संधी निश्चित होतात. ही काही व्यक्तीने स्वत: केलेली निवड नाही. केवळ वारसाहक्काने तिला प्राप्त झालेली गोष्ट आहे. जसजसे आपण वाढतो तस तशा आणखी काही ओळखी आपल्याला येऊन चिकटतात.

जातीय अभिमान म्हणजे या जातीओळखीचा सोहळा असतो. याचा उगम विषमतेला संस्थात्मक स्वरूप देणाऱ्या हिंदू धर्मग्रंथांमध्ये आहे, आणि तो (जातीय विभागणीच्या) धार्मिक पद्धतीशी संबंधित आहे. यातून तथाकथित उच्चवर्णीयांमध्ये (ब्राह्मण क्षत्रिय

वैश्य) तो येतो त्या जातीओळखीमध्ये उच्चतेचा आणि अभिमानाचा अंश मिसळला जातो. जात्यभिमान हा उच्चतेचा उच्चार असतो. बऱ्याचदा खालच्या जातींच्या (म्हणजे शूद्र दलित आदिवासी) सीमांतीकरणाशी तो ताडून पाहिला जातो.

निम्न जातीतील (वरकरणी विरोधाभासात्मक भासणारा) जात्यभिमान, ही आपली ओळख, सन्मान आणि पारंपरिक दडपशाहीला केलेल्या विरोधाची निदर्शक आहे. समाजात नाकारले गेलेले कारकत्व पुनश्च मिळवण्याचे आणि जातीय उतरंडीमध्ये आणखी उच्चतर स्थान मागण्याचे ते माध्यम आहे. महारांनी स्वत: सूर्यवंशी, क्षत्रिय किंवा बुद्धीस्ट असण्याचा दावा करणे आहे, किंवा भीमा–कोरेगावमध्ये हौतात्म्य पत्करलेल्या शूर महारांचे वंशज म्हणणे आहे. हे आपण उच्चवर्णीयांच्या उतरंडीला दिलेले उत्तर म्हणून समजू शकतो. पण अंतिमतः हे कारकत्व जातीय उतरंडीला मोडून काढणाऱ्या आणखी विशाल कार्यक्रमाचा भाग बनायला हवा. ज्याला आपण आव्हान देत आहोत त्याच भेदाभेद युक्त रचनेला आपण बळकटी देणार नाही, याची काळजी हा जात्याभिमान व्यक्त करताना घ्यायला हवी. जर तुम्हाला दोन जानेवारी २०१८च्या ‘द वायर’मधील भीमा कोरेगाववरचा माझा लेख आठवत असेल, तर त्यात हाच मुद्दा होता. त्याच्यावर खूप टीका करण्यात आली, हा भाग वेगळा.

घटनेने जरी सर्वांना समानतेचा अधिकार दिलेला असला तरी जात्याभिमान शिल्लक उरतोच, आणि वेगवेगळ्या प्रकारे प्रकट होत राहतो. तो विविध सामाजिक रितीरिवाजांमध्ये (उदाहरणार्थ, लग्न) दिसून येतो. तिथे आंतरविवाहच बऱ्याच प्रमाणात होतात. शहरी सुशिक्षित उच्चभ्रूंमध्ये लग्नविषयक निर्णयांमध्ये जातीची भूमिका मोठी असते. जात स्थानीय अलगतेमध्येदेखील दिसून येते. दलित आणि निम्न जातीयांना भारतातील बऱ्याच ठिकाणी आवास, मंदिरे, जन अवकाश आणि खेडेगावातील विहिरी वगैरे ठिकाणांपासून दूर ठेवले जाते. आर्थिक क्षेत्रात गावामध्ये जमीनीची मालकी आणि आर्थिक सत्ता बऱ्याचदा वरच्या जातींची असते. यातून रचनात्मक विषमता कायम राखली जाते. शिक्षण, रोजगार अशा संसाधनांचा उपयोग घटनेने सर्वांसाठी समान जरी ठरवला असला, तरी तिथे उच्चजातीय पक्षपात आढळतो. राजकीयदृष्ट्या वरिष्ठ जाती राजकीय चळवळींद्वारा आपापल्या अस्मिता आणि हेतू पुढे रेटतात. जाट, पाटीदार आणि मराठा यासारख्या चळवळी त्यांना विशेष सवलती मिळालेल्या असूनही राखीव जागांची मागणी करतात. या सगळ्या गोष्टी आर्थिक गाऱ्हाण्यांच्या बुरख्याखाली दडलेला जात्याभिमानच दर्शवतात.

जात्याभिमान केवळ सामाजिक उतरंडीला बळकटी देतो असे नव्हे, तर विद्रोह आणि जैसे थे परिस्थितीला मिळणारी आव्हानेदेखील दडपतो. ही दडपणूक हिंसा आणि अत्याचाराच्या रूपाने प्रकट होते. विशेषतः दलित आणि आदिवासी आपल्या हक्कांची मागणी करतात, त्या वेळी त्यांच्यावर हिंसक हल्ले होतात. घोड्यावर बसला म्हणून, मिशी ठेवली म्हणून, उच्च जातीय मुलींशी बोलला म्हणून किंवा मंदिरात प्रवेश केला म्हणून होणारी हिंसा ही जात्याभिमानाच्या हिंसक प्रकटनाची उदाहरणे आहेत. राखीव जागांसारख्या धोरणांना जात्याभिमान विरोध करतो. सवर्ण जाती त्यांना शतकानुशतके विशेष अधिकार भोगायला मिळाले असूनही राखीव जागांना उलटा भेदभाव म्हणून विरोध करतात. जात्याभिमान हा सांस्कृतिक व्यवहार आणि समूहस्मृतीमध्ये चिन्हे, कर्मकांड आणि मिथकांद्वारे कोरला गेला आहे.

निवडणुकींचे राजकारण आणि तयार झालेल्या एक गठ्ठा मतांच्या राजकारणाचे जात्याभिमान हे प्रभावी हत्यार आहे. विकासाच्या प्रश्नांऐवजी राजकारणी बऱ्याचदा जातीय अस्मितांना आवाहन करतात. जातींचे हिंदूकरण करून, जातीय विषमतेकडे काणाडोळा करून आणि नकळतपणे उच्चजातीयांचा वरचष्मा कायम ठेवत संघ परिवार जातीय अस्मितांना व्यापक हिंदू अस्मितेमध्ये

समाविष्ट करायचा प्रयत्न करीत असतो. या संदर्भात व्होट बँकेचे राजकारण कुठून सुरू झाले, हे समजून घेणे उपयुक्त ठरेल.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्षाचे सरकार आले. त्यांना स्वातंत्र्य चळवळीमध्ये लोकांना दिलेली आश्वासने पूर्ण करणे आवश्यक होते. सर्वात महत्त्वाचे आश्वासन होते ते जमीन सुधारणांचे. म्हणून शासनाने कमाल जमीनधारणा कायदे करून जमीन सुधारणा लागू करायचा प्रयत्न केला. कागदावर जरी हे योग्य दिसत असले, तरी त्याचे मिश्रण काँग्रेस पक्षाच्या राजकीय हेतूंमध्ये करण्यात आले. काँग्रेसला सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या शूद्रांमधून एक वर्ग तयार करायचा होता. ग्रामीण भागामध्ये काँग्रेसचे संघटन नसल्याने या वर्गाने ग्रामीण भागात पक्षाचा प्रतिनिधी म्हणून काम करावे, असे अपेक्षित होते. तेव्हा अधिकची जमीन ही शूद्र वर्गीय कुळांमध्ये वाटण्यात आली.

बरेच दलित आणि आदिवासी जमीन कसत होते, मात्र त्यांची नावे कूळ म्हणून नोंदलेली नाहीत या सबबीखाली त्यांना जमीनी नाकारण्यात आल्या. त्यामुळे ग्रामीण भागांमध्ये शूद्र शेतकऱ्यांचा एक वर्ग तयार झाला व त्यानंतर लगेचच जेव्हा हरितक्रांतीचा कार्यक्रम राबवला गेला, तेव्हा या जमीनधारक वर्गाकडे मोठ्या प्रमाणात उत्पादन लाभ गोळा झाले. हरितक्रांती हे खेड्यांमधील कृषी अर्थव्यवस्था नियंत्रित करणारे भांडवली धोरण होते. तिने बऱ्याच बाजारपेठा तयार केल्या. उदाहरणार्थ, बियाणी, खते, अवजारे, पत, शेती उत्पादने, सेवा इत्यादी. त्यामुळे यापैकी काही जमीनधारक शेतकऱ्यांना उद्योगाच्या संधी मिळाल्या. त्यांनी मोठ्या प्रमाणात करमुक्त माया गोळा केली. खेड्याच्या सीमादेखील ओलांडल्या. वाहतुकदार, अन्नप्रक्रिया करणारे, गुत्तेदार असे छोटे उद्योजक तयार झाले. त्यांचा संबंध राज्यसत्तेशी आला आणि त्यांच्यामध्ये राजकीय आकांक्षा जागृत झाल्या. सुरुवातीला काँग्रेसच्या योजनेप्रमाणे त्यांनी काँग्रेस एजंट म्हणून काम केले. मात्र त्यांच्या वाढत्या अपेक्षांना काँग्रेस पुरी पडेनाशी झाली. त्यामुळे विरोधी पक्ष वाढू लागले. यातून मागासवर्गीयांचे पक्ष तयार झाले आणि निवडणुकांच्या राजकारणातील चुरस वाढत गेली. चीनचे युद्ध आणि नेहरूंच्या मृत्यूनंतर काँग्रेस पक्षाभोवतीची स्वातंत्र्यलढ्याची प्रभा निस्तेज होत गेली. पक्षांनी आता जाती आणि धार्मिक समूहांचा अनुनय करीत एक गठ्ठा मतदानाचे – व्होट बँकेचे राजकारण सुरू केले. आंबेडकरी चळवळीच्या प्रभावाखाली दलितांची महत्त्वाची व्होट बँक उदयाला आली आणि आंबेडकर हे तिला हाताळण्यासाठीचे चिन्ह बनले.

वर सांगितलेल्या प्रक्रियेने शूद्र जातींना त्यांच्या सधन शेतकऱ्यांसोबतच्या जातीय बंधांमुळे बळकट केले. त्यांना राजकीय पुढारी बनवले. त्याच प्रक्रियेने दलितांना ग्रामीण भागात असुरक्षित बनवले. ग्रामीण भागात पसरणाऱ्या भांडवली नात्यांनी गावातील पारंपरिक परस्परावलंबन नष्ट केले. दलित हे ग्रामीण सर्वहारा बनले. ते आता उपजीविकेसाठी शेतमजूर म्हणून श्रीमंत शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या मजुरीवर पूर्णपणे अवलंबून राहू लागले. कृषी अर्थव्यवस्था भांडवली बनत असताना मजुरीचा दर कमी ठेवण्यासाठी जुन्या सरंजामी संबंधाचा उपयोग झाला. यातून निर्माण झालेल्या शूद्र वर्गीय भांडवली शेतकरी आणि दलित शेतमजूर यांच्यातील विभंग रेषेवरील विरोधाने एका नवीन प्रकारच्या अत्याचारांना जन्म दिला. त्याचा पहिला उद्रेक तामिळनाडूच्या जुन्या तंजावर जिल्ह्यात किल्वेनमनी येथे पहिल्यांदा दलित मजुरांच्या हत्याकांडाच्या रूपाने झाला.

इथे हे ध्यानात घेणे महत्त्वाचे आहे, की समाजाच्या जातीय कांतीतील हे बदल मुख्यत्वे करून बदलत्या राजकीय अर्थव्यवस्थेमुळे घडून आले होते. त्यांच्या मागे कुठलीही सांस्कृतिक किंवा मानसिक घडामोड नव्हती.

जात्याभिमान हा घटनेतील न्याय आणि समतेच्या तत्त्वाशी विसंगत आहे. तरीदेखील तो भारतीय समाजाला मूलभूतरित्या आकार देत असतोच. समाजाच्या

सीमेवरील गटांना आपली अस्मिता प्रदर्शित करून न्याय आणि सन्मान मिळवण्याची आंच असते, तर उच्च जात्याभिमानाला आहे ती दडपणुकीची व्यवस्था कायम ठेवण्यात रस असतो. हा दुभंग केव्हा दूर होईल? एक सामाजिक–सांस्कृतिक रचना म्हणून जाती मोडल्या तर, समतेची बांधिलकी सर्वांनी मान्य केली, तिचा विस्तार केला तर आणि दडपल्या गेलेल्यांना जातीसीमेपलीकडे उठण्यासाठी बळ दिले गेले तर.

जात्याभिमान आणि जातीअस्मितेची चर्चा केल्यानंतर आता आपण प्रश्न उपस्थित करू शकतो : जाती अस्मितेवर आधारलेले राजकारण हा मुक्ती लढ्याचा मार्ग असू शकतो काय?

जातीय अस्मितेवर आधारलेल्या विशेषतः निम्न जातींच्या मुक्ती लढ्याला काळजीपूर्वक धोरण आखावे लागते. एका बाजूला इतिहास काळापासून दडपल्या गेलेल्या समूहांना आपला आवाज उठवण्यासाठी आणि आपल्याला वेढून असणाऱ्या उतरंडीला आव्हान देण्यासाठी त्यातून एक व्यासपीठ उपलब्ध होते, हे खरे. पण दुसऱ्या बाजूला जात हा एक सामाजिक आणि राजकीय घटक म्हणून तोडण्याऐवजी तो कायम ठेवण्याचा धोका त्यातून निर्माण होतो.

आणखी एक, त्यामुळे सीमांतवासियांच्या गटांमध्ये फूट पडते. दलित चळवळींची उडालेली शकले आणि त्यांचे राजकारण याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. जात्याधारित राजकारण बऱ्याचदा लक्षणे विचारात घेते (प्रतिनिधित्व आणि धोरणात्मक उपाययोजना), जातीय दडपणुकीची रचनात्मक कारणे (आर्थिक विषमता, जमीन मालकीचे स्वरूप) या गोष्टी लक्षात घेत नाही. जे राजकीय पक्ष स्वत:ला दलितांच्या किंवा निम्न जातीयांचे प्रतिनिधी म्हणवतात त्यांना कधी कधी वर्चस्व जाती किंवा वर्गीय हितसंबंध सामील करून घेतात. त्यामुळे त्या पक्षांचा मुक्ती लढा ठप्प होतो. उदाहरणार्थ, मुख्य प्रवाही पक्षातील दलित नेतृत्व आपल्या जमातीय हितांपेक्षा पक्षनिष्ठेला महत्त्व देताना दिसून येते.

या मर्यादांव्यतिरिक्त दलितांची संख्या आणि पूर्वी चर्चा केलेला जातींचा अन्वयार्थ हा मुक्तीसाठी जात्याधिष्ठित राजकारणाच्या मर्यादा दाखवायला पुरेसा आहे. जातीचा मूळ गाभाच उतरंडीचा, विभिन्नतेचा शोध, अमिबाप्रमाणे विभागत जाणे हा आहे. त्या ऐक्याकडे जाऊ शकत नाहीत, म्हणून कोणताही मूलगामी मुक्त लढा जातींच्या पायावर बांधला जाऊ शकत नाही. जातीय अस्मिता उफाळून वर आल्याने हे सरळ सत्य नजरेआड झाले आहे.

मग पर्याय काय? याचे सरळ उत्तर आहे वर्गीय आघाड्या. जातीय दडपशाही ही आर्थिक पिळवणुकीशी जोडलेली आहे. त्यामुळे वर्गधारित, सामाजिक–आर्थिक विषमतेविरोधी लढणाऱ्या आघाड्यांची बांधणी दलितांचा मुक्ती लढा बळकट करू शकते. डाव्यांचा शेती सुधारणेवरील भर आणि कामगार हक्कांची चळवळ ह्या जातीय लढ्यांना पूरक ठरल्या आहेत. दलितांना अनेकविध (जात, लिंग, वर्ग) पक्षपातांचा सामना करावा लागतो हे ओळखून या परस्परव्यापी दडपणुकींना आंतरविभागीय मार्गानेच तोंड देता येऊ शकते. उदाहरणार्थ, दलित स्त्रियांच्या चळवळीने सामान्य दलित किंवा सामान्य स्त्रीवादी चळवळींकडून दुर्लक्षित असे अनेकविध विषय ऐरणीवर आणले.

प्रतिनिधित्व महत्त्वाचे जरी असले तरी जातिव्यवस्थेचा ऐहिक पाया (उदाहरणार्थ, विषम जमीन वाटप, शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थांमध्ये मर्यादित प्रवेश) उद्ध्वस्त करणे या गोष्टी खऱ्याखुऱ्या मुक्तीसाठी आवश्यक आहेत. पारंपरिक प्रतिनिधित्वाच्या राजकारणाचे अपयश आपल्या ध्यानी आणून देते, की खरे प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी जनतेचे सर्वंकष सबलीकरण होणे आवश्यक आहे. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा होती की सामान्य दलित जनतेला सुशिक्षित दलित संरक्षक छत्र प्रदान करतील. ती प्रत्यक्षात येऊ शकली नाही आणि आयुष्याच्या शेवटी त्यांना सुशिक्षित दलितांनी आपल्याला फसवले अशी खंत

व्यक्त करावी लागली. राखीव जागांच्या रूपात राजकीय प्रतिनिधित्वासाठीचा संघर्ष, ज्यासाठी त्यांनी आपल्या लढ्याचा प्रदीर्घ भाग वेचला, त्यातील चूक त्यांना उमगली. त्यांना नैराश्य आले आणि त्या नष्ट कराव्या अशी मागणी करणे भाग पडले. या अनुभवातून काय घडे घ्यावे? जोपर्यंत सर्वच जनतेसाठी मोफत आरोग्य व्यवस्थेसाठी तरतूद, सर्वांसाठी मोफत गुणवत्तापूर्ण सामायिक शिक्षण आणि जमीन अथवा नोकरीद्वारे मूलभूत उपजीविकेची सुरक्षा नसेल, तर तथाकथित जनतेचे प्रतिनिधी हेच लोकांचे कर्दनकाळ जुलूमशहा बनतात, हे आपण गेल्या सात दशकांमध्ये पाहीले आहे.

मूलगामी राजकारणासाठी जी ताकद लागते ती चिरफाळलेल्या जातीअस्मितांमधून उभी राहत नाही. बहुप्रचलित सर्व दडपल्या गेलेल्या जातींची (आणि धार्मिक अल्पसंख्याकांचीदेखील) बहुजन ही आघाडी फार तर प्रचलित निवडणूक पद्धतीमध्ये काही विशिष्ट परिस्थितीत यश संपादन करू शकते, पण त्यातून कोणत्याही मूलगामी प्रकल्प पार पाडता येणार नाही. कांशीराम मायावती या द्वयीचे निवडणुकीतील यश त्यानंतर बऱ्याच लोकांनी दडपल्या जातींची एकजूट म्हणून मिरवले. ते काही प्रमाणात निवडणुकीतील यशापुरतेच मर्यादित राहू शकते. त्यातून दलित मुक्ती कधीच साध्य होणार नाही. जनतेचे वर्गऐक्यच जातीसंस्थेचा विजय घडवून आणू शकते.

कदाचित आजच्या निवडणुकीचे स्वरूप (ज्याला जास्त मते तो विजयी) हा मुख्य विषयाशी असंबद्ध मुद्दा वाटू शकेल पण ती जातीय अस्मिता, जात्याभिमान आणि या दोहोंवर आधारलेले राजकारण चिघळवणारी गोष्ट आहे. भारतासारख्या विभिन्न राज्यव्यवस्था असलेल्या देशासाठी ती अयोग्य पद्धत आहे. उदारमतवादी संसदीय लोकशाही राबवण्याच्या मार्गातील ज्या अडचणी आहेत त्यांचे ते मूळ कारण आहे.

गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१९ (मोंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा) अन्वये जेव्हा पहिल्यांदा निवडणुका पार पडल्या त्या वेळी हे बिल ज्या निवड समितीसमोर सादर केले गेले, त्या समितीने यथाप्रमाण प्रतिनिधित्व निवडीची पद्धत आजमावून पहायची सूचना केली होती. ती पद्धत खरे तर भारतासारख्या देशासाठी सर्वथा योग्य होती. पण त्या सूचनेकडे दुर्लक्ष करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात सर्वाधिक मताधिक्य पद्धतीने निवडणूक घेण्यामागे दडलेला हेतू असा होता, की काँग्रेस पक्षाला एक पक्षीय बळकट सरकार हवे होते, जे फक्त त्याच पद्धतीने मिळवता आले असते. धनंजयराव गाडगीळ या प्रख्यात अर्थतज्ज्ञ आणि यथाप्रमाण प्रतिनिधित्व पद्धतीच्या समर्थकाने हे उघड केले. साध्या शब्दात सांगायचे तर यथाप्रमाण प्रतिनिधित्व पद्धत म्हणजे पक्षासाठीचे मतदान असते आणि पक्ष आपले प्रतिनिधी संसदेत पाठवतात. या साध्या संकल्पनेची अनेक रूपे आहेत. या पद्धतीचे फायदेदेखील अनेकविध आहेत. या पद्धतीने प्रत्येक व्यक्ती आणि हितसंबंधी गटांना प्रतिनिधित्व मिळते आणि खऱ्याखुऱ्या लोकशाहीची गॅरंटी मिळते. तिच्यामुळे छोटे छोटे हितसंबंधी गट एकत्र येतात, त्यांचे ऐक्य घडून येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या गरजेप्रमाणे तिचे स्वरूप ठरवता येते. आजच्या आधुनिक संगणकीय आणि मॉडेलिंग तंत्रज्ञानाशीही ती सहज जुळणारी पद्धत आहे. भ्रष्टाचाराला ती दाबून ठेवू शकते आणि आर्थिक व्यवहार कमी करू शकते. जर आपल्याकडे ही पद्धत असती तर भारतीय लोकशाही ही धनिकशाही किंवा चोरशाही बनली नसती. सर्वाधिक मताधिक्य पद्धतीने हुकूमशाहीलादेखील पायबंद बसला असता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या पद्धतीमुळे जातीय अस्मिता आणि त्यावर आधारलेल्या राजकारणावर बंधने आणली असती. त्यातून जाती विलयाचा मार्ग प्रशस्त झाला असता.

●

(कोल्हापूर येथील कॉम्रेड अवी पानसरे व्याख्यानमालेत दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी दिलेल्या व्याख्यानातील संपादित अंश)

**पुस्तक परिचय**

# माणूसमयतेची वाट सुकर करणारी 'आंबेडकरी आई'

## अजित मगदूम

लेखक नवी मुंबईस्थित इंग्रजीचे निवृत्त प्राध्यापक तसेच प्राचार्य आहेत.

ajitbalwant@gmail.com

आशालता कांबळे आणि श्यामल गरुड संपादित 'आंबेडकरी आई' या पुस्तकामध्ये एकूण ४२ लेकींनी आपल्या जीवनप्रवासात आपापल्या आईच्या कौटुंबिक आणि सामाजिक योगदानाबद्दल लिहिलेलं आहे.

या पुस्तकाच्या सुरुवातीला आशालता कांबळे यांनी 'भूमिका' मांडताना 'आंबेडकरी आई' ही संकल्पना सुस्पष्टपणे विषद केली आहे. आतापर्यंतच्या साहित्यातील आईच्या प्रतिमेपेक्षा दलित, शोषित, कष्टकरी वर्गातील आई जिच्या वाट्याला अत्यंत कष्टाचं, हलाखीचं जीवन आलं, ती वेगळी ठरते. इथे लेखिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७मध्ये मनुस्मृती दहन केल्याच्या दुसऱ्याच दिवशी घेतलेल्या स्वतंत्र महिला परिषदेचा संदर्भ दिला आहे. या परिषदेत आंबेडकरांनी स्त्रियांच्या आईपणावर प्रकाश टाकला आहे. मातेने वर्षानुवर्षांच्या न्यूनगंडातून बाहेर पडले पाहिजे हा क्रांतिकारी विचार त्यांनी स्त्रियांच्या काळजात कोरला. त्यांनी या स्त्रियांच्यात असलेला करारीपणा, मनोधैर्य आणि धमक यामुळे त्या इतर स्त्रियांपेक्षा कशा वेगळ्या, कणखर आहेत हे मनावर बिंबवले. एवढेच नव्हे तर त्यांच्या या आवाहनास प्रतिसाद म्हणून या आयांनी कोणत्याही अडचणी आल्या तरी आपल्या मुलामुलींना शिक्षण देण्यात कोणतीही तडजोड केली नाही. १९५६मध्ये आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन समस्त दलित समाजाला विशेषतः महिलावर्गाला कर्मकांडातून मुक्त केले. त्यांना विश्वास होता, की सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत स्त्रिया उतरल्या तरच सर्वंकष बदल होतील. आईला जागं केलं तर ती तिच्या लेकरांना खंबीर बनवेल. पददलितांनी हालअपेष्टांच्या अग्निदिव्यातून गेल्याशिवाय त्यांना मोठेपण प्राप्त होणार नाही. भविष्यकाळ घडवायचा असेल तर वर्तमानकाळातील सुखांचा आणि गरजांचाही त्याग केला पाहिजे, हा बाबासाहेबांचा विचार या मातांनी मनोमन स्वीकारला. आतापर्यंतची रडत- कुढत बसणारी, घरातले सगळे निर्णय पुरुषावर सोडणारी, सेवेत आनंद मानणारी आई इथे अभिप्रेत नसून ही आई डॉ. आंबेडकर यांचा विचार घेऊन स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वाभिमानाने जगणारी आहे. या आईचा वारसा महाप्रजापती गौतमीचा, यशोधरेचा, जिजाऊंचा, अहिल्याबाईंचा, सावित्रीमाईंचा तसेच माता रमाईंचा आहे. यांच्या पावलावर चालणारी 'आंबेडकरी आई' आदर्श म्हणून समोर ठेवावी हा या ग्रंथनिर्मितीमागचा हेतू असल्याचे आशालता कांबळे यांनी म्हटले आहे.

श्यामल गरुड यांनी 'ऋणनिर्देशा'मध्ये आंबेडकरी आयांनी आपल्या

लेकींना संविधानिक सांस्कृतिक परिवेशात परंपरावादी न होता मानवतावादी होऊन कसे वाढवले याचा लेखाजोखा असल्याचे म्हटले आहे.

या पुस्तकात एकूण आंबेडकरी आयांनी गरिबी, आर्थिक, सामाजिक वंचना तसेच जातीय, धार्मिक आणि पुरुषसत्ताक वर्चस्ववादाला न डगमगता तोंड देत मुलामुलींच्या शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिलं. येईल त्या परिस्थितीशी करारी बाण्याने त्या कशा झगडल्या; बाबासाहेबांच्या प्रेरणेने अनेकदा कुटुंबात निर्णय घेण्याचे, ते तडीस नेण्याचे धारिष्ट्य त्यांनी कसे दाखवले हे या पुस्तकात वाचायला मिळते.

चपरासी म्हणून छाया बनसोडे यांच्या आईने समुद्रपूर येथे सरकारी दवाखान्यात नोकरी पत्करली. नर्सला बाळंतपण करण्यात मदत करत ती स्वतःच बाळंतपण करू लागली. वास्तविक तिला नर्सिंगला जायचे होते, पण भावांनी शिकू न देता लग्न करून दिले. पण तेच काम ती आज करत होती. आईच्या अपार परिश्रमामुळे स्वतः लेखिका आणि त्यांच्या सहा बहिणी तर शिकल्याच पण पुढे नातवंडे न्यूयॉर्क, लंडन विद्यापीठात शिकत आहेत. आईला नेहमी वाटायचं, माझी मुलं बाबासाहेबांसारखी व्हावीत.

इथे असाही एक लेख आहे, की सोनल बनसोडे यांनी सासूबाईंवर 'सासू नाही...तर आईच!' हा लेख एका उदारमतवादी, स्त्री-पुरुष समानतेचा विचार कृतीत आणणाऱ्या कवयित्री हिरा बनसोडे यांच्यावर लिहिला आहे. हिरा यांना घरातून शिकायला झालेला विरोध, नोकरी मिळाल्यावरही सासूबाईंची स्वयंपाक, धुणीभांडी करण्यासाठीची सक्ती असूनही गॅलरीतल्या दिव्यांच्या उजेडात अभ्यास करून पुढे एम. ए. कशा झाल्या या त्यांच्या खडतर प्रवासाविषयी सोनल यांनी लिहिलं आहे. आपल्या मुलाच्या पुरुषसत्ताक विचारांना विरोध करुन आपल्या सुनेला मेकअपचा कोर्स करायला लावून स्टुडिओ उभारण्याचं सुनेचं स्वप्न स्वतःच्या सोन्याच्या बांगड्या गहाण ठेवून सासुबाईंनी म्हणजेच हिराबाईंनी पूर्ण करुन दिलं. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या मुलाला 'संविधानात स्त्रीला माणूस म्हणून सर्व हक्क आणि स्वातंत्र्य दिलं आहे, तिला तिच्या इच्छेप्रमाणे करू दे' असं बजावलं. आप्तेष्टांचा रोष पत्करून हिरा बनसोडे यांनी आपल्या सुनेला तिच्या इच्छेप्रमाणे नृत्यशिक्षण घेण्यात मदत केली.

इथे एक नोंदवण्यासारखी बाब म्हणजे बाबासाहेबांचा विचार कधी कधी पुरुषसत्ताक मानसिकतेला झेपत नसे, अशा वेळी आंबेडकरी आयांनी तो मनोभावे मानला आणि कृतीत आणला. 'घरात स्वच्छता, टापटीपीबरोबरच दारासमोर रांगोळी घाला' या बाबासाहेबांच्या उपदेशाचा प्रभाव आईवर कसा होता आणि त्यामुळे माझी आई ही संपूर्ण परिसरात रांगोळी घालणारी पहिली होती, असं वसुंधरा मधाळे लिहितात.

आंबेडकरी विचारांचा परिपाक म्हणून असेल पण या आयांमध्ये एक प्रगल्भ समजूतदारपणा आणि शहाणीव दिसते. अर्थात ती कदाचित विपन्नता, हलाखीच्या परिस्थितीतून आली असेल की काय असा विचार येतो. वाल्मिका एलिंजे अहिरे यांनी आपल्या आई चंद्रभागा बजाबा एलिंजे यांच्यावर लिहिलेला लेख लक्षणीय आहे.

घरात अन्नाची मोताद होती. सुगी झाल्यावर शेतात पडलेले गव्हाचे दाणे दिवसभर वेचून, जात्यात भरडून ती शिजवून मुलांना खाऊ घालायची. सरपंच निवडीत आईचं मत मोलाचं होतं. एका तरुण उमेदवारानं काकू दोन पोती बाजरी देतो पण मत द्यायचं असं सांगितलं. तेव्हा ती म्हणाली मला बाजरी नको, पण आपल्या गावात दुसरीनंतर तिसरीसाठी लहानग्यांना नदी पार करून जावं लागतं. त्यासाठी तू एक शाळेची खोली बांधून दे असं विधायक वळण दिल्यावर तो उमेदवार अचंबित झाला.

दररोज पडेल ते काम करून मोलमजुरी आई मिळवायची. पण मुलीला कधी कामाला घेतलं नाही. ती मॅट्रिक पास होणारी पहिली मुलगी होती. पुढे

शिकण्यासाठी तिने साखरपुडा हट्टाने मोडला. आईच्या मृत्यूची कहाणी तर वाचण्यासारखी आहे.

सिंधू रामटेके यांनी बहिणाबाई तायडे या त्यांच्या आईवर लिहिलेल्या लेखात मुलीला (पद्मिनी) नोकरी मिळाल्यावर ट्रेनिंगसाठी तिच्याबरोबर जायला कोणालाही वेळ नसतो. आई स्वतःचं सगळं सोडून सहा महिने जायला तयार होते. जाताना घरातली भांडीकुंडी आणि दोन लहानग्या मुलांना 'माला' नावाच्या म्हशीवर बसवून ती चालत अकोल्याला जाते. स्वतःची दोन मुलं आणि मुलीच्या दोन बाळांचं बघत ती अथक परिश्रम करून तिथे राहते. ट्रेनिंग संपल्यावर नोकरी सुरू व्हायच्या आदल्या दिवशी जावई मुलीला नोकरीचा राजीनामा द्यायला लावतो, ही गोष्ट आईला क्लेशदायक ठरते. मुलींना शिकवून स्वतःच्या पायावर उभे करा या बाबासाहेबांच्या उपदेशाला जागून तिनं जीवाचं रान केलं पण इथं नोकरीपेक्षा नवऱ्याला महत्त्व दिलं ही चूक झाली असं ती म्हणते. नवस, बुवा, बाबा यावर कधीच तिनं विश्वास ठेवला नाही. ज्योतिषी आला की आई बहिणाबाईंच्या ओळी म्हणायची,

*अरे अरे ज्योतिषा, नको हात माझा पाहू.*

*माझं भविष्य मला कळे, माझ्या दारी नको येऊ.*

बापाला एकजण खोडसाळपणे म्हणतो, की तुझ्या मुली एम. ए. झाल्या. त्यांची लग्न करून टाक. नाहीतर पळून गेल्या तर आपलं नाक कापलं जाईल.

यावर बापानं जे उत्तर दिलं ते बाणेदार तर होतंच पण स्त्रीवादाचा, आधुनिक विचारांचा तो एक सशक्त स्वर होता. बाप त्याला म्हणतो, पोरींना पोट आणलं तरी मी त्यांची लेकरं खांद्यावर घेऊन मिरवीन.

इतकं तडाखेबंद उत्तर त्याला कसं सुचलं असेल हा प्रश्न पडण्यासारखा आहे.

या पुस्तकातील आईविषयीचे लेख म्हणजे स्मृतिरंजन आहे का? गतकाळाबद्दलचं रुदन आहे का? हे केवळ भावनाप्रधान लेखन म्हणता येईल का? या तिन्हींची उत्तरं 'नाही' असं आहे. या लेखनाला भावनेचा स्पर्श जरूर असणारच आहे, पण या सर्व कथा प्रत्यक्ष घडलेल्या आहेत, हे ठायी ठायी जाणवतं. या सर्व आयांची बांधिलकी डॉ. आंबेडकरांच्या विचारांशी, शिक्षणविषयक शिकवणीशी आहे.

बाबासाहेबांनी परदेशात कितीतरी पदव्या मिळवल्या पण बिडी -दारूला स्पर्श केला नाही त्यांनी आयुष्यात कधीच मजा केली नाही. नव्हे, त्यांचा हसतानाचा एकही फोटो पाहिला नाही असं मुलांना सांगणाऱ्या अनुसया तातोबा माने यांनी घरातलं रॉकेल विकून मुलांना उत्तर पत्रिका घेऊन दिल्या.

आई-बाबांनी बदलीच्या नव्या गावात सलग तीन वर्षे शून्य टक्के निकाल लागलेल्या शाळेचा निकाल प्रचंड मेहनत घेऊन ५५% लावल्याचे मधुरिका किरतकर लिहितात.

'हिरा है सदा के लिये!' हा या पुस्तकातील प्रज्ञा दया पवार यांचा हिरा पवार या त्यांच्या आईवरील पहिलाच लेख या पुस्तकाला साहित्यिक आणि मूल्यात्मक उंची देणारा आहे. हिराबाई या शाळेत शिक्षिका असताना त्यांच्यातील निडर वृत्ती आणि वैचारिक बाणेदारपणा दाखवणाऱ्या काही आठवणी-प्रसंग प्रज्ञा यांनी सांगितले आहेत.

दंगलीच्या काळात शाळा सोडून जाणाऱ्या मुस्लिम मुलांना विश्वास देऊन शाळेत थांबवणं, शाळेत महामानवाच्या प्रतिमा लावण्याचा आग्रह धरणं, समतेच्या तत्त्वाने पाणी मिळण्याचा आग्रह धरणं हे प्रसंग त्यांनी सांगितले आहेत.

मैत्रिणीचे पती गेल्यानंतर तिचे दागिने काढून घेणे, कुंकू पुसणे सुरू झाल्यावर हिराबाई पाच-सहाशे लोकांमधून एकट्याच पुढे आल्या आणि या प्रथेला थांबवत जमावाला त्यांनी विचारलं, कशाला नाव घेता बाबासाहेबांचं? त्यांच्या या सवालाने सगळ्यांची वाचाच बंद झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं धरलेलं बोट टोकाच्या विपरीत परिस्थितीतही आईने सोडलं नाही हे सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे असं लेखिकेनं म्हटलं आहे.

एकाच वेळी तरल आणि तितकाच सशक्त वैचारिक पोत असलेला लेख केवळ प्रज्ञा दया पवारच लिहू शकतात.

करुणा दीपक गायकवाड या लेकीने लिहिलेल्या लेखात आई शांताई म्हणायच्या महामानवाचा सहवास व स्पर्श झालेल्या व्यक्तीची मी पत्नी आहे याचा मला अभिमान आहे. करुणा आईविषयी म्हणतात, *अंधार शिवत उजेड उसवत, मातीची नाती तू जपली*

'माझी आई उर्फ मम्मी जान' या सुंदर शीर्षकाच्या लेखात आईविषयी श्यामल गरुड म्हणतात, की अनेक चढउतारांना पचवत, कडवट न होता मानवतावादी विचारांवर श्रद्धा ठेवून ती जगत राहिली. श्यामल यांची आई इतरांपेक्षा वेगळी आहे कारण ती कामाच्या ओझ्याखाली आयुष्यभर कुढत राहिली. तिने स्वतःला कधी व्यक्तच केलं नाही. तिच्या मनावर मुस्लिम सांस्कृतिकतेची छाया होती. धार्मिक कर्मकांडांना नाकारून मानवतावादी विचार तिने पुढे नेला. अशा अनेक आया या आंबेडकरी चळवळीच्या पायाभरणीतल्या दगड झाल्या आहेत असं गरुड म्हणतात ते सार्थच आहे.

या पुस्तकात कवयित्री ज्योती लांजेवार, प्रसिद्ध लेखिका उर्मिला पवार, दलित पँथर चळवळीचे आघाडीचे कार्यकर्ते ज. वि. पवार यांच्या सहचारिणी जयमाला पवार, लेखिका नलिनी भोसेकर इत्यादींवर त्यांच्या लेकींनी लिहिलेले लेख वाचनीय आहेत.

विशेष म्हणजे नंदा कांबळे यांनी आपल्या सासुबाई आंबेडकरी स्त्री विचारवंत ताराबाई संभाजी कांबळे यांच्यावर 'आंबेडकरी आई' या नात्याने सुंदर लिहिले आहे. सोनल बनसोडे यांनीही आपल्या सासुबाईवर लिहिले आहे. संपादिका आशालता कांबळे यांनी आपल्या आईवरील लिहिलेला लेखही वाचायलाच हवा असा आहे.




यातील स्त्रियांचा डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक भूमिकेला जो प्रतिसाद आहे तो लोकशाहीच्या वाटेने संविधानात दिलेली समान संधी मिळवण्यासाठीचा आहे.

जातिव्यवस्थेतून आलेले गौणत्व शिक्षण दूर करते, इतकेच नाही तर पिढ्यानपिढ्यांतून उतरलेले दास्याचे आदिबंध तोडण्यासाठी बळ देते. शिक्षण गुलामगिरीच्या पाशातून मुक्त करते अशा विचारांनी अंत:प्रेरित झालेल्या आयांनी केलेला खडतर प्रवास विषारी फळे आणि फुले येणाऱ्या वृक्षांची मुळेच बदलून टाकण्यासाठी केला आहे असे म्हणावेसे वाटते. प्रश्न विचारण्याने, चिकित्सेने बुजून गेलेले उमाळे पुन्हा प्रवाही करण्याचा हा निकराचा प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहे. कारण आताची देश –विदेशातील चौथी पिढी सुनील अवचार, शैलजा पाईक, सूरज येंगडे, विपिन तातड, सिद्धेश गौतम, मालविका राज, राजश्री गुडी, मनजीत सरकार इत्यादींच्या बहुपेडी अभिव्यक्तीद्वारे भारतातील एक जिवंत शक्ती असलेला आंबेडकरवाद जगभरातील शोषित वर्गांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

वर्तमान काळात फोफावलेली क्रूरता, विषमता, शोषण, वैरभाव, द्वेष आणि हिंसा या पार्श्वभूमीवर आंबेडकरी आई हे पुस्तक विद्या, ज्ञानार्जन, शहाणीव, सामंजस्य आणि सद्भाव वृद्धिंगत करत माणूसमयतेची वाट सुकर करेल असा विश्वास वाटतो.

●

**आंबेडकरी आई**, संपा. आशालता कांबळे, श्यामल गरुड, प्रकाशन : डॉ. आंबेडकर वाङ्मयीन अभ्यासमंडळ, मुंबई, पृ. ३८१, मूल्य ६०० रु.

# आमचं काम

## जिवाहून प्यारं
## जिवावर येणारं
## जीव घेणारं
## बिनबोल, बिनमोल

> “कीटकनाशकं वापरून हात खराब झालेत, डोळ्यांनाही त्रास होतोय.
> पण आजारी असलं तरी दवाखाना कुठं आहे?
> आणि जरी असला तरी पैसे कुठं आहेत?"
> - शेती कसणारी महिला, मु. बोरी, जि. परभणी

> “आम्ही बियाण्याच्या कंपन्यांमध्ये काम करतो. पण ते काम फार कष्टाचं असतं.
> तिथले लोक कडक नजर ठेऊन असतात आणि सारखे पटपट काम करा म्हणून ओरडत असतात.
> संडासला सुद्धा जाऊ देत नाहीत. बोलू देत नाहीत.
> पाळीच्या काळात कसं करायचं म्हणून कामावर खाडा करायला लागतो.”
> - विस्थापित दलित शेतमजूर महिला, मु. संगापूर पुनर्वसन कॉलनी, जि. सिद्दिपेट, तेलंगणा



SOPPECOM

मकाम Makaam

५

छायाचित्रकार : **राजवीर**

Registered R.N.I. No. MAHMAR/2001/09622
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-37
Postal Regd. No. PCW/006/2024-2026
Posted at Pune PSO, GPO, Pune-411001
Published and posted on 1st and 16th of Every Month.
Date of Publication & Posting : 16-1-2025



